





रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग

# कृषीवल

**विकणे आहे**

अलिबाग ब्राह्मणआळी युनियन बँकेशेजारील नवीन इमारतीमधील ९५० स्क्वे. फूट क्षेत्रफळाचा व्यापारी गाळा विकणे आहे.

**मोहनिश जोग**
मो.9970666203

रायगड | शुक्रवार । दि. १६ ऑक्टोबर २०२६ । अंक १३० । पृष्ठे १० । किंमत ५ ₹ । आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । RGD/016/2026-28 । krushival.in

## वेधक

### शाळेचे छत कोसळून २८ मुलांचा मृत्यू

**नवी दिल्ली :** पाकिस्तानमधील खैबर पख्तुनख्वा प्रांताची राजधानी पेशावरमध्ये गुरुवारी एका खासगी शाळेचे छत कोसळले. या घटनेत जवळपास २८ मुलांसह एका शिक्षिकेचा मृत्यू झाला, तर ४० हून अधिक जण जखमी झाले आहेत. ही घटना पेशावरच्या अंतर्गत भागातील दीर कॉलनी याठिकाणी घडल्याचं पेशावर कॅपिटल सिटी पोलीस प्रमुख मिया सईद यांनी सांगितलं. याप्रकरणी शाळेच्या मालकाला अटक करण्यात आल्याचे त्यांनी सांगितले. लेडी रीडिंग हॉस्पिटलचे प्रवक्ते मुहम्मद आसिम यांच्या माहितीनुसार, या दुर्घटनेत सहा मुलींसह २८ विद्यार्थी आणि एक शिक्षिकेचा मृत्यू झाला आहे. तसंच, ४० हून अधिक जण जखमी झाले आहेत. याचबरोबर, घटनेतील जखमींवर उपचारासाठी रुग्णालयात आणीबाणीची स्थिती घोषित करण्यात आल्याचंही आसिम यांनी सांगितलं.

### मोसमी पावसाची देशातून माघार

**मुंबई :** मोसमी पावसाने गुरुवारी (दि. १५) संपूर्ण देशातून माघार घेतली असून, दक्षिण भारतात ईशान्य मोसमी पाऊस सक्रिय झाला आहे. यंदा ४ जून रोजी केरळमध्ये दाखल झालेला मोसमी पाऊस देशातून अपेक्षित वेळेत परतला. यंदाच्या हंगामात देशात सरासरीच्या तुलनेत १३ टक्के पावसाची तूट नोंदवण्यात आली. महाराष्ट्रातून मोसमी पावसाचा परतीचा प्रवास ३ ऑक्टोबरला सुरू झाला, तर ८ ऑक्टोबरपर्यंत संपूर्ण राज्यातून पावसाने माघार घेतली. दरम्यान, हवामान विभागाने पुढील तीन दिवस कोकण, मध्य महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भातील काही भागांत मेघगर्जनेसह हलक्या पावसाची शक्यता वर्तवली आहे.

### 'धर्मांतरानंतर आरक्षणाचा लाभ नाही'

**नवी दिल्ली :** धर्मांतर केल्यानंतर पूर्वीच्या धर्मातील मागासलेपणाच्या आधारे आरक्षण किंवा विशेष सवलतींचा दावा करता येणार नाही, असा महत्त्वपूर्ण निकाल सर्वोच्च न्यायालयाने दिला आहे. हिंदू धर्म सोडून अन्य धर्म स्वीकारणाऱ्या व्यक्तीला पूर्वीच्या सामाजिक स्थितीच्या आधारे आरक्षणाचा लाभ मिळू शकत नाही, या मद्रास उच्च न्यायालयाच्या निर्णयावर न्या. शिक्कामोर्तब केले. न्या. पी.के. मिश्रा आणि न्या. श्री चंद्रशेखर यांच्या खंडपीठाने हा निर्णय दिला. दरम्यान, याचिकाकर्त्याने इस्लाम धर्म स्वीकारल्यानंतर 'मुस्लिम लब्बे' या मागासवर्गीय समुदायाचे प्रमाणपत्र मिळवण्यासाठी अर्ज केला होता.

### एकाच जमिनीची दोनदा विक्री

**पनवेल :** जमिनीची दुसऱ्यांदा विक्री करून फसवणूक केल्याप्रकरणी नांदगाव येथील ५२ वर्षीय शेतकऱ्याविरोधात पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.संबंधित शेतकऱ्याने ८ फेब्रुवारी २००७ रोजी दिनेश शहा यांच्याकडून मोबदला स्वीकारून १४.९ गुंठे जमीन नोंदणीकृत साठेकराराने विकली होती. मात्र, पहिला व्यवहार झालेला असतानाही त्याने हीच जमीन नेरूळ येथील मदन कोळंबेकर यांना पुन्हा विकली. ४ मार्च २००८ रोजी संपूर्ण मोबदला स्वीकारून नोंदणीकृत साठेकरार केल्याने फसवणूक झाल्याची तक्रार दाखल करण्यात आली आहे.

## सरकारकडून अवघी पाच हजारांची दुष्काळी मदत

# शेतकऱ्यांची चेष्टा!

**। चिरनेर । प्रतिनिधी ।**

राज्यातील ३०५ तालुक्यांत दुष्काळ जाहीर झाल्याच्या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांना दिवाळीपूर्वी पाच हजार रुपये अग्रीम मदत देण्याची घोषणा सरकारने केली आहे. मात्र, शेतीचा उत्पादन खर्चही भरून न निघणारी मदत देऊन सरकार शेतकऱ्यांच्या दुःखाची चेष्टा करत आहे, असा आरोप अखिल भारतीय किसान सभेने केला आहे. सरकारकडून शेतकऱ्यांच्या दुःखावर मीठ चोळण्याचे काम सुरू असल्याचा आरोप करीत किसान सभेकडून २७ ऑक्टोबरपासून मुंबईतील आझाद मैदानावर महामुक्काम सत्याग्रहाचा इशारा देण्यात आला आहे.

एका बाजूला पिकांचे नुकसान, डोक्यावर कर्ज आणि कृषी सेवा केंद्रांच्या उधारीचा तगादा, तर दुसऱ्या बाजूला शेतकऱ्यांचे हक्काचे हप्ते थकीत असल्याने सरकारच्या घोषणांवर प्रश्नचिन्ह उपस्थित करण्यात आले आहे. पीक विम्याच्या संरक्षित रकमेइतकी नुकसानभरपाई द्यावी, नमो शेतकरी योजनेचे थकीत हप्ते आणि लाडकी बहीण योजनेतील पात्र लाभार्थ्यांची प्रलंबित रक्कम तातडीने जमा करावी, अशी मागणी किसान सभेने केली आहे.

पिके उभी करण्यासाठी शेतकऱ्यांनी बियाणे, खते, औषधे, मशागत आणि मजुरीवर मोठा खर्च केला आहे. •➤पान २ वर

**दुष्काळी मदतीवर किसान सभेकडून तीव्र संताप व्यक्त**

**दिवाळी साजरी करणार कशी?**

**मुंबईतील आझाद मैदानावर २७ ऑक्टोबरपासून महामुक्काम सत्याग्रह**



### रायगडकरांच्या पदरी पुन्हा उपेक्षा!

महायुती सरकारकडून रायगडच्या शेतकऱ्यांची पुन्हा उपेक्षा झाल्याची भावना व्यक्त होत आहे. पहिल्या दुष्काळी यादीत केवळ श्रीवर्धन तालुक्याचा समावेश झाल्यानंतर स्थानिक राजकारण्यांनी आपले राजकीय वजन वापरून हा तालुका यादीत समाविष्ट करून घेतल्याचा आरोप विरोधकांनी केला होता. श्रीवर्धनमध्येच दुष्काळी परिस्थिती आहे का? रायगडच्या अन्य तालुक्यांतील शेतकऱ्यांचे नुकसान सरकारला दिसत नाही का? असे सवालही उपस्थित करण्यात आले होते. आता नव्या दुष्काळी यादीत रायगडच्या एकाही तालुक्याला स्थान न मिळाल्याने सरकारच्या भूमिकेवर पुन्हा प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. शेजारच्या रत्नागिरी जिल्ह्याला दिलासा मिळत असताना रायगडच्या शेतकऱ्यांच्या पदरी मात्र निराशाच पडली आहे. दुष्काळाच्या निकषांमध्ये खरंच शेतकऱ्यांचे प्रत्यक्ष नुकसान पाहिले जाते, असा संतप्त सवाल उपस्थित होत असून, रायगडमधील बाधित शेतकऱ्यांना न्याय देण्याची मागणी जोर धरत आहे.




## फाईली कपाटात, पैसा खिशात?

**अध्यक्षांसह एका अधिकाऱ्याचं नाव चर्चेत**

**समाजकल्याण, महिला व बालकल्याण विभागांत चर्चा**

**। अलिबाग। विशेष प्रतिनिधी ।**

जिल्हा परिषदेच्या विविध विभागांतील विकासकामांच्या प्रशासकीय प्रक्रियेवर स्वाक्षरीअभावी परिणाम होत असल्याचीचर्चासुरूझालीआहे. जिल्हा परिषद अध्यक्षांकडून आवश्यक कागदपत्रांवर स्वाक्षरी करण्यास टाळाटाळ होत असल्याचा आरोप केला जात असून, यामुळे समाजकल्याण तसेच महिला व बालकल्याण विभागांतील काही कामांच्या प्रक्रियेला अडथळा निर्माण होत असल्याचे बोलले •➤पान २ वर

> जिल्हा परिषदेच्या विकासकामांची कोणत्याही प्रकारची फाईल कार्यालयात आतापर्यंत प्रलंबित नाही. जो काही आरोप होत आहे, तो चुकीचा आहे. कोणतीही फाईल आली की तिची पडताळणी करून कार्यवाही केली जाते.
> — मंगेश वाकडीकर, अध्यक्ष, रायगड जिल्हा परिषद



## विरोध डावलून टोरंटचा घाट!

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

स्थानिकांचा विरोध, पर्यावरणाच्या ऱ्हासाची भीती आणि जमिनीच्या मोजणीवरून निर्माण झालेला संघर्ष, असे चित्र असतानाही कर्जत तालुक्यातील टोरंट ऊर्जा प्रकल्प पुढे रेटण्याच्या हालचाली सुरू आहेत. या प्रकल्पाच्या भूमीपूजनासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी ३ नोव्हेंबरला कर्जतमध्ये येणार असल्याची चर्चा असून, प्रशासनाच्या हालचालींना वेग आला आहे. मात्र, संभाव्य कार्यक्रमामुळे पर्यावरणप्रेमींचा विरोध अधिक तीव्र होण्याची चिन्हे आहेत.

कर्जत तालुक्यातील पाली तर्फे कोतवाल खलाटी ग्रामपंचायत हद्दीतील सायडोंगर येथे टोरंट एनर्जी पॉवर सोल्यूशन लिमिटेड कंपनीचा हायड्रोपॉवर प्रकल्प प्रस्तावित आहे. या प्रकल्पासाठी ३७७ हेक्टर जमीन वापरली जाणार असून, त्यापैकी २३३ हेक्टर जमीन वन विभागाची आहे. पेज नदीचा परिसर तसेच भीमाशंकर अभयारण्याशी संबंधित पर्यावरणीय संवेदनशीलतेमुळे या प्रकल्पाला विरोध होत आहे.

कर्जत पर्यावरण बचाव समितीने यापूर्वी मोर्चे आणि निदर्शनांच्या माध्यमातून विरोध नोंदवला आहे. प्रकल्पाच्या पोहोच रस्त्यासाठी जमिनीची मोजणी करण्यासही स्थानिक शेतकऱ्यांनी विरोध केला. मात्र, विरोध कायम असतानाही प्रकल्पाच्या हालचाली सुरू असल्याने संघर्ष चिघळण्याची शक्यता आहे. एकीकडे प्रकल्पाच्या भूमीपूजनाची चर्चा, तर दुसरीकडे स्थानिकांचा विरोध अशा परिस्थितीत ३ नोव्हेंबरला नेमके काय घडणार, याकडे संपूर्ण कर्जत तालुक्याचे लक्ष लागले आहे.

### सात प्रकल्पांमुळे पर्यावरणाचा प्रश्न

कर्जत तालुक्यात पोशीर, शिलार, टोरंट, टाटा आणि कोंढाणे धरणांसह विविध ऊर्जा प्रकल्पांमुळे जंगल, शेती आणि स्थानिकांच्या भवितव्याचा प्रश्न निर्माण झाल्याचे पर्यावरण बचाव संघर्ष समितीचे म्हणणे आहे. या सात प्रकल्पांसाठी एकूण ११ हजार ४५ एकर जमीन बाधित होण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे. त्यामुळे पर्यावरणाचे रक्षण आणि स्थानिकांच्या हक्कांसाठी समितीने आंदोलनाची हाक दिली आहे.

**३ नोव्हेंबरला मोदींच्या हस्ते भूमीपूजनाची चर्चा**

**प्रशासनाची लगबग, पर्यावरणप्रेमी आक्रमक**

### सहा हेलिपॅडची चर्चा

पंतप्रधानांच्या संभाव्य दौऱ्याच्या पार्श्वभूमीवर सुरक्षा यंत्रणांच्या हालचाली वाढल्याची चर्चा आहे. पंतप्रधान, राज्यपाल आणि मुख्यमंत्र्यांच्या संभाव्य दौऱ्यासाठी हेलिपॅडची व्यवस्था करण्याच्या दृष्टीने कडावसह विविध ठिकाणांची चाचपणी सुरू असल्याचे बोलले जात आहे. त्यामुळे कर्जत तालुक्यात सहा हेलिपॅड उभारण्याची शक्यताही व्यक्त होत आहे. मात्र, पंतप्रधानांचा दौरा आणि भूमीपूजनाचे ठिकाण अद्याप निश्चित झाल्याची अधिकृत माहिती समोर आलेली नाही.

## फटाके, डीजे, डॉल्बीला न्यायालयाचा दणका!

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

दिवाळी असो वा अन्य सण-उत्सव, काहींच्या हौसेसाठी सर्वसामान्य नागरिकांच्या आरोग्याचा बळी चालणार नाही, असा स्पष्ट संदेश देत मुंबई उच्च न्यायालयाने ध्वनी आणि वायुप्रदूषणाविरोधात कठोर भूमिका घेतली आहे. सार्वजनिक रस्त्यांवर आणि वाहतुकीच्या मार्गांवर फटाके फोडण्यास वर्षभर बंदी लागू ठेवण्याचे निर्देश न्यायालयाने गुरुवारी (दि.१५) दिले. त्याचबरोबर मिरवणुकांमध्ये डीजे, डॉल्बी, लाऊडस्पीकर आणि लेझर लाईट्सच्या वापरावरही निर्बंध घालण्याचे निर्देश दिले आहेत.

नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांची अनामत रक्कम आणि साऊंड सिस्टीम जागीच जप्त करण्यासह फौजदारी कारवाई करण्याबाबतही न्यायालयाने कठोर भूमिका मांडली. त्यामुळे सण-उत्सवांच्या नावाखाली ध्वनिप्रदूषण करणाऱ्या आयोजकांवर आता प्रशासनाला अधिक कडक नियंत्रण ठेवावे लागणार आहे. •➤पान २ वर

- **सार्वजनिक रस्त्यांवर फटाके फोडण्यास वर्षभर बंदी**
- **नियम मोडल्यास फौजदारी गुन्हा**



## 'शक्तीपीठ'च्या विरोधात मविआचा एल्गार

**। सोलापूर । प्रतिनिधी ।**

राज्यातील शेतकरी दुष्काळाने होरपळत असताना त्यांच्या जमिनी घेण्यासाठी मात्र सरकारकडून पोलीस बळाचा वापर केला जात असल्याचा आरोप करत महाविकास आघाडीने शक्तिपीठ महामार्गाच्या संयुक्त मोजणीविरोधात आक्रमक भूमिका घेतली आहे. शेतकऱ्यांना विश्वासात न घेता सुरू असलेली मोजणी तातडीने थांबवावी, अन्यथा आम्ही स्वतः शेतात उतरून मोजणी रोखू, असा इशारा महाविकास आघाडीच्या नेत्यांनी सोलापूर जिल्हा प्रशासनाला दिला.

दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना पाच हजार रुपये देताना हात आखडता घेणाऱ्या सरकारला महामार्गासाठी निधी कुठून मिळतो? असा सवाल राष्ट्रवादी काँग्रेसचे (शरदचंद्र पवार) नेते जयंत पाटील यांनी उपस्थित केला.

जयंत पाटील, काँग्रेसचे विधान परिषदेतील गटनेते सतेज पाटील, खासदार प्रणिती शिंदे आणि खासदार धैर्यशील मोहिते-पाटील यांच्या नेतृत्वाखालील •➤पान २ वर



- **पोलीस बळ वापरुन जमीन बळकावण्याचा जोरदार प्रयत्न**
- **जयंत पाटील, सतेज पाटील यांचा इशारा**

### महामार्ग कोणाच्या फायद्यासाठी?

शक्तिपीठ महामार्गाचा खर्च ८६ हजार कोटींवरून एक लाख कोटी रुपयांपर्यंत पोहोचल्याचा दावा सतेज पाटील यांनी केला. जमीन अधिग्रहणासाठीच २२ ते २८ हजार कोटी रुपये लागणार असताना, हुडकोकडून कर्ज घेऊन हा प्रकल्प कोणाच्या फायद्यासाठी राबवला जात आहे, असा सवाल त्यांनी उपस्थित केला. सोलापूर जिल्ह्यात जबरदस्तीने मोजणी केल्यास शेतात उतरून ती रोखण्याचा इशाराही त्यांनी दिला.

## केंद्रीय निवडणूक आयुक्तांना नोटीस

**नवी दिल्ली :** कथित घोटाळा प्रकरणी सर्वोच्च न्यायालयाने मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार आणि अन्य दोन निवडणूक आयुक्तांसह निवडणूक आयोगाला नोटीस बजावली आहे. या प्रकरणात न्यायालयाने संबंधितांकडून स्पष्टीकरण मागितले असून, केंद्र सरकार आणि दिल्ली पोलिसांनाही नोटीस बजावली आहे. दरम्यान, १२ ऑक्टोबर रोजी न्यायालयाच्या परिसरात झालेल्या आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर न्यायालयाने संबंधितांच्या वर्तनावर प्रश्न उपस्थित केले. न्यायालयाला कोणीही धमकावू शकत नाही, असे स्पष्ट करत सर्वोच्च न्यायालयाने याप्रकरणी तात्काळ स्पष्टीकरण देण्याचे आदेश संबंधितांना देण्यात आले आहेत.

## जसखारमध्ये भाजपला धक्का!

**हेमंत ठाकूर यांचे ग्रामपंचायत सदस्यपद रद्द**

**। उरण । प्रतिनिधी ।**

जसखार ग्रामपंचायतीतील भाजपचे सदस्य हेमंत ठाकूर यांना मोठा धक्का बसला आहे. सार्वजनिक ठिकाणी अतिक्रमण केल्याच्या तक्रारीवर सुनावणी घेत ठाणे जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांनी २४ सप्टेंबर २०२६ रोजी दिलेल्या निर्णयानुसार ठाकूर यांना ग्रामपंचायत सदस्य म्हणून राहण्यास अनर्ह ठरविले आहे. या निर्णयामुळे त्यांचे सदस्यपद रद्द झाले आहे.

जसखार येथील रत्नाकर म्हात्रे यांनी सुमारे सहा वर्षांपूर्वी हेमंत ठाकूर यांच्याविरोधातगावातीलसार्वजनिक ठिकाणी अतिक्रमण केल्याची तक्रार रायगड जिल्हाधिकारी कार्यालयासह अन्य शासकीय कार्यालयांकडे केली होती. या तक्रारीवर अखेर निर्णय देताना जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांनी रत्नाकर म्हात्रे यांच्या बाजूने निकाल दिला. त्यामुळे जसखार ग्रामपंचायतीतील राजकीय वर्तुळात या निर्णयाची चर्चा सुरू झाली आहे.

दरम्यान, जिल्हाधिकाऱ्यांच्या या निर्णयामुळे जसखार ग्रामपंचायतीतील राजकीय समीकरणांवर काय परिणाम होणार, याकडे स्थानिकांचे लक्ष लागले आहे. सार्वजनिक जागांवरील अतिक्रमणाचा मुद्दा पुन्हा चर्चेत आला असून, या निर्णयामुळे ग्रामपंचायत सदस्यांच्या जबाबदारीचा आणि सार्वजनिक मालमत्तेच्या संरक्षणाचा प्रश्नही ऐरणीवर आला आहे. या प्रकरणाची परिसरात जोरदार चर्चा सुरू आहे.

### शाळांना २ नोव्हेंबरपासून दिवाळीची सुट्टी

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

राज्यातील राज्य मंडळाशी संलग्न प्राथमिक आणि माध्यमिक शाळांना २ नोव्हेंबरपासून दिवाळीची सुट्टी जाहीर झाली आहे. प्राथमिक शाळांना १७ नोव्हेंबरपर्यंत १५ दिवस, तर माध्यमिक शाळांना १८ नोव्हेंबरपर्यंत १६ दिवस सुट्टी असेल. त्यानंतर प्राथमिक शाळा १८ नोव्हेंबरला, तर माध्यमिक शाळा १९ नोव्हेंबरला सुरू होतील. सुट्टी संपल्यानंतर नोव्हेंबरच्या शेवटच्या आठवड्यात राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेमार्फत संकलित चाचणी-१ घेतली जाणार आहे. गणित, इंग्रजी आणि मराठी विषयांची चाचणी घेतली जाईल, तर अन्य विषयांच्या परीक्षा शाळास्तरावर आयोजित केल्या जाणार आहेत.

## दीड महिन्यात ३५० भटक्या कुत्र्यांना पकडले

**२६० कुत्र्यांचे निर्बीजीकरण व लसीकरण पूर्ण**

**। पेण । प्रतिनिधी ।**

पेण शहरातील भटक्या व उनाड कुत्र्यांचा वाढता वावर आणि नागरिकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने पेण नगरपालिकेकडून १ सप्टेंबरपासून भटक्या कुत्र्यांचे निर्बीजीकरण व रेबीज प्रतिबंधक लसीकरण मोहीम सुरू करण्यात आली आहे. या मोहिमेंतर्गत आतापर्यंत एकूण ३५० भटक्या कुत्र्यांना पकडण्यात आले असून, त्यापैकी २६० कुत्र्यांचे निर्बीजीकरण आणि रेबीज प्रतिबंधक लसीकरण पूर्ण झाले आहे. उर्वरित ९० कुत्र्यांवरील प्रक्रिया येत्या दोन ते तीन दिवसांत पूर्ण करण्यात येणार



आहे.

पेण शहरातील कोळीवाडा नाका, देवआळी, कवंडाळ तलावाचा कोपरा, अंतोरा रोड, बौद्धवाडा, फणसडोंगरी, चावडी नाका, नंदीमाळ नाका तसेच विश्वेश्वर स्मशानभूमी परिसरात भटक्या कुत्र्यांचा मोठ्या प्रमाणात वावर असल्याच्या तक्रारी नागरिकांकडून करण्यात •➤पान २ वर

**तिमिरातून तेजाकडे नेणारी ज्ञानदुर्गा | समाजातील अनिष्ट प्रथा मिटविण्याचा प्रयत्न**

## भारतातल्या पहिल्या महिला शिक्षिका : सावित्रीबाई फुले

**मिलिंद मधुकर जाधव**
**श्रीवर्धन**

हिंदवी स्वराज्यापासून ते आजच्या तंत्रज्ञानाच्या युगापर्यंत अनेक स्थित्यंतरं झाली. त्या त्या काळातल्या कर्तबगार व्यक्तिमत्त्वांनी स्वतःला समाज प्रबोधनाच्या कार्यात झोकून देत स्पृश्य-अस्पृश्य, स्त्री-पुरुष अशा भेदभावांसह अनेक अनिष्ट प्रथा मिटवण्याचा प्रयत्न केला. मात्र, या प्रयत्नांना टोकाचा विरोध करणारी प्रवृत्ती आजही छुप्या पद्धतीने कार्यरत आहे. मुखवटे बदलले तरी प्रवृत्ती तीच आहे.

छत्रपतींच्या जेवणात विष घालणं असो, शंभूराजांची सुनियोजित बदनामी करणं असो की समाजसुधारक प्रबोधनकारांच्या दारात मेलेलं गाढव टाकणं असो. ती कारस्थानी प्रवृत्ती आजही रुपडं बदलून अस्तित्वात आहे. अशा विकृत सामाजिक परिस्थितीत तीन जानेवारी १८३१ साली सावित्रीबाई फुले नावाची ज्ञानज्योत प्रज्वलित झाली. स्त्रियांना शिक्षणाचा अधिकार नाकारण्याचा अजेंडा छुप्या पद्धतीने रेटणाऱ्या प्रवृत्तीच्या नाकावर टिच्चून, सावित्रीबाईंनी १८४८ साली पुण्यात देशातली पहिली मुलींची शाळा सुरू केली. ती शाळा नव्हती, नव्या युगाचा उषःकाल होता. पहिली महिला शिक्षिका आणि पहिली महिला मुख्याध्यापिका होण्याचा सन्मानही सावित्रीबाईंनाच मिळाला.

या ज्ञानज्योतीच्या प्रकाशात सर्व स्तरातल्या महिला साक्षरतेचे धडे गिरवू लागल्या. महिलांनी शिकणं किंवा शिकवणं, हा त्या काळातला धाडसी निर्णय असला तरी सावित्रीबाईंसाठी तो समाजप्रबोधनाचा प्रामाणिक प्रयत्न होता. पण, समाज साक्षर झाला तर आपलं कसं होणार? या विकृतीने पछाडलेल्या प्रवृत्तीने त्यांच्यावर दगड-धोंडे आणि शेणाचा मारा केला. त्यांच्या कार्यात अनेक विघ्न आणण्याचा प्रयत्न केला.

त्यांचा विवाह जरी बालवयात झाला असला, तरी ते सत्य कुरवाळत न बसता त्यांनी बालविवाहाविरुद्ध आवाज उठवला. सत्यशोधक समाज उभा करून अस्पृश्यांसाठी घरातला हौद खुला केला. स्त्रियांना केशवपनाची बंदी झुगारून देण्याचा संदेश दिला. कित्येक विधवांचे पुनर्विवाह पुरोहिताशिवाय अतिशय कमी खर्चात घडवून आणले, त्यासाठी त्यांना तथाकथित सुज्ञ प्रवृत्तींकडून बहिष्कार सहन करावा लागला.

सावित्रीबाई फक्त शिक्षिका नव्हत्या, त्या कवयित्री होत्या, लेखिका होत्या. काव्यफुले हा त्यांचा एखाद्या महिलेने लिहिलेला पहिला काव्यसंग्रह मानला जातो. शिक्षणाचं महत्त्व, •➤पान २ वर





# कालव्याचे पाणी रोखाल तर घेराव घालू!

**● आंबेवाडी-निवी कालव्याच्या दुरुस्तीची मागणी ● डिसेंबरअखेर पाणी सोडण्याचे अधिकाऱ्यांचे आश्वासन ● बळीराजा फाउंडेशनचे प्रशासनाला निवेदन**



। धाटाव । प्रतिनिधी ।

रायगड जिल्ह्यातील आंबेवाडी ते निवी कालव्याची दुरुस्ती व साफसफाई तातडीने करून डिसेंबरअखेर पाणी पूर्ववत सोडावे, अन्यथा पुन्हा आंदोलन छेडून अधिकाऱ्यांना घेराव घालण्यात येईल, असा इशारा बळीराजा फाऊंडेशनचे अध्यक्ष विठ्ठल मोरे यांनी दिला आहे. याबाबत गुरुवारी (दि. १५) कोलाड पाटबंधारे विभागाच्या अधिकाऱ्यांना निवेदन देण्यात आले. दरम्यान, सोमवारपासून कालव्याच्या साफसफाईला सुरुवात करून महत्त्वाची दुरुस्तीची कामे महिनाभरात पूर्ण करण्यात येतील आणि डिसेंबरअखेर पाणी सोडले जाईल, असे आश्वासन अधिकाऱ्यांनी दिले.

आंबेवाडी ते निवी कालव्याच्या पाण्यासाठी बळीराजा फाउंडेशन गेल्या पाच-सहा वर्षांपासून सातत्याने आंदोलन करीत आहे. मागील दोन वर्षांत कालव्याला अंशतः पाणी सोडण्यात आल्याने परिसरातील शेती, भाजीपाला व्यवसाय आणि विहिरींना फायदा झाला. मात्र, संभे, पाले आदी ठिकाणी कालव्याच्या अस्तरीकरणाची कामे अपूर्ण असून, मोठ्या प्रमाणात पाणी वाया जात आहे. बारसोली ड्रेनेजची साफसफाई, प्रलंबित दुरुस्तीची कामे पूर्ण करणे, निकृष्ट कामांची चौकशी आणि दोषी ठेकेदारांना काळ्या यादीत टाकून संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याची मागणी निवेदनातून करण्यात आली आहे.

यावेळी फाऊंडेशनचे संस्थापक राजेंद्र जाधव यांनी, कालव्यावर कोट्यवधी रुपये खर्च झाले असून, पाणी हा शेतकऱ्यांचा हक्क आहे, तो कोणीही रोखू शकत नाही, अशी ठाम भूमिका मांडली. अभियंता सचिन कदम यांनी साफसफाई व दुरुस्तीची कामे वेळेत पूर्ण करण्याचे आश्वासन दिले. कार्यकारी अभियंता राकेश धाकतोडे यांनीही दूरध्वनीवरून डिसेंबरअखेर पाणी सोडले जाईल, असा विश्वास व्यक्त केला. पुढील आठवड्यात कालव्याच्या कामाची पाहणी करण्यात येणार आहे.

यावेळी अध्यक्ष विठ्ठल मोरे, संस्थापक राजेंद्र जाधव, ॲड. सचिव दीपक भगत, उपाध्यक्ष तुकाराम भगत, महेश कांबळे, शरद जाधव, जितेंद्र जाधव आणि भूषण मोरे यांच्यासह पदाधिकारी उपस्थित होते. डिसेंबरअखेर पाणी सोडण्याच्या आश्वासनामुळे संभे, पाले, वाशी, लांढर, बोरघर आणि तळाघर परिसरातील शेतकऱ्यांना दिलासा मिळाला आहे.

पान १ वरुन

## शेतकऱ्यांची चेष्टा !

आता पिकांचे नुकसान झाल्याने उत्पन्नाची आशा मावळली असून, कृषी सेवा केंद्रांचे दुकानदार उधारी वसूल करण्यासाठी तगादा लावत आहेत. अशा परिस्थितीत पाच हजार रुपयांच्या मदतीतून उत्पादन खर्चाची भरपाई होणेही शक्य नाही. अग्रीम मदतीच्या नावाखाली जाहीर केलेली रक्कमच अंतिम मदत ठरण्याची भीती किसान सभेने व्यक्त केली आहे. त्यामुळे प्रत्यक्ष नुकसानीचा आढावा घेऊन शेतकऱ्यांना पुरेशी भरपाई द्यावी, अशी मागणी करण्यात आली आहे.दुष्काळ, कर्जमाफी, पीक विमा, वनहक्क, देवस्थान आणि गायरान जमिनींसह शेतकऱ्यांच्या विविध प्रश्नांवर अखिल भारतीय किसान सभेने राज्यव्यापी आंदोलनाची घोषणा केली आहे. २६ ऑक्टोबर रोजी राज्यातील हजारो शेतकरी वाहन मोर्चाने अकोले येथून मुंबईच्या दिशेने रवाना होणार असून, २७ ऑक्टोबरपासून आझाद मैदानावर महामुक्काम सत्याग्रह करण्यात येणार आहे. या आंदोलनाचे नेतृत्व डॉ. अशोक ढवळे, जे. पी. गावीत, डॉ. अजित नवले, यशवंत झाडे आणि उमेश देशमुख करणार आहेत. आंदोलनाची माहिती अखिल भारतीय किसान सभा महाराष्ट्र राज्य कमिटीचे राज्य सहसचिव संजय ठाकूर आणि सदस्य रामचंद्र म्हात्रे यांनी दिली. दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना तुटपुंजी मदत देण्याऐवजी त्यांच्या नुकसानीची योग्य भरपाई द्या, थकीत हप्ते जमा करा आणि कर्जाच्या संकटातून बाहेर काढण्यासाठी ठोस निर्णय घ्या, अशी मागणी करत किसान सभेने सरकारविरोधातील आंदोलनाची भूमिका स्पष्ट केली आहे.

**थकीत हप्ते रोखून कसला दिलासा?**

प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजनेतून वर्षाला सहा हजार रुपये, तर नमो शेतकरी महासन्मान निधी योजनेतून आणखी सहा हजार रुपये दिले जातात. किसान सभेच्या माहितीनुसार, २५ मार्च २०२६ रोजी नमो शेतकरी योजनेचा आठवा हप्ता ८९ लाख ७५ हजार २९८ शेतकरी कुटुंबांच्या खात्यांत जमा करण्यात आला होता. त्यानंतरचे नववे आणि दहावे हप्ते रखडल्याचा दावा सभेने केला आहे. या दोन हप्त्यांपोटी पात्र शेतकऱ्यांना प्रत्येकी चार हजार रुपये मिळणे बाकी असल्याचे सांगत, सरकारने आधी थकीत रक्कम जमा करावी, अशी मागणी करण्यात आली आहे. शेतकऱ्यांचे हक्काचे पैसे थकवायचे आणि पाच हजारांची मदत जाहीर करून श्रेय घ्यायचे, हा कोणता न्याय, असा सवाल किसान सभेने उपस्थित केला आहे.

**लाडक्या बहिणींच्या पैशांचे काय?**

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेतील लाभार्थ्यांची संख्या सुमारे २.४७ कोटींवरून १.६६ कोटींवर आल्याचा मुद्दाही किसान सभेने उपस्थित केला आहे. सुमारे ८१ लाख लाभार्थी कमी झाल्याच्या पार्श्वभूमीवर पात्र महिलांच्या प्रलंबित लाभांबाबत सरकारने स्पष्टता द्यावी, अशी मागणी करण्यात आली आहे. ई-केवायसी आणि पात्रता पडताळणीची प्रक्रिया पूर्ण करून पात्र महिलांना त्यांचे पैसे मिळतील, याची खात्री सरकारने करावी, असे सभेचे म्हणणे आहे.

**पीक विम्याच्या रकमेइतकी भरपाई द्या!**

नैसर्गिक आपत्तीमुळे पिकांचे नुकसान झाल्यानंतर केवळ बियाणे आणि खतांसाठीची तुटपुंजी मदत पुरेशी ठरत नाही. सोयाबीन, कापूस, तूर, मका यांसह अन्य पिकांचे प्रत्यक्ष नुकसान लक्षात घेऊन भरपाई मिळाली पाहिजे. संबंधित पिकांसाठी प्रधानमंत्री पीक विमा योजनेत निश्चित केलेली संरक्षित रक्कम हा किमान भरपाईचा आधार मानावा, अशी मागणी किसान सभेने केली आहे. दरम्यान, कर्जमाफीची घोषणा होऊनही पात्र शेतकऱ्यांच्या खात्यांत रक्कम जमा होण्यास विलंब होत असल्याचा आरोप करण्यात आला आहे. नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना केवळ ५० हजार रुपयांच्या अनुदानापुरते मर्यादित ठेवण्यात आल्याने त्यांच्यातही नाराजी असल्याचे सभेने म्हटले आहे. कर्जमाफीची रक्कम वेळेत न मिळाल्यास पुढील हंगामासाठी पीक कर्ज मिळण्यात अडचणी निर्माण होऊ शकतात.

## फटाके, डीजे, डॉल्बीला न्यायालयाचा दणका!

न्यायमूर्ती गिरीश एस. कुलकर्णी आणि न्यायमूर्ती नीला के. गोखले यांच्या खंडपीठासमोर या प्रकरणाची सुनावणी झाली. फटाक्यांच्या निर्मितीवर किंवा विक्रीवर बंदी घालण्यात आलेली नाही. या व्यवसायावर अनेक गरीब कुटुंबांची उपजीविका अवलंबून असल्याने न्यायालयाने हा मुद्दा स्पष्ट केला. मात्र, फटाके योग्य आणि निर्धारित ठिकाणीच फोडले जातील, याची जबाबदारी प्रशासनावर सोपवण्यात आली आहे. पर्यावरणपूरक फटाक्यांचा वापर आणि हरित दिवाळीबाबत व्यापक जनजागृती करण्याचे, त्यासाठी सेलिब्रिटींची मदत घेण्याचे निर्देशही न्यायालयाने दिले.

मुंबई, ठाणे, पुणे आणि नाशिक यांसारख्या दाट लोकवस्तीच्या शहरांमध्ये ध्वनी आणि वायुप्रदूषणाचा प्रश्न गंभीर बनला आहे. सण-उत्सव शांततेत साजरे होऊ शकत नाहीत, असे चित्र निर्माण होणे योग्य नसल्याचे निरीक्षण न्यायालयाने नोंदवले. राज्य सरकार परिस्थिती नियंत्रणात असल्याचे चित्र मांडत असले, तरी प्रत्यक्ष स्थिती वेगळी असल्याची नाराजीही न्यायालयाने व्यक्त केली.

**नियम मोडणाऱ्यांची खैर नाही!**

सण-उत्सवांच्या मिरवणुकांमध्ये ध्वनिप्रदूषणाच्या नियमांचे उल्लंघन रोखण्यासाठी न्यायालयाने अनेक उपाय सुचवले आहेत. ध्वनिक्षेपकांसाठी परवानगी देताना मंडळे किंवा संस्थांकडून किमान एक लाख रुपये, तर व्यक्तींकडून ५० हजार रुपये अनामत रक्कम घेण्याची सूचना करण्यात आली आहे. परवानगी मिळालेल्या ठिकाणी सर्वांना दिसेल अशा पद्धतीने डेसिबल मीटर लावणे आणि साउंड सिस्टीममध्ये अंतर्गत साउंड लिमिटर बसवणे बंधनकारक करण्यावर भर देण्यात आला आहे. आयोजकांनी पोलिसांची परवानगी, जबाबदार व्यक्तींची नावे आणि मोबाईल क्रमांकही सार्वजनिकपणे प्रदर्शित करावेत, असे निर्देश आहेत. नियमांचे उल्लंघन झाल्यास केवळ दंड आकारून प्रकरण संपवू नये, तर भरलेली अनामत रक्कम आणि साउंड सिस्टीम जागीच जप्त करण्यासह कायदेशीर व फौजदारी कारवाई करावी, अशी भूमिका न्यायालयाने मांडली.

## भारतातल्या पहिल्या महिला शिक्षिका : सावित्रीबाई फुले

सामाजिक सुधारणा आणि निसर्गाबद्दलच्या कविता यात समाविष्ट आहेत. बावनकशी सुबोध रत्नाकरमधून त्यांनी स्त्रियांच्या वेदनांना वाचा फोडली. जोतिबांच्या प्रत्येक धाडसी पावलात सावित्रीबाई खांद्याला खांदा लावून उभ्या होत्या.

शिक्षणाची गंगा घराघरात नेण्यासाठी त्यांनी स्वतःच्या आयुष्याचाच वणवा पेटवला. त्यांचं शैक्षणिक क्रांतीकार्य चालू असताना १८९७ साली प्लेग या महाभयंकर रोगाने पुण्यात थैमान घातलं होतं. याच दरम्यान कडेवर प्लेगग्रस्त मुलाला उपचारासाठी घेऊन जाणाऱ्या सावित्रीबाईंना प्लेगची लागण झाली आणि त्यात त्यांचा अंत झाला. ज्ञानज्योत विझली असली तरी त्यांनी पेटवलेला वणवा आजही धगधगत आहे. शिक्षणाचा वणवा पेटवून स्वतःच्या आयुष्याची समीधा करणाऱ्या ज्ञानदुर्गा सावित्रीबाईंच्या चरणी नवरात्रीची सहावी माळ कृतज्ञतापूर्वक अर्पण.

## ‘शक्तीपीठ’च्या विरोधात मविआचा एल्गार

शिष्टमंडळाने जिल्हाधिकाऱ्यांची भेट घेऊन निवेदन दिले. यावेळी शेतकऱ्यांनी ‘एकच जिद्द, शक्तिपीठ रद्द’ आणि ‘जमीन आमच्या हक्काची, नाही कुणाच्या बापाची’ अशा घोषणा देत निदर्शने केली. शेतकऱ्यांची संमती नसताना शेकडो पोलिसांचा ताफा नेऊन मोजणी करणे लोकशाहीला धरून नाही. महसूल प्रशासनाची कामे आता पोलीस करत असल्याचे चित्र आहे, अशी टीका जयंत पाटील यांनी केली. दुष्काळ निवारणाला प्राधान्य देण्याऐवजी सरकार एका व्यक्तीच्या हट्टासाठी महामार्गाचा आग्रह धरत असल्याचा आरोपही त्यांनी केला.

## दीड महिन्यात ३५० भटक्या कुत्र्यांना पकडले

आल्या होत्या. या पार्श्वभूमीवर नागरिकांची सुरक्षितता लक्षात घेऊन नगरपालिकेने ही मोहीम हाती घेतली आहे.या मोहिमेची जबाबदारी मे. ओमकार बहुउद्देशीय सेवाभावी संस्था, पाथरी, जिल्हा परभणी यांच्याकडे सोपविण्यात आली आहे. संस्थेमार्फत भटक्या कुत्र्यांना पकडून त्यांच्यावर निर्बीजीकरणाची शस्त्रक्रिया तसेच रेबीज प्रतिबंधक लसीकरण करण्यात येत आहे.या मोहिमेची माहिती पेण नगरपालिकेचे मुख्याधिकारी जीवन पाटील यांनी प्रसारमाध्यमांशी संवाद साधताना दिली. उर्वरित कुत्र्यांवरील निर्बीजीकरण व लसीकरणाची प्रक्रिया लवकरच पूर्ण करण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले.

## फाईली कपाटात, पैसा खिशात?

जात आहे. जिल्हा परिषदेत विकासकामांच्या फाईल्सचा प्रवास नेमका कोणत्या टप्प्यावर अडतोय, असा प्रश्न उपस्थित होत असतानाच आता फाईल शोधून काढण्यासाठी तीन हजार रुपये घेतले जात असल्याची माहिती समोर आल्याचा दावा केला जात आहे. फाईल कपाटात पडून राहते आणि ती शोधून काढण्यासाठी अधिकाऱ्यांना पैसे द्यावे लागत असल्याची चर्चा सुरू झाल्याने प्रशासकीय कामकाजावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. या विलंबामागे आर्थिक देवाणघेवाणीचा संबंध असल्याची चर्चाही दबक्या आवाजात सुरू असल्याने जिल्हा परिषद वर्तुळात संशयाचे वातावरण निर्माण झाले आहे. जिल्हा परिषदेमार्फत ग्रामीण भागातील विविध विकासकामे, लाभार्थी योजना आणि समाजकल्याणाशी संबंधित उपक्रम राबविले जातात.

या कामांना प्रशासकीय मान्यता, आवश्यक स्वाक्षऱ्या आणि निधी वितरणाची प्रक्रिया वेळेत पूर्ण होणे अपेक्षित असते. मात्र, संबंधित कागदपत्रांवरील स्वाक्षऱ्या रखडल्यास पुढील कार्यवाहीवर परिणाम होऊ शकतो. त्यामुळे नेमक्या कोणत्या कामांच्या फाईल्स प्रलंबित आहेत आणि त्यामागील कारणे काय आहेत, याबाबत स्पष्टता आली नसून, अधिकाऱ्यांनी त्याबाबत बोलण्यात नकार दिला.

दरम्यान, संबंधित कामांबाबत निर्णय घेण्यास विलंब होत असल्यास त्याचा परिणाम लाभार्थी, स्थानिक संस्था आणि विकासकामांच्या अंमलबजावणीवर होण्याची शक्यता आहे. त्यामुळे प्रलंबित प्रस्तावांचा आढावा घेऊन त्यावर तातडीने निर्णय घेण्याची गरज व्यक्त होत आहे. स्वाक्षरी करण्यास होत असलेल्या कथित विलंबामागे आर्थिक देवाणघेवाणीचा मुद्दा असल्याचा आरोप काही स्तरांतून केला जात असल्याची चर्चा आहे. तथापि, या आरोपांना अद्याप स्वतंत्र पुष्टी मिळालेली नाही.

**अध्यक्षांची भूमिका काय?**

या प्रकरणात जिल्हा परिषद अध्यक्षांनी संबंधित कागदपत्रांवर स्वाक्षरी का केलेली नाही, कोणत्या कारणांमुळे प्रस्ताव प्रलंबित आहेत आणि त्याबाबत प्रशासनाकडून काही आक्षेप नोंदविण्यात आले आहेत का, हे स्पष्ट होणे आवश्यक आहे. संबंधित विभागांच्या अधिकाऱ्यांची भूमिका आणि प्रलंबित कामांचा तपशीलही समोर येणे गरजेचे आहे. विकासकामांच्या प्रक्रियेत अनावश्यक विलंब होत असल्यास त्याची जबाबदारी निश्चित करून कामे वेळेत पूर्ण करण्यासाठी प्रशासनाने पुढाकार घ्यावा, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे. आरोपांच्या पार्श्वभूमीवर जिल्हा परिषद प्रशासन या प्रकरणाची दखल घेऊन वस्तुस्थिती स्पष्ट करणार का, याकडे आता लक्ष लागले आहे.

## पोलिसांकडून गांजा जप्त

**नवीन पनवेल** : पनवेल शहर पोलिसांनी गांजा जप्त करत महिलेविरोधात १४ ऑक्टोबर रोजी गुन्हा दाखल केला. १४ ऑक्टोबर रोजी संध्याकाळी सातच्या सुमारास बंबावीपाडा एचपी पेट्रोल पंपाच्या बाजूला झोपडपट्टीतील एका झोपडीत पार्वती मोहन जाधव (राहणार बंबावी पाडा) ही महिला गांजा विक्री करत असल्याची माहिती पनवेल शहर पोलिसांना मिळाली. पोलिसांनी तिच्या झोपडीतून ४५४ ग्राम वजनाचा गांजा जप्त केला. कारच्या काचा फोडून दोन लाख ८५ हजाराची चोरी नवीन पनवेल : कारची काच फोडून कार मधील दोन लाख ८५ हजार रुपये चोरून नेल्याप्रकरणी खारघर पोलीस ठाण्यात १४ ऑक्टोबर रोजी गुन्हा दाखल करण्यात आला. सुमित पुगावकर (रा. नेरूळ सेक्टर ८) यांनी १२ ऑक्टोबर रोजी तीआरा कॉम्प्लेक्स, सेक्टर १३, खारघर येथे एर्टिगा कार पार्क केली होती. यावेळी अज्ञाताने कारची काच फोडून कार मधील रोख रक्कम चोरून नेली.

## चांदीचे दागिने आणि रोख रकमेची चोरी

नवीन पनवेल : घरात प्रवेश करून चोराने चांदीचे दागिने आणि रोख रक्कम चोरून नेल्याप्रकरणी खारघर पोलीस ठाण्यात १४ ऑक्टोबर रोजी गुन्हा दाखल करण्यात आला. विवेक कुंडे हे सेक्टर १०, घारघर येथे राहात असून, नऊ ऑक्टोबर रोजी ते घरी नसताना त्यांच्या घराच्या दरवाजाची कडी तोडून चोराने आत प्रवेश केला आणि कपाटात ठेवलेले चांदीचे दागिने आणि रोख रक्कम असा ९५ हजार पाचशे रुपयांचा मुद्देमाल चोरी करून नेला.


**मुरुड जंजिरा नगरपरिषद, जि. रायगड**
**ई- निविदा सुचना सन २०२६-२७**
**म्यु.जा.क्र. ७१५/ई-निविदा/मु.न.प.२०२६-२०२७**

मा. मुख्याधिकारी, मुरुड जंजिरा नगरपरिषद, जि. रायगड यांचेकडून १. मुरुड जंजिरा नगरपरिषद हद्दीतील हरीजन वाडा येथील रस्ता तयार करणे. या कामांची ई-निविदा मागविण्यात येत आहे. या कामासंबंधीचा सविस्तर तपशिल व अटी-शर्ती http://mahatenders.gov.in या वेबसाईटवर दिनांक १६/१०/२०२६ पासून उपलब्ध असून निविदा भरण्याचा अंतिम दिनांक २४/१०/२०२६ आहे.

दिनांक :- १५/१०/२०२६

सही/-
**मुख्याधिकारी**
**मुरुड जंजिरा नगरपरिषद**

**पनवेल महानगरपालिका**
**ता. पनवेल जि. रायगड**
कार्यालय आयुक्त मुख्यालय, २ रा मजला, देवाळे तलावाच्या समोर, गोखले हॉलच्या शेजारी, पनवेल - ४१०२०६
दुरध्वनी क्र- ०२२-२७४५८०४०/४१/४२ :
Email Id: panvelcorporation@gmail.com .

जा.क्र.पमपा/मातंवि/२१२६/प्र.क्र.०४/२८९/२०२६-२७ दिनांक : १५/१०/२०२६

**बाजारभाव मागविणेबाबत**

| अनु.क्र. | सुचना क्र. | कामाचे नाव |
|---|---|---|
| १. | जा.क्र. पमपा/मातंवि/२१२६/ प्र.क्र.०४/२८९/२०२६-२७ | पनवेल महानगरपालिका आंबेडकर भवन पनवेल येथील सभागृहात LED Pannel Screen बसविणेबाबत. |

सदर कामाबाबतची विस्तृत माहिती पनवेल महानगरपालिकेच्या माहिती व तंत्रज्ञान विभागात उपलब्ध आहे. सदरची दरपत्रके ही दि. १६/१०/२०२६ ते दि. २३/१०/२०२६ रोजी दुपारी ०३.०० वाजे पर्यंत माहिती तंत्रज्ञान विभागात जमा करावीत, संबंधित पुरवठादारांनी याची नोंद घ्यावी.

सही/-
**उप आयुक्त (मातंवि)**
पनवेल महानगरपालिका

एम एम आर डी ए MMRDA
**मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण**
(महाराष्ट्र शासन अंगिकृत)
वांद्रे-कुर्ला संकुल, वांद्रे (पू.), मुंबई-४०० ०५१.
दूरध्वनी क्र. ०२२-६५९६७४०३ वेबसाईट : https://mmrda.maharashtra.gov.in

**कार्यालयाकरीता जागा हवी आहे**

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाला, फर्निचरसह सुमारे ५००० चौ.फुट (+/- १०% तफावत स्वीकार्य) अशी रायगड जिल्ह्यातील, पेण शहरातील मध्यवर्ती भागात कार्यालयीन जागा/इमारत ६० महिन्यांच्या भाडेपट्टा कराराने प्रतिमहा भाडेतत्त्वावर हवी आहे.
सविस्तर जाहिरातीसाठी : **https://mmrda.maharashtra.gov.in** या संकेतस्थळाला भेट द्यावी.
आवश्यकता असल्यास, अधिक माहितीसाठी डॉ. प्रियंका पाटील, पदनाम: भूमी व मिळकत व्यवस्थापक, यांच्याशी दूरध्वनी क्र. ०२२-६५९६७४०३ अथवा **land@mailmmrda.maharashtra.gov.in** येथे संपर्क साधावा.
**टीप :-** प्रस्ताव स्वीकारणे/नाकारणे अथवा कोणतेही कारण न देता प्रक्रिया रद्द करण्याचे सर्वस्वी अधिकार प्राधिकरणाने आरक्षित केले आहेत.

**दिनांक :** १६.१०.२०२६
**स्थळ :** वांद्रे, मुंबई
**क्र.:** भू.व मि.शा./पेण कार्यालय/१८९०/२०२६.

**सही/-**
**(उप महानगर आयुक्त)**
**मुं.म.प्र.वि.प्रा.**

**ग्रुप ग्रामपंचायत देगाव, ता.माणगांव, जि.रायगड. जाहीर निविदा सूचना**

देगाव यांचेकडील जिल्हा क्रीडा निधी अंतर्गत खालील कामांकरिता अधिकृत ठेकेदार/पुरवठादार यांचेकडून जाहीर निविदा मागविणेत येत आहेत.

| अ. क्र. | कामांचे नांव | अंदाजित रक्कम | इसारा फी | निविदा फी | निविदा स्विकारण्याचा अंतिम दिनांक | निविदा उघडणेचा दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | मौजे रिळे येथे व्यायामशाळा बांधणे | ५.६० लक्ष | ५६०० | २००/- | २३/१०/२०२६ | २६/१०/२०२६ |

**अटी व शर्ती :-** १) निविदा संबधी सविस्तर माहिती ग्रामपंचायत कार्यालयात कार्यालयीन वेळेत पहावयास मिळेल. २) निविदा स्विकृती अंतिम दि. २३/१०/२०२६ असून अपूर्ण व उशिरा पोहचलेल्या निविदांचा ग्रामपंचायत विचार करणार नाही. ३) निविदेसोबत अनामत रक्कम भरणा पावती/चलन जोडलेली असावी. ४) कोणतेही कारण न देता एक किंवा सर्व निविदा नाकारण्याचा अधिकार ग्रामपंचायतीने राखून ठेवला आहे. ५) कामाच्या अंदाजपत्रकानुसार काम करणे बंधनकारक राहील. ६) निविदा मंजुरीअंती ठेकेदार/ पुरवठादार यांस रीतसर करारनामा करून द्यावा लागेल. ७) कार्यारंभ आदेश प्राप्त झाल्यापासून विहित केलेल्या मुदतीचे कालावधीत काम पूर्ण करणे बंधनकारक राहील. अन्यथा नियमानुसार दंड व शास्ती लागू करणेत येईल. ८) साहित्य/वस्तू यांचा दर्जा व गुणवत्ता चांगली असावी. ९) शासनाकडून प्राप्त निधीच्या उपलब्धतेनुसार देयके अदा केली जातील. १०) नोंदणीकृत ठेकेदार उपलब्ध न झाल्यास स्थानिक ठेकेदारांचे निविदांचा विचार केला जाईल. ११) ठेकेदार/पुरवठादार यांचे बँक खाते राष्ट्रीयकृत बँकेत असावे व PFMS प्रणालीशी संलग्न असावे. १२) कामाच्या देयकातून सर्व शासकीय कपाती वजा करून देयक अदा केले जाईल. १३) मा. उपअभियंता (ग्रा.पा.पु/बांध.) उपविभाग माणगांव यांचे तांत्रिक मार्गदर्शनानुसार व मा. सरपंच ग्रामपंचायत देगाव यांचे देखरेखीखाली कामे पूर्ण करावयाची आहेत.

सही/-
**ग्रामपंचायत अधिकारी**
**ग्रुप ग्रामपंचायत देगांव**
**ता.माणगांव जि.रायगड**

सही/-
**सरपंच**
**ग्रुप ग्रामपंचायत देगांव**
**ता.माणगांव जि.रायगड**

**जाहीर नोटीस**

सर्व नागरीकांना या जाहीर नोटीसीद्वारे सुचित करण्यात येते की, आमचे अशिल श्री.ओम किशोर गायकर यांनी मौजे भातगाव, ता.कर्जत, जि.रायगड येथील खालील वर्णन केलेली मिळकत सदर मालक यांचे नावे असलेले क्षेत्र खालील प्रमाणे विकत घेण्याचे ठरविले आहे. त्या मिळकतीचे वर्णन खालील प्रमाणे:-

**मिळकतीचे वर्णन : मौजे भातगाव, ता. कर्जत, जि. रायगड**

| मालकाचे नाव | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र (हे.आर.पॉ) | आकार (रु.पै) |
|---|---|---|---|---|
| श्री.संपत गणपत घरत | २ | १ | ०-३२-४० | ३-६९ |

वरील मिळकती या आमचे अशिलांस विकत देणेचे ठरविले आहे. तरी वर वर्णन केलेल्या मिळकतीबाबत इतर दुसरे कोणाचा साठे करार, ताबा कब्जा, कुळवहीवाट, गहाण, दान, बक्षीसपत्र, फरोक्त, चार्ज, लिज, अटॅचमेंट, लिएन वगैरे अथवा अन्य इतर कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास हि जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ०७ दिवसांचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांजकडे प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह लेखी हरकत कळवावी. मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकत ही निर्वेध आहे असे गृहीत धरून आमचे अशिल खरेदी खताचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून येणारी हरकत आमचे अशिलावर बंधनकारक राहणार नाही.

कळावे.
दि. १६/१०/२०२६
**ॲड. निलेश रखमाजी पादीर**
मोबा नं. ९७६७६३७१००/९२७२५६२१५८.
ॲड. हरिचंद्र अनंता हिंदोळा
मोबा नं. ७७७६८१८९४७/९८३४४८२१०८

**ॲड. दिपक रखमाजी पादीर**
मु.पो.नेरळ (मोहाचीवाडी),
ता. कर्जत, जि. रायगड
मो-९८५०७६७५६८

**जाहिर नोटीस**

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिल श्री निवृत्ती राम दास तायडे व श्री.निलेश निवृत्ती तायडे, दोघे रा. ए/१, विघ्नहर्ता को. ऑ.हौ. सोसायटी लि., यशोधन लोकमान्य नगर, देवेंद्र इंडस्ट्रीयल समोर, ठाणे (प.), ठाणे, ४००६०६, यांनी खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली जमिन मिळकत, त्या मिळकतीचे विद्यमान मालकांकडुन कायम खरेदी घेण्याचे ठरविलेले आहे.

**मिळकतीचे वर्णन : मौजे बोरगांव, ता. कर्जत, जि. रायगड, येथील जमिन मिळकत.**

| स.नं./ हि.नं. | क्षेत्र (हे.आर.पॉ.) | आकार (रू.पै.) |
|---|---|---|
| ७३/५ | ३.५६.००<br>पो.ख ०.२५.००<br>एकुण ३.८१.०० | २.४८ |

यापैकी सौ. कोमल प्रमोद लंभाते व श्री. प्रमोद पोपट लंभाते यांच्या नावे असलेल्या ०.६४.०० हे.आर.पॉ. क्षेत्रापैकी विक्री केलेले क्षेत्र ०.१६.०० हे.आर.पॉ.

वरील वर्णनाच्या शेतजमिन मिळकतीच्या संदर्भात अन्य कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा गहाण, दान, साठेकरार, करारनामा, विकसन करारनामा, मुखत्यारपत्र, विसारपावती, खरेदीखत, कुळ, सहभागीदार, वहिवाटदार, भाडेकरार, जागा वापर परवाना, पोटगी, लीज, लीन आदी कोणत्याही प्रकारे हक्क, हितसंबंध असल्यास व त्यांची हरकत असल्यास त्यांनी योग्य त्या कागदोपत्री पुराव्यानिशी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन होणाऱ्या १४ (चौदा) दिवसांच्या मुदतीत खालील सही करणार यांजकडे लेखी स्वरूपात कळवावी. येणे प्रमाणे विहीत मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास सदरची मिळकत निर्वेध व बोजारहित आहे असे समजुन आमचे अशिल सदर मिळकतीच्या खरेदी विक्रीचा व कायदेशीर हस्तांतराचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची सर्वांनी नोंद घ्यावी.

कर्जत
दिनांक :- १६/१०/२०२६.

सही / -
**ॲड. उषा जे. कांबळे.**
कर्जत, ''पुष्प विमल'' निवास,
नानामास्तरनगर, मुद्रे.
मो. नं. ७३८५००४८०६.

**जाहीर नोटीस**

तमाम जनतेस या नोटीसद्वारे कळविण्यात येते की, मौजे-कार्ले, ता. अलिबाग, जि. रायगड खालील नमुद वर्णनाची शेतजमिन मिळकत श्री. रघुनाथ शिवराम पाटील, रा.मु. कार्ले, पो.खंडाळे, ता.अलिबाग, जि.रायगड यांच्या मालकीची असून सदरील शेतजमिन मिळकत सदर मिळकतीच्या विद्यमान मालकांकडून माझे अशिलांनी कायमस्वरूपी खरेदी करण्याचे मान्य व कबुल केले आहे. सदर जमिन मिळकत पूर्णतः निर्वेध व बिनजोखमी असल्याबाबतचा हवाला सदर मिळकतीच्या विद्यमान मालकांनी माझे अशिलांस दिला आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भूमापन क्रमांक व उपविभाग | एकूण क्षेत्र (हे.आर.) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|---|
| कार्ले, ता.अलिबाग | १६७/१ | क्षेत्र ०-३४-४०<br>पो.ख.०-०९-१०<br>एकूण क्षेत्र ०-४३-५० | ८.५६ |

वर नमुद मिळकतीबाबत अन्य कुणाचाही कसलाही हक्क, हितसंबंध, बोजा, अथवा गहाणखत, दान, लीज, पोटगी, हवाला, साठेकरार, खरेदी, मेन्टेनन्स, मेहेर, कर्ज वगैरे बाबत हरकत असल्यास अशा व्यक्तींनी ही सूचना प्रसिद्ध झाल्या दिनांकापासून चौदा (१४) दिवसांचे अवधीत माझ्याकडे लेखी पुराव्यानिशी देऊन माझी खात्री पटवून द्यावी. विहित मुदतीत अशी कोणतीही लेखी हरकत न आल्यास माझे अशिल त्यांचा सदर मिळकतीचा खरेदी व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत माझे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही, याची कृपया सर्वांनी नोंद घ्यावी.

अलिबाग
दिनांक १५/१०/२०२६

सही /-
**ॲड. प्रविण कृष्णा झेंडेकर**
मु. शिंत्रेगल्ली, पो.आक्षी,
ता.अलिबाग, जि.रायगड
खरेदीदाराचे वकील
मो.९०११३६२८६७

**जाहीर नोटीस**

सर्व लोकांस या जाहिर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णन केलेली मिळकत ही मिळकतीचे विद्यमान मालक शिल्पा प्रताप गंभीर या विद्यमान मालकांची खाली वर्णन केलेली मिळकत ही आमचे अशिलांनी कायम विकत घेण्याचे ठरविले आहे व तशी त्यांनी बोलणी केलेली आहेत. विकत घेणाऱ्या मिळकतीचे वर्णन खालील प्रमाणे :

**मिळकतीचा तपशिल**

| अनु. क्र | मौजे | भुमापन क्र. व उपविभाग | क्षेत्र हे.आर | आकार रू. पै |
|---|---|---|---|---|
| १) | ऊसर्ली बुद्रुक ता.पनवेल | ६२/४ | ०-१४-९० | १.५६ |

वर वर्णन केलेल्या मिळकतीचे एकुण क्षेत्र हे या जाहिर नोटीसीचा विषय आहे.

सदर वर वर्णन केलेली मिळकत ही वर वर्णन केलेल्या विद्यमान मालकांची खुद्द मालकीची व ताब कब्जा वहीवाटीची आहे. सदर मिळकत ही निर्वेध व बोजारहीत असल्याचा दावा विद्यमान मालकांनी आमच्या अशिलांना केलेला आहे.

तरी वरील मिळकतीच्या बाबतीत कोणाचाही ताबा कब्जा, कुळवहिवाट, बयाणा पावती, साठेकरार, गहाण, बोजा, बक्षिस, दान, जप्ती, लिज, वहिवाट अथवा अन्य कसलाही प्रकारचा हक्क, अधिकार व हितसंबंध असल्यास हि नोटीस प्रसिद्ध झालेपासून १४ (चौदा) दिवसांच्या आत खाली सही करणार यांच्याकडे आपल्या हरकती कागदोपत्री पुराव्यासह सादर कराव्यात. अन्यथा मुदतीत हरकत न आल्यास वरील मिळकत निर्वेध व बोजारहित आहे असे गृहित धरुन सदरचा व्यवहार आमचे अशिल पुर्ण करतील व मागाहून आलेली हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची तमाम जनतेने नोंद घ्यावी.

अलिबाग:
दिनांक १५/१०/२०२६

ॲडव्होकेट
**ॲड.कांचन प्रशांत नार्वेकर**
मु.ॲकॉन क्लासिक, फ्लॅट नं.१०६,
जिल्हा न्यायालय रायगड समोर अलिबाग, रायगड
C/O ॲड. प्रविण एस, म्हात्रे
फ्लॅट नं. ४०३, ४ फ्लोर, बी विंग,
योगेश्वर कृपा सीएचएस दत्तमंदीरा जवळ
ठाणा नाका रोड, ता. पनवेल जि. रायगड
मो.९८५०७५०८३४

**जाहीर नोटीस**

सर्व लोकांस या जाहिर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णन केलेली मिळकत ही मिळकतीचे विद्यमान मालक नंदा बाळाराम आरीवले, आणि वगैरे या विद्यमान मालकांची खाली वर्णन केलेली मिळकत ही आमचे अशिलांनी कायम विकत घेण्याचे ठरविले आहे व तशी त्यांनी बोलणी केलेली आहेत. विकत घेणाऱ्या मिळकतीचे वर्णन खालील प्रमाणे :

**मिळकतीचा तपशिल**

| अनु. क्र | मौजे | भुमापन क्र. व उपविभाग | क्षेत्र हे.आर | आकार रू. पै |
|---|---|---|---|---|
| १) | ऊसर्ली बुद्रुक ता. पनवेल | ६३/५ | ०-१७-०० | ०.०० |

वर वर्णन केलेल्या मिळकतीच्या एकुण क्षेत्रापैकी विद्यमान मालकांचे असणारे अविभाज्य सामाईक हिस्याचे क्षेत्र हे या जाहिर नोटीसीचा विषय आहे.

सदर वर वर्णन केलेली मिळकत ही वर वर्णन केलेल्या विद्यमान मालकांची खुद्द मालकीची व ताब कब्जा वहीवाटीची आहे. सदर मिळकत ही निर्वेध व बोजारहीत असल्याचा दावा विद्यमान मालकांनी आमच्या अशिलांना केलेला आहे.

तरी वरील मिळकतीच्या बाबतीत कोणाचाही ताबा कब्जा, कुळवहिवाट, बयाणा पावती, साठेकरार, गहाण, बोजा, बक्षिस, दान, जप्ती, लिज, वहिवाट अथवा अन्य कसलाही प्रकारचा हक्क, अधिकार व हितसंबंध असल्यास हि नोटीस प्रसिद्ध झालेपासून १४ (चौदा) दिवसांच्या आत खाली सही करणार यांच्याकडे आपल्या हरकती कागदोपत्री पुराव्यासह सादर कराव्यात. अन्यथा मुदतीत हरकत न आल्यास वरील मिळकत निर्वेध व बोजारहित आहे असे गृहित धरुन सदरचा व्यवहार आमचे अशिल पुर्ण करतील व मागाहून आलेली हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची तमाम जनतेने नोंद घ्यावी.

अलिबाग :
दिनांक १५/१०/२०२६

ॲडव्होकेट
**ॲड.कांचन प्रशांत नार्वेकर**
मु.ॲकॉन क्लासिक, फ्लॅट नं.१०६,
जिल्हा न्यायालय रायगड समोर अलिबाग, रायगड
C/O ॲड. प्रविण एस, म्हात्रे
फ्लॅट नं. ४०३, ४ फ्लोर, बी विंग,
योगेश्वर कृपा सीएचएस दत्तमंदीरा जवळ
ठाणा नाका रोड, ता. पनवेल जि. रायगड
मो.९८५०७५०८३४

# पेणमध्ये बांधकाम व्यावसायिकांची मनमानी

■ राष्ट्रीय महामार्गाच्या जागेत मातीच्या भरावाचा अडथळा
■ महावीर मार्गावरील बांधकामाचा नागरिकांना त्रास

| पेण | प्रतिनिधी |

पेण शहरात विकासाच्या नावाखाली बांधकामांचा धडाका सुरू असताना, काही बांधकाम व्यावसायिकांच्या बेशिस्त कारभारामुळे सर्वसामान्य नागरिक मात्र त्रस्त झाले आहेत. नियम धाब्यावर बसवून रात्री उशिरापर्यंत सुरू असलेली कामे, रस्त्यांवर पसरलेला मातीचा चिखल आणि रात्रीच्या अंधारात करण्यात येणारे खोदकाम यामुळे शहरातील बांधकामांच्या कार्यपद्धतीवर गंभीर प्रश्न उपस्थित होत आहेत. विशेष म्हणजे, नागरिकांनी वारंवार तक्रारी करूनही परिस्थितीत सुधारणा होत नसेल, तर प्रशासन नेमके कोणाच्या हिताचे रक्षण करत आहे, असा संतप्त सवाल उपस्थित होत आहे.



## अपघात झाल्यावर जबाबदारी कोणाची?

पेण शहरात विकासकामे झालीच पाहिजेत; मात्र विकासाच्या नावाखाली नागरिकांच्या सुरक्षिततेशी खेळण्याचा अधिकार कोणालाही नाही. रात्री उशिरापर्यंत काम सुरू ठेवण्याबाबत लागू असलेल्या नियमांचे पालन होते आहे का, खोदकामासाठी आवश्यक परवानग्या आहेत का आणि राष्ट्रीय महामार्गाच्या जागेत करण्यात आलेल्या कथित भरावाला अधिकृत मान्यता आहे का, याची सखोल चौकशी होणे आवश्यक आहे.

पेणमधील महावीर मार्गावर एका विकासकाचे मोठ्या प्रमाणावर बांधकाम सुरू आहे. या ठिकाणी रात्री दोन ते तीन वाजेपर्यंत काम सुरू राहत असल्याचा आरोप नागरिकांकडून केला जात आहे. रात्रीच्या शांततेत सुरू असलेल्या या कामांमुळे परिसरातील रहिवाशांना त्रास सहन करावा लागत आहे. शेजारी राहणाऱ्या नागरिकांनी अनेकदा तक्रारी करूनही संबंधित कामाच्या पद्धतीत सुधारणा झालेली नसल्याचे सांगितले जात आहे. त्यामुळे नागरिकांच्या तक्रारींना प्रशासनाच्या लेखी काहीच किंमत आहे की नाही, असा प्रश्न निर्माण झाला आहे. या प्रकरणात काल रात्री घडलेल्या प्रकारामुळे संतापात आणखी भर पडली आहे. नागरिकांच्या म्हणण्यानुसार, रात्रीच्या अंधाराचा फायदा घेत खोदकाम करण्यात आले आणि त्यातून निघालेली माती व इतर साहित्य राष्ट्रीय महामार्गाच्या जागेत टाकून भराव करण्यात आला. हा प्रकार नेमका कोणाच्या परवानगीने करण्यात आला? संबंधित जागेवर भराव करण्याची अधिकृत परवानगी होती का? तसेच खोदकाम आणि माती वाहतुकीसाठी आवश्यक नियमांचे पालन करण्यात आले का? या प्रश्नांची उत्तरे प्रशासनाने देणे गरजेचे आहे. राष्ट्रीय महामार्गाच्या जागेचा वापर अशा प्रकारे केला जात असल्याचा आरोप खरा असल्यास, संबंधित यंत्रणांनी तातडीने स्थळपाहणी करून वस्तुस्थिती स्पष्ट करणे आवश्यक आहे. मात्र, या संपूर्ण प्रकाराकडे संबंधित प्रशासनाचे दुर्लक्ष होत असल्याचा आरोप नागरिकांकडून केला जात आहे. या बांधकामामुळे केवळ परिसरातील रहिवासीच नव्हे, तर रस्त्यावरून ये-जा करणाऱ्या नागरिकांनाही त्रास सहन करावा लागत आहे. महावीर मार्गापासून अंतोरा फाट्यापर्यंत रस्त्यावर मोठ्या प्रमाणात माती पसरल्याने रस्त्याची अवस्था बिकट झाली आहे. वाहनांच्या वर्दळीमुळे ही माती पसरत असून, काही ठिकाणी चिखलाचे साम्राज्य निर्माण झाले आहे.

सकाळच्या वेळी शाळा-महाविद्यालयांत जाणारे विद्यार्थी, कामानिमित्त बाहेर पडणारे नागरिक आणि मॉर्निंग वॉकसाठी येणारे ज्येष्ठ नागरिक यांना या परिस्थितीचा मोठा त्रास सहन करावा लागत आहे. रस्त्यावर साचलेली माती आणि चिखलामुळे दुचाकी घसरून अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नाही. एखादा गंभीर अपघात घडल्यानंतरच प्रशासनाला जाग येणार का, असा सवाल उपस्थित होत आहे.

बांधकामांना परवानगी देताना नगरपालिका प्रशासनाकडून विविध अटी व शर्ती घालून दिल्या जातात. बांधकामादरम्यान सार्वजनिक रस्त्यांवर माती व बांधकाम साहित्य पडू न देणे, नागरिकांना त्रास होणार नाही याची काळजी घेणे आणि सुरक्षिततेच्या नियमांचे पालन करणे अपेक्षित असते. मात्र, महावीर मार्गावरील परिस्थिती पाहता या अटी-शर्तींची प्रत्यक्षात अंमलबजावणी होते आहे का, असा प्रश्न निर्माण झाला आहे. नगरपालिका प्रशासनाने संबंधित बांधकामाची पाहणी करून नियमभंग आढळल्यास कारवाई करावी. महसूल विभागाने उत्खनन आणि महसूल भरण्याबाबतची कागदपत्रे तपासावीत. रस्त्यावर पडलेली माती तातडीने हटवून रस्ता सुरक्षित करण्यासाठी संबंधितांना आदेश द्यावेत, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे. महावीर मार्गावरील या कथित नियमभंगाची निष्पक्ष चौकशी होऊन संबंधितांवर कारवाई होणार की नेहमीप्रमाणे कागदी घोडे नाचवून प्रकरण गुंडाळले जाणार, याकडे आता संपूर्ण पेणकरांचे लक्ष लागले आहे.

# निवडक

## अनंत पाटील यांचे निधन



**अलिबाग :** अलिबाग तालुक्यातील बेलकडे येथील शेतकरी कामगार पक्षाचे ज्येष्ठ कार्यकर्ते अनंत यशवंत पाटील यांचे सोमवारी (दि.१२) ऑक्टोबर रोजी वृद्धापकाळाने निधन झाले. निधनसमयी ते ८७ वर्षांचे होते. त्यांच्या पश्चात तीन मुलगे, सुना, नातवंडे, सहा भाऊ, दोन बहिणी असा मोठा परिवार आहे. बेलकडेचे माजी उपसरपंच सुहास पाटील यांचे वडील, तर स्नेहा पाटील यांचे ते सासरे होत. त्यांच्या पार्थिवावर बेलकडे येथील स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी बेलकडे ग्रामस्थ, नातेवाईक, शेकापसह विविध पक्षातील कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी उपस्थितांकडून त्यांना श्रद्धांजली वाहण्यात आली. त्यांचा दशक्रिया विधी बुधवार, दि. २१ ऑक्टोबर रोजी ९ वाजता, तर तेरावे शुक्रवार, दि. २३ ऑक्टोबर रोजी होणार असल्याचे कुटुंबियांकडून सांगण्यात आले.



## प्रभाकर पाटील सार्वजनिक वाचनालयात ‘वाचन प्रेरणा दिन’साजरा

**अलिबाग :** व्यक्तीगत विकासासाठी वाचन संस्कृती अत्यंत पोषक आहे. वाचनामुळेच सुसंस्कृत समाज वाढीस मदत होते. यासाठी समाजात वाचन संस्कृती वाढावी म्हणून देशभरात माजी राष्ट्रपती डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांचा जन्मदिवस ‘वाचन प्रेरणा दिन’ म्हणून साजरा करण्यात येत असल्याचे प्रतिपादन महाराष्ट्र शासनाचा ग्रंथमित्र पुरस्कार प्राप्त आणि प्रभाकर पाटील सार्वजनिक वाचनालय, अलिबागचे ज्येष्ठ संचालक नागेश कुलकर्णी यांनी केले. यावेळी माजी राष्ट्रपती डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या प्रतिमेला ग्रंथमित्र नागेश कुलकर्णी यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करण्यात आला. यावेळी आयोजित करण्यात आलेल्या पुस्तक प्रदर्शनाचे उद्घाटन ज्येष्ठ नागरिक अलिबाग संघटनेचे अध्यक्ष आर. के. घरत यांनी केले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक आणि आभार प्रदर्शन प्रभाकर पाटील सार्वजनिक वाचनालय व तालुका ग्रंथालयाच्या ग्रंथपाल ज्योती म्हात्रे यांनी केले.



## दिव्यांगांना प्रमाणपत्रे वाटप

**अलिबाग :** सेवा संकल्प अभियानांतर्गत जिल्हा शासकीय रुग्णालय, अलिबाग येथे ‘दिव्यांगजन सहयोग उपक्रम’ राबविण्यात आला. या उपक्रमांतर्गत जिल्हाधिकारी किशन जावळे यांच्याहस्ते १० दिव्यांग लाभार्थींना दिव्यांग प्रमाणपत्रे तर २ लाभार्थींना श्रवण यंत्रांचे वाटप करण्यात आले. वैद्यकीय शिक्षण विभागाच्या निर्देशानुसार ‘सेवा माझे योगदान’ या आरोग्यविषयक सेवा उपक्रमांतर्गत आयोजित करण्यात आलेल्या या शिबिराचा उद्देश दिव्यांग व्यक्तींना आवश्यक प्रमाणपत्रे उपलब्ध करून देणे, शासकीय योजनांचा लाभ मिळविण्यासाठी मार्गदर्शन करणे तसेच त्यांच्या आरोग्यविषयक आणि सामाजिक गरजांसाठी सहकार्य उपलब्ध करून देणे हा होता. दिव्यांग प्रमाणपत्रांमुळे पात्र लाभार्थींना विविध शासकीय योजना व सुविधांचा लाभ घेण्यास मदत होते. यावेळी जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. शीतल जोशी, जिल्हा समाज कल्याण अधिकारी श्रीमती मते, दिव्यांग विभागाचे साईनाथ पवार कार्यक्रमास संबंधित अधिकारी व कर्मचारी, दिव्यांग लाभार्थी व त्यांचे कुटुंबीय, रुग्णालयातील कर्मचारी, समुपदेशक, समाजसेवा अधीक्षक तसेच नर्सिंग कर्मचारी उपस्थित होते.

## गळफास घेऊन आत्महत्या

**नवीन पनवेल :** घराच्या दरवाजाला कडी लावून ओढणीच्या साह्याने गळफास घेतल्याचा प्रकार वलप, तालुका पनवेल येथे उघडकीस आला. याची नोंद पनवेल तालुका पोलीस ठाण्यात १३ ऑक्टोबर रोजी करण्यात आली. संजय शंकर इंगळे (वय-३४) व्यवसाय मासे विक्री याने राहत्या घरात दरवाजाला आतून कडी लावली आणि ओढणीच्या साहाय्याने गळफास घेतला. त्याच्या आत्महत्येचे कारण समजू शकलेले नाही.

# कलोते-रयती पूल धोकादायक स्थितीत

| रसायनी | प्रतिनिधी |

खालापूर तालुक्यातील कलोते येथून रयती गावाकडे जाणाऱ्या पुलाची अवस्था सध्या धोकादायक बनली आहे. पुलाला संरक्षक कठडे नसल्याने या मार्गावरून प्रवास करणाऱ्या नागरिकांना जीव मुठीत धरून प्रवास करावा लागत आहे. पुलाखालील लोखंडी सळया बाहेर आल्याने पुलाच्या सुरक्षिततेबाबतही चिंता व्यक्त केली जात आहे. त्यामुळे संबंधित प्रशासनाने या पुलाची तातडीने पाहणी करून आवश्यक दुरुस्ती करावी, अशी मागणी परिसरातील नागरिकांकडून होत आहे.

या पुलावरून रयती गावाच्या हद्दीतील व्यसनमुक्ती केंद्र, फार्म हाऊस तसेच आदिवासीवाड्यांमधील नागरिक आणि आसपासच्या परिसरातील ग्रामस्थांची नियमित ये-जा सुरू असते. त्यामुळे हा पूल परिसरातील नागरिकांसाठी महत्त्वाचा दळणवळणाचा मार्ग आहे. मात्र, पुलाला संरक्षक कठडे नसल्याने वाहनचालकांना विशेष काळजी घेऊन प्रवास करावा लागत आहे. रात्रीच्या वेळी तसेच पावसाळ्यात या मार्गावरून प्रवास करताना धोका अधिक वाढण्याची शक्यता आहे.

# चंदुकाका सराफ ज्वेल्सच्या अलिबाग शाखेचा शुभारंभ

■ रविवारी १८ ऑक्टोबरला होणार उद्घाटन

| अलिबाग | प्रतिनिधी |

दागिन्यांच्या क्षेत्रात दोनशे वर्षांची समृद्ध परंपरा जपणारे चंदुकाका सराफ ज्वेल्स आता आपल्या २५ व्या शाखेसह अलिबागमध्ये दाखल होत आहे. या नव्या शोरूमचा भव्य शुभारंभ रविवार (दि. १८) ऑक्टोबर रोजी सकाळी ११ वाजता संपन्न होणार आहे. परंपरा, विश्वास आणि उत्कृष्ट कारागिऱ्यांचा अनोखा संगम असलेले चंदुकाका सराफ ज्वेल्स हे नाव पिढ्यांपिढ्या ग्राहकांच्या विश्वासाचे प्रतीक राहिले आहे. आता अलिबागकरांना सोन्याचे, चांदीचे आणि हिऱ्यांचे पारंपरिक तसेच आधुनिक डिझाइन्समधील




दागिने एकाच छताखाली उपलब्ध होणार आहेत.

या शुभारंभानिमित्त अलिबागकरांसाठी खास आकर्षक ऑफर्स सादर करण्यात आल्या आहेत. सोन्याच्या दागिन्यांवर प्रति ग्रॅम केवळ ३.९९ टक्के ते ९.९९ टक्के मजुरी, हिऱ्यांच्या दागिन्यांच्या मजुरीवर १०० टक्केपर्यंत सूट, तसेच चांदीच्या दागिन्यांच्या मजुरीवर ३० टक्के सूट मिळणार आहे. या विशेष ऑफर्स १८ ऑक्टोबर ते १५ नोव्हेंबर २०२६ या कालावधीत लागू राहतील. अलिबागमधील मौजे चेंढरे येथे सुरू होणारे हे नवीन शोरूम ग्राहकांना आधुनिक-सुविधा, उत्कृष्ट सेवा आणि दर्जेदार दागिन्यांच्या विस्तृत संग्रहासह खरेदीचा अविस्मरणीय अनुभव देण्यासाठी सज्ज झाले आहे. या नव्या शाखेच्या माध्यमातून चंदुकाका सराफ ज्वेल्स अलिबागकरांशी आपले नाते अधिक दृढ करण्यास आणि आपल्या समृद्ध परंपरेचा वारसा नव्या ग्राहकांपर्यंत पोहोचविण्यास उत्सुक आहे. ग्राहकांना आधुनिक सुविधा आणि उच्च दर्जाच्या सेवेसह उत्कृष्ट खरेदीचा अनुभव देण्यासाठी आम्ही सज्ज आहोत. या भव्य उदघाटन सोहळयास शहरातील प्रतिष्ठित नागरिक, व्यापारी, ग्राहक आणि सुवर्णप्रेमींनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून सोहळ्याची शोभा वाढवावी असे आवाहन चंदुकाका सराफ ज्वेल्स यांच्या वतीने करण्यात आले आहे.

# ‘शेती वाचवण्यासाठी धरणांमधील पाणी सोडा’

## आगरी समाज संघटनेची जलसंपदा विभागाकडे मागणी

| नेरळ | प्रतिनिधी |

पाऊस येण्याची कोणतीही लक्षणे दिसत नाहीत आणि त्यामुळे जलसंपदा विभागाने आपल्या तालुक्यात असलेल्या धरणातील पाणी शेतीसाठी सोडावे अशी मागणी करणारे निवेदन कर्जत तालुका आगरी समाज संघटनेचे वतीने देण्यात आले. तालुक्यातील शेतकऱ्यांच्या दृष्टीने पावसाचे पाणी महत्त्वाचे असल्याने अत्यंत जिव्हाळ्याचे विषयी मागणी पुढे आली आहे. दरम्यान, प्रशासनाकडून या बाबत सकारात्मक निर्णय घेतला जाईल असे आश्वासन जलसंपदा विभागाचे उप अभियंता अमित पारधे यांनी दिले आहे. तर तहसीलदार डॉ धनंजय जाधव यांनी २२ ऑक्टोबर रोजी होणाऱ्या दुष्काळ आढावा बैठकीत निर्णय घेतला जाईल अशी माहिती कर्जत तालुका अध्यक्ष संतोष पेरणे यांना दिली आहे.

> “शेतकऱ्यांसाठी जलसंपदा विभाग पाण्याचे वितरण रब्बी हंगामात करीत असते. यावर्षी पाऊस लवकर गेल्याने शेती धोक्यात आली आहे. ही बाब लक्षात घेऊन शेतकऱ्यांसाठी आम्ही कर्जत तालुका आगरी समाज संघटनेची मागणी पुढे वरिष्ठांकडे पाठवत आहोत. शासन देखील सकारात्मक निर्णय घेईल अशी अपेक्षा आहे.”
> -अमित पारधे
> उपअभियंता जलसंपदा

> “कर्जत तालुका आगरी समाज संघटनेचे वतीने यापूर्वी दुष्काळ जाहीर करण्याची मागणी केली आहे. त्यामुळे या मागणीचे निवेदन आम्ही रायगड जिल्हाधिकाऱ्यांच्या आदेशाने होणाऱ्या २२ ऑक्टोबरचे दुष्काळ आढावा बैठकीत ठेवले जाईल. तसेच सकारात्मक निर्णय घेतला जाईल.”
> -डॉ. धनंजय जाधव
> तहसीलदार

# पनवेलमध्ये १५ दिवसांपासून रेशन वितरण ठप्प

| पनवेल ग्रामीण | प्रतिनिधी |

पनवेल तालुक्यातील रास्त भाव धान्य दुकानांमध्ये गेल्या १५ दिवसांपासून ई-पॉस मशीन आणि सर्व्हरमधील तांत्रिक अडचणींमुळे रेशन वितरणात अडथळे निर्माण झाले आहेत. दुकानांमध्ये धान्य उपलब्ध असतानाही मशीनवर त्याची नोंद दिसत नसल्याने पात्र शिधापत्रिकाधारकांना धान्य मिळण्यात अडचणी येत आहेत.

रास्त भाव धान्य दुकान व किरकोळ रॉकेल विक्रेते वेल्फेअर असोसिएशन, पनवेलचे अध्यक्ष भरत पाटील यांनी याप्रकरणी जिल्हा पुरवठा अधिकारी आणि पनवेल तहसीलदारांना निवेदन दिले आहे.

शासनाच्या सार्वजनिक वितरण व्यवस्थेंतर्गत लाभार्थ्यांना ई-पॉस मशीनद्वारे बायोमेट्रिक पडताळणी करून धान्य दिले जाते. मात्र, मशीनवर धान्याची उपलब्धता दिसत नसणे, सर्व्हर वारंवार बंद पडणे आणि अन्य तांत्रिक अडचणींमुळे वितरण प्रक्रिया पूर्ण होत नसल्याचे चित्र आहे. परिणामी, रेशन मिळेल या अपेक्षेने नागरिकांना दुकानांमध्ये वारंवार चकरा माराव्या लागत आहेत. या परिस्थितीचा फटका दुकानदारांनाही बसत आहे.

# उकाड्यामुळे थंड पेयांना पसंती

| खांदा कॉलनी | प्रतिनिधी |

यंदाही उकाड्यामुळे नागरिकांना दैनंदिन कामे करताना त्रास होत आहे. विशेषतः दुपारच्या वेळेत उन्हात फिरताना थकवा जाणवत असल्याने नागरिक सावलीचा आधार घेत आहेत. उसाच्या रसासह ताक, लिंबूपाणी आणि इतर थंड पेयांकडेही ग्राहकांचा ओढा वाढला आहे. दरम्यान, नागरिकांनी उन्हात बाहेर पडताना शक्यतो डोक्यावर टोपी किंवा छत्री वापरावी, पुरेसे पाणी प्यावे आणि दुपारच्या कडक उन्हात अनावश्यक फिरणे टाळावे असे आवाहन करण्यात येत आहे.



(छायाचित्र : समीर मालोदे)

# महाभोंडल्यात आरती पाटील, भाग्यश्री प्रभू यांची बाजी

## विविध स्पर्धांमध्ये महिलांनी दाखवले कलागुण; विजेत्यांचा गौरव

| अलिबाग | प्रतिनिधी |

शेतकरी कामगार पक्ष अलिबाग शहर महिला आघाडीच्या वतीने बुधवारी (दि.१४) ऑक्टोबर रोजी आयोजित महाभोंडला कार्यक्रमातील विविध स्पर्धांमध्ये महिलांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. पारंपरिक वेशभूषा, उखाणे, प्रश्नमंजुषा, फुगडी आणि इतर मनोरंजक स्पर्धांमध्ये महिलांनी आपले कलागुण सादर केले. या स्पर्धांमध्ये आरती पाटील, भाग्यश्री प्रभू आणि कांचन आरसले यांनी प्रथम क्रमांक पटकावत लक्ष वेधले.



पारंपरिक वेशभूषा स्पर्धेत आरती पाटील यांनी प्रथम, विद्या पाटील यांनी द्वितीय, तर कांचन असावा यांनी तृतीय क्रमांक मिळवला. उखाणा स्पर्धेत भाग्यश्री प्रभू प्रथम, विनया देसाई द्वितीय, तर प्रमिला जोशी तृतीय ठरल्या. प्रश्नमंजुषा स्पर्धेत कांचन आरसले यांनी प्रथम क्रमांक पटकावला. फुगडी स्पर्धेत पल्लवी ननवरे आणि निवेदिता वाघमारे यांनी बक्षीस मिळवले. तळ्यात-मळ्यात स्पर्धेत भारती पेरेकर यांनी प्रथम, तर वैजयंती धरणकर यांनी द्वितीय क्रमांक मिळवला. बेस्ट परफॉर्मन्समध्ये माया पटेल प्रथम, सुप्रिया पाटील द्वितीय, तर श्रेया पाटील यांनी तृतीय क्रमांक पटकावला.

लकी ड्रॉमध्ये अमृता पाटील प्रथम, नीलिमा वाणी द्वितीय, दीपली पाटील तृतीय, प्रियांका कुळेकर चतुर्थ, तर दीपली वाघमारे पाचव्या क्रमांकाच्या मानकरी ठरल्या. अलिबाग शहर महिला आघाडीच्या प्रमुख ॲड. नीलम हजारे आणि सहप्रमुख ॲड. अश्विनी ठोसर यांच्या संकल्पनेतून हा उपक्रम आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमाचे उद्घाटन अलिबागच्या नगराध्यक्षा अक्षया नाईक यांच्या हस्ते झाले. अभिनेत्री श्रेया बुगडे यांच्या उपस्थितीने कार्यक्रमाला विशेष रंगत आली.

कायमस्वरूपी उपाययोजनेची नागरिकांची मागणी | मूलभूत नागरी सुविधांसाठी करावा लागतोय संघर्ष

# पालिका क्षेत्रात ऋतूनुसार बदलणाऱ्या समस्या

| खांदा कॉलनी | प्रतिनिधी |

पनवेल परिसराचा झपाट्याने विकास होत असल्याचे चित्र एकीकडे उभे केले जात आहे. दुसरीकडे पनवेल महानगर पालिका क्षेत्रात नोडमधील नागरिकांना मात्र आजही मूलभूत नागरी सुविधांसाठी संघर्ष करावा लागत आहे. ऋतू बदलला की समस्या बदलतात अशा चक्रात अडकलेल्या कामोठेकरांची सुटका नेमकी कधी होणार, असा संतप्त सवाल नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे. वर्षानुवर्षे त्याच समस्यांचा सामना करावा लागत असतानाही संबंधित प्रशासन आणि लोकप्रतिनिधींकडून कायमस्वरूपी तोडगा काढला जात नसल्याची नाराजी नागरिक व्यक्त करीत आहेत.

वाढत्या शहरातील नागरी समस्यांचे स्वरूप ऋतूनुसार बदलत असले, तरी नागरिकांच्या अडचणी मात्र कायम आहेत. उन्हाळ्यात पाणीटंचाई आणि वारंवार वीजपुरवठा खंडित होण्याचा त्रास सहन करावा लागतो. पावसाळ्यात रस्त्यांवरील खड्डे आणि वाहतुकीच्या समस्यांमुळे नागरिक हैराण होतात. हिवाळ्याच्या काळात तळोजा एमआयडीसी परिसरातून येणाऱ्या



रासायनिक दुर्गंधीचा त्रास जाणवत असल्याच्या तक्रारी नागरिकांकडून केल्या जात आहेत.

उन्हाळा सुरू झाला की पनवेल पालिका क्षेत्रात पाणीटंचाईच्या समस्येला सामोरे जावे लागते. पाणीपुरवठ्याचे नियोजन आणि उपलब्धतेबाबत प्रश्न उपस्थित होत असतानाच, वारंवार खंडित होणाऱ्या वीजपुरवठ्यामुळे नागरिकांच्या अडचणींत आणखी भर पडते.

पावसाळा सुरू झाला की महानगर पालिका क्षेत्रात अंतर्गत तसेच मुख्य रस्त्यांवर खड्ड्यांचे साम्राज्य निर्माण होत असल्याची तक्रार आहे. खड्ड्यांमुळे वाहनचालकांना कसरत करावी लागते, तर दुचाकीस्वारांसाठी अपघाताचा धोका वाढतो. खड्डे बुजविण्यासाठी तात्पुरती डागडुजी केली जाते; मात्र काही दिवसांतच रस्त्यांची पुन्हा दुरवस्था होत असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे.

हिवाळ्याच्या दिवसांत तळोजा एमआयडीसी परिसरातून रात्री तसेच पहाटेच्या वेळी रासायनिक वास कामोठे परिसरात पसरत असल्याच्या तक्रारी पुन्हा ऐरणीवर आल्या आहेत. या दुर्गंधीमुळे डोळ्यांची जळजळ, घशात खवखव आणि श्वसनाचा त्रास होत असल्याचे नागरिक सांगतात.

## सुविधा कधी मिळणार?

निवडणुकांच्या काळात पनवेल महानगर पालिकाचा कायापालट करण्याची आश्वासने दिली जातात. मात्र, निवडणुका संपल्यानंतर नागरिकांच्या मूलभूत प्रश्नांवर अपेक्षित कार्यवाही होत नसल्याची भावना नागरिकांमध्ये आहे. सिडको, पनवेल महानगरपालिका, महावितरण आणि महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ या संबंधित यंत्रणांमध्ये समन्वय साधून समस्यांवर कायमस्वरूपी उपाययोजना करण्याची गरज आहे.

# पोलीस अधीक्षकांकडून कौतुक



| नेरळ | प्रतिनिधी |

नेरळ पोलीस ठाण्याच्या गुन्हे प्रकटीकरण विभागाने पुन्हा एकदा आपल्या कर्तृत्वाची आणि कौशल्याची चुणूक दाखवली आहे. कमीतकमी पुरावे आणि आव्हानात्मक परिस्थिती असतानाही दिवस-रात्र न बघता तांत्रिक विश्लेषणाच्या आधारे एक गंभीर गुन्हा उघडकीस आणल्याबद्दल रायगड जिल्ह्याच्या पोलीस अधीक्षक आंचल दलाल यांच्या हस्ते नेरळ पोलीस ठाण्याच्या गुन्हे प्रकटीकरण टीमला गौरव प्रशस्तिपत्र प्रदान करण्यात आले आहे.

या यशस्वी कामगिरीबद्दल जिल्हा पोलीस अधीक्षक आँचल दलाल यांनी नेरळ पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी राहुल वरोटे, पोलीस उप निरीक्षक सुहास काजोळकर तसेच पोलीस नाईक राजेश केकाण, सचिन वाघमारे, आश्रुबा बेंद्रे, विनोद वागणेकर यांचा सन्मान करण्यात आला.

# दुष्काळ आणि राजकारण

राज्यात महाभयंकर दुष्काळाची स्थिती स्पष्ट दिसत असताना फडणवीस सरकारातील राजकारण काही संपत नाही. दोन दिवसांपूर्वी केंद्रीय पाहणी पथकाने राज्याचा दौरा केल्यानंतर मुंबईत एक प्राथमिक अहवाल सादर केला. त्या बैठकीत केवळ राज्याचे मुख्यमंत्री होते. दोन उपमुख्यमंत्र्यांना बोलावलेलेच नव्हते किंवा निदान ते हजर असण्याची काळजी घेतली गेली नाही. शिंदे सेनेच्या नेत्यांनी याबाबत नाराजी बोलून दाखवली. पण एकनाथ शिंदे यांनी नंतर सारवासारव केली. मुळात दुष्काळ जाहीर करतानाही राज्य सरकारने बरीच चालढकल केली. मान्सूनचा हंगाम तीस सप्टेंबरला संपतो. त्यानंतर ऑक्टोबर महिन्यात केंद्रीय पथक पाहणी करते व त्याच्या आधारे दुष्काळ जाहीर करून मदतीचे निकष जाहीर करते. राज्य सरकार या पथकाच्या हवाल्यावर बसून राहणार होते. पण राज्यातील विरोधी पक्षांनी आवाज उठवल्याने सरकारला सप्टेंबरच्या अखेरीसच घाईघाईने दुष्काळाचा निर्णय घ्यावा लागला. पण तो घेतानाही आपल्या पक्षाच्या आमदारांच्या तालुक्यांमध्येच दुष्काळी स्थिती जाहीर केला गेला. त्यावर ओरडा झाल्यावर आणखी काही तालुके समाविष्ट झाले. आता अखेर आणखी ४० तालुक्यांचा यात समावेश करण्यात आला. त्यामुळे दुष्काळग्रस्त तालुक्यांची संख्या ३०४वर गेली. कालच्याच बैठकीत दुष्काळग्रस्त भागातील शेतकऱ्यांना सरसकट पाच हजार रुपये मदत देण्याचे मुख्यमंत्र्यांनी जाहीर केले. एक कोटी शेतकऱ्यांना याचा फायदा होईल असे ते म्हणाले. दिवाळीच्या आत शेतकऱ्यांच्या खात्यात ही रक्कम जमा होईल असे आश्वासन मिळाले आहे. पण याचा दुसरा अर्थ असा होतो की, दुष्काळासाठीची मुख्य मदत मिळायला आणखी बरेच दिवस थांबावे लागणार आहे. विरोधी पक्ष तसेच राजू शेट्टींची शेतकरी संघटना यांनी हेक्टरी एक लाख रुपये इतकी मदत मिळण्याची मागणी केली आहे. त्या पार्श्वभूमीवर सरकारने देऊ केलेली मदत अगदीच तुटपुंजी आहे. याचाच अर्थ आणखी मदत मिळण्यासाठी विरोधकांना सतत आंदोलने करावी लागणार आहेत.

### कुंभमेळ्याचा तामझाम

वास्तविक सध्याची आपत्ती इतकी भयंकर आहे की, सरकारने सर्वपक्षीय बैठक बोलवायला हवी. दुष्काळ, पाणी, चारा, रोजगार इत्यादींवर काम करणाऱ्या बऱ्याच संघटना राज्यात आहेत. त्यांनाही या बैठकीत सामील करून घ्यायला हवे. एरवी विरोधकांनी काही मागण्या केल्या किंवा वाढीव मदतीसाठी आंदोलने केली की ते या प्रश्नाचे राजकारण करीत आहेत असा आरोप सरकार करते. पण दुष्काळी परिस्थिती हाताळताना मात्र हे जणू भाजपने घेतलेले निर्णय आहेत असे भासवते. या निर्णय प्रक्रियेत कोणालाही सहभागी करून घेत नाही असे दृश्य दिसते. हे मुख्यमंत्र्यांनी बदलायला हवे. नाशिकमध्ये १५ पैकी १३ तालुक्यांमध्ये दुष्काळ आहे. गोदावरीचे पात्र आटले आहे. तरीही तेथे कोट्यवधी रुपये खर्चून कुंभमेळा मात्र होणार आहे. येत्या ३१ ऑक्टोबरला नाशिकचे रामकुंड आणि त्र्यंबकेश्वरचे कुशावर्त इथे कुंभमेळ्याचे ध्वजारोहण होणार आहे. त्यासाठी गोदावरीत पाणी सोडायची तयारी चालू आहे. याला समजा कोणी विरोध केला तर आमच्या श्रध्देचा अपमान झाला म्हणून भाजपचे नेते अंगावर येतील. वास्तविक दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर हा सोहळा रद्द करणे किंवा मर्यादित स्वरुपात करणे ही आजची गरज आहे. नाशिक जिल्ह्यातच पाण्याच्या एकेक थेंबासाठी काही भागात माणसे आजच वणवण फिरत आहेत. राज्यातील ७६८ गावांना टँकरद्वारे पाणी पुरवावे लागते आहे. त्यात मराठवाड्यातील आठ जिल्ह्यातील ३७४ गावांचा समावेश आहे. यातील बहुतेक भाग हा नाशिककडून वाहत येणाऱ्या गोदावरीच्या पाण्यावर अवलंबून आहे. या भागातले बहुतांश लोक हेही हिंदूच आहेत व गेल्या निवडणुकीत त्यांनी महायुतीलाच मतदान केलेले आहे. पण या हिंदूंच्या जगण्या-मरण्याचा प्रश्न निर्माण झाला आहे. पाण्याअभावी यातल्या लाखो लोकांना स्थलांतर करावे लागणार आहे. कुंभमेळ्याचे चोचले पुरवणे म्हणजे मराठवाड्यातील हिंदूंवर अत्याचार आहे. असे काही म्हटले की भाजपचे नितेश राणे वगैरे आगखाऊ बोलणारे लोक आपले नेहमीचे राजकारण करायला उतरतील. वास्तविक खुद्द राणे यांच्या सिंधुदुर्गातील स्थितीही कधी नव्हे इतकी बिकट आहे. तरीही ते किंवा त्यांचेच राज्यातील इतर ठिकाणचे भाऊबंद जबाबदारीने वागतील याची खात्री देता येत नाही. यात मुख्यमंत्र्यांनी हस्तक्षेप करावा अशी अपेक्षा व्यक्त करणे धाडसाचे आहे. कारण त्याबाबतचा पूर्वानुभव चांगला नाही.

### पाणी आणणार कुठून

पुढचा पाऊस येण्याला अजून आठ ते नऊ महिने बाकी आहेत. सरकार अन्नधान्य वाटू शकेल. गोदामे भरलेली आहेत. त्यातच यंदा पंजाब व हरियाणामध्ये भाताचे विक्रमी पीक आले आहे. या दोन्ही राज्यांमध्ये सरकारी खरेदीतील गेल्या वर्षीचाच तांदुळ अजून गोदामांमध्ये पडून आहे. यंदाचे भात साठवायला जागा नाही अशी स्थिती आहे. हा तांदुळ देशातील दुष्काळी भागातील जनतेला नक्कीच उपयोगी पडेल. सरकार येत्या काळात कदाचित आणखी पैसेही देईल. पण पाणी कसे व कुठून आणणार हा प्रश्न आहे. काल चंद्रशेखर बावनकुळे असे म्हणाले की, टँकर हा शेवटचा पर्याय असायला हवा. विहिरी किंवा नद्या खोल करून पाणी वाढते आहे का हे पाहायला हवे. पण आता ती वेळ बहुदा गेली आहे. फडणवीस सरकारने पहिल्या कार्यकाळात नदी खोलीकरण व जलयुक्त शिवार योजना राबवली. याच मराठवाड्यात हजारो कोटी रुपये खर्च केले गेले व सर्वत्र सुजलाम सुफलाम झाले अशी जाहिरात केली गेली. पण हे चित्र फसवे किंवा बनावट होते हे आता उघडे झाले आहे. किंबहुना, त्या योजनेत भ्रष्टाचार झाल्याचे जे आरोप झाले होते त्यांना यंदाच्या दुष्काळातून साक्षात पुरावा मिळणार आहे. त्यामुळे त्या योजनेची पुनरावृत्ती होणार नाही याची खबरदारी घ्यायला हवी. वीजबिले न भरल्याने बंद पडलेल्या पाणी योजना सुरू कराव्यात आणि ७५ ते ८० टक्के काम पूर्ण झाले आहे अशा नळ योजना युध्द पातळीवर पूर्ण कराव्यात असे आदेशही बावनकुळे यांनी दिले आहेत. सरकार काहीतरी करते आहे असे चित्र यातून निर्माण होईल. पण आडात नसेल तर पोहऱ्यात कुठून येणार असा खरा प्रश्न आहे. बावनकुळे, त्यांचे अधिकारी किंवा सरकार हे कितीही बहुमताने जिंकले असले आणि कितीही सामर्थ्यशाली असले तरी पाणी निर्माण करू शकत नाहीत. त्यामुळे नळयोजना किंवा पाणीयोजनांवर आता खर्च करणे म्हणजे पुन्हा एकदा कंत्राटदारांची धन करण्यासारखे आहे. सरकारच्या तिजोरीत आधीच ठणठणाट आहे. गेल्या काही वर्षांपासून कंत्राटदारांची ९० हजार कोटींची बिले थकली आहेत. योजनेतल्या पैशांची पळवापळवी सुरू आहे. अशा वेळी धरणात, पाझर तलावात, विहिरीत नसलेले पाणी वाहून आणण्यासाठी फालतूचा खर्च करण्यापेक्षा सरकारने जे पाणी आहे त्याचे नीट नियोजन करणे अधिक उपयोगी ठरेल.

**। विचार**

# सोने-गृहकर्जाचा दबाव, 'पेट्स'चा विमा

***अर्थनगरीमध्ये सरत्या आठवड्यात सोने, मेडिक्लेम आणि गृहकर्जाबाबत लक्षवेधी बातम्या समोर आल्या. सोन्याच्या दरातील वाढीमुळे विक्रीत घट होत असल्याचे दिसून आले. दरम्यान, कुटुंबासोबत कुत्र्या, मांजराचाही विमा उतरवता येणार असल्याची बातमी आहे. याच सुमारास कर्जदारांवर 'ईएमआय' वाढीची टांगती तलवार असल्याचे स्पष्ट झाले आहे.***



महेश देशपांडे

अर्थनगरीमध्ये सरत्या आठवड्यात सोने, मेडिक्लेम आणि गृहकर्जाबाबत लक्षवेधी बातम्या समोर आल्या. सोन्याच्या दरातील वाढीमुळे विक्रीत घट होत असल्याचे दिसून आले. दरम्यान, कुटुंबासोबत कुत्र्या, मांजराचाही विमा उतरवता येणार असल्याची बातमी आहे. याच सुमारास कर्जदारांवर 'ईएमआय' वाढीची टांगती तलवार असल्याचे स्पष्ट झाले आहे.

दिवसेंदिवस सोन्या-चांदीच्या दरात वाढ होत आहे. या वाढत्या दरामुळे ग्राहकांच्या खिशाला चांगलीच कात्री लागत आहे. गेल्या वर्षभरात सोन्याच्या दरात मोठी वाढ झाली आहे. एका वर्षापूर्वी गणेश चतुर्थीला सोन्याचा भाव ९८ हजार रुपये होता; पण एका वर्षात सोन्याच्या दरात ६० टक्के वाढ झाली आहे. आता गणेश चतुर्थीच्या वेळी, भाव प्रति तोळा एक लाख ५७ हजार रुपयांपर्यंत वाढला. या वर्षी गणेश चतुर्थीच्या सणासुदीच्या काळात सोन्याची विक्री घटली आहे. गेल्या वर्षीच्या तुलनेत आतापर्यंत विक्रीमध्ये अंदाजे १५ टक्के घट झाली आहे. व्यापाऱ्यांच्या मते, सोन्याच्या वाढत्या किमतींमुळे ग्राहकांसाठी दागिने अधिक महाग झाले आहेत. त्यामुळे अनेकांनी आपली खरेदी कमी केली आहे किंवा हलक्या दागिन्यांना पसंती दिली आहे.

सोन्याच्या वाढत्या किमतींच्या पार्श्वभूमीवर, ग्राहकांच्या खरेदीच्या पद्धतीही बदलत आहेत. अनेकजण आता जड दागिन्यांऐवजी हलके दागिने खरेदी करत आहेत. काही ग्राहक सोन्याच्या दागिन्यांऐवजी सोन्याची नाणी निवडत आहेत. यावरून दिसून येते, की लोक आपल्या बजेटमध्ये सोने खरेदी करण्याचा प्रयत्न करत आहेत. सोन्याच्या वाढत्या किमतींबरोबरच, हॉलमार्किंगसारख्या इतर खर्चांचाही परिणाम ग्राहकांच्या खर्चावर होत आहे. परिणामी, लग्न आणि सणांसाठी सोने खरेदी करणाऱ्या लोकांना पूर्वीपेक्षा जास्त खर्च करावा लागत आहे. दरम्यान, सोन्याच्या वाढत्या दरामुळे ग्राहकांनी सोन्याच्या खरेदीकडे पाठ फिरवली आहे. कारण सोनेखरेदीमध्ये ग्राहकांच्या खिशाला मोठी झळ बसत आहे. पाऊस नसल्यामुळे पिकांच्या उत्पादनात घट झाली आहे. पश्चिम आशियातील बदलत्या परिस्थितीचा परिणाम जगभरातील बाजारांवर दिसून येत आहे. कच्च्या तेलाच्या किमतीत किरकोळ का होईना, घट झाली आहे. त्यामुळे सोने-चांदीच्या किमतीवरही परिणाम होत आहे. अमेरिका आणि इराण यांच्यात शांतता वाटाघाटी होण्याची शक्यता वाढत चालली आहे.

आता एक लक्षवेधी बातमी. घरात पाळीव कुत्रा किंवा मांजर असेल, तर त्यांच्या खाण्यापिण्यापासून वैद्यकीय उपचारांपर्यंत होणाऱ्या मोठ्या खर्चाची तुम्हाला नक्कीच जाणीव असेल; मात्र आता या खर्चाची चिंता करण्याची गरज नाही. भारतातील प्रमुख विमा कंपनी 'बजाज जनरल इन्शुरन्स'ने 'माय फॅमिली कंप्लीट' नावाचा देशातील पहिलाच अनोखा 'हेल्थ इन्शुरन्स प्लॅन लाँच' केला आहे. 'बजाज जनरल इन्शुरन्स'च्या या पॉलिसीचे वैशिष्ट्य म्हणजे एकाच 'हेल्थ इन्शुरन्स प्लॅन'मध्ये कुटुंबातील सदस्य आणि पाळीव प्राण्यांना कव्हर करण्याची सुविधा मिळते. म्हणजेच पेट पॅरेंट्सना आपल्या कुत्रा किंवा मांजरासाठी स्वतंत्रपणे इन्शुरन्स घेण्याची गरज नाही. एकाच पॉलिसीअंतर्गत कुटुंब आणि पात्र पाळीव प्राण्यांचे संरक्षण करता येणार आहे. या प्लॅनमध्ये ग्राहकांना आपल्या गरजेनुसार पाच लाख रुपयांपासून पाच कोटी रुपयांपर्यंतचा प्लॅन निवडण्याचा पर्याय मिळतो. पॉलिसीची मुदत पाच वर्षांपर्यंत असू शकते.

या विम्यामध्ये पेट्स आणि त्यांच्या मालकांसाठी हॉस्पिटलमध्ये दाखल झाल्यानंतरचा खर्च, हॉस्पिटलमध्ये दाखल होण्यापूर्वीचा खर्च, हॉस्पिटलमधून डिस्चार्ज झाल्यानंतरचा खर्च, आधुनिक उपचार पद्धती, रिकव्हरी बेनिफिट, पेट्ससाठी अनेक अतिरिक्त सुविधा या खर्चांचा समावेश आहे. या पॉलिसीमध्ये ग्राहकांना गरजेनुसार विविध ऑप्शनल कव्हर्स निवडण्याची सुविधाही देण्यात आली आहे. यामध्ये 'डबल सम इन्शुरन्स बेनिफिट', 'ग्लोबल कव्हर', 'एज शील्ड' आणि 'पेट ॲडॉप्शन सपोर्ट' यांसारख्या सुविधांचा समावेश आहे. याशिवाय 'बंडल ऑफ जॉय बेनिफिट' नावाची सुविधाही आहे. याअंतर्गत पाळीव प्राण्याला पिल्ले झाल्यास निश्चित रकमेचा 'पेआउट' मिळण्याची तरतूद आहे. या पॉलिसीचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे तुमचा पाळीव प्राणी हरवल्यास शोधण्यासाठी होणाऱ्या खर्चासाठीही कव्हर मिळू शकते. तसेच आपत्कालीन परिस्थितीत पाळीव प्राण्यासाठी राहण्याची व्यवस्था करण्यासाठी 'इर्मजन्सी पेट ॲकॉमोडेशन'ही सुविधा देण्यात आली आहे. याशिवाय पाळीव प्राण्यामुळे तिसऱ्या व्यक्तीला नुकसान झाल्यास 'पेट थर्ड पार्टी लायबिलिटी कव्हर'चाही पर्याय उपलब्ध आहे.

दरम्यान, कर्ज घेणाऱ्यांसाठी एक महत्वाची बातमी आहे. गृहकर्ज, वाहन कर्ज आणि वैयक्तिक कर्जाचे हप्ते भरणाऱ्या भारतातील लाखो लोकांना येणारे दिवस खूप कठीण ठरू शकतात. गृहकर्ज आणि इतर रेपो-संबंधित कर्जांच्या 'ईएमआय'मध्ये वाढीची टांगती तलवार असून महागाई आणि क्रूडच्या दरांमधील चढ-उतारांच्या दबावामुळे ऑक्टोबर व डिसेंबरमध्ये कर्जाचे 'ईएमआय' पुन्हा वाढू शकतात. जागतिक फायनान्शिअल सेवा कंपनी 'नोमुरा'चे 'ग्लोबल मॅक्रो रिसर्च'चे प्रमुख रॉब सुब्बारामन यांनी वाढत्या महागाईच्या दबावामुळे भारतीय रिझर्व्ह बँक या वर्षीच्या आपल्या पुढील दोन्ही पतधोरण बैठकांमध्ये व्याजदर वाढवण्याचा अंदाज वर्तवला आहे. सुब्बारामन यांच्या अंदाजानुसार रिझर्व्ह बँक ऑक्टोबर आणि डिसेंबरमध्ये होणाऱ्या बैठकांमध्ये व्याजदर वाढवू शकते. त्यामुळे गृहकर्जासह इतर कर्जांचा खर्च वाढू शकतो. महागाई दरात संभाव्य वाढ आणि सर्व बाजूंनी वाढणारा दबाव रोखण्यासाठी रिझर्व्ह बँक ऑक्टोबर आणि डिसेंबरमध्ये होणाऱ्या आगामी पतधोरण आढावा बैठकांमध्ये व्याजदरात २५-२५ बेसिस पॉइंट्सने (एकूण ०.५० टक्के) वाढ करू शकते.

सुब्बारामन यांनी सांगितले, की भारताची आर्थिक वाढ मजबूत आहे. तसेच २०२६-२७ या आर्थिक वर्षासाठी भारताचा जीडीपीवाढीचा दर सात टक्के असेल, तर येत्या काही महिन्यांमध्ये महागाई सहा टक्क्यांपेक्षा जास्त होण्याचा अंदाज 'नोमुरा'ने वर्तवला आहे. अशा परिस्थितीत, वाढत्या व्याजदरांचा परिणाम सर्वसामान्यांच्या खिशावरही होईल. दुसरीकडे, केवळ रिझर्व्ह बँक नव्हे, तर जागतिक चलनविषयक धोरणावर बोलताना सुब्रमण्यन यांनी 'अमेरिकन फेडरल रिझर्व्ह' या वर्षी किमान एकदा, बहुधा डिसेंबरमध्ये व्याजदरात वाढ करेल अशी अपेक्षा वर्तवली आहे. गेल्या आठवड्यात 'फेड'ने धोरणात्मक व्याजदर २५ बेसिस पॉइंट्सने वाढवून ३.७५ ते चार टक्क्यांदरम्यान वाढवला होता. महागाई जास्त राहिल्यास व्याजदरात आणखी वाढ होण्याचा धोका आहे, असे त्यांनी पुढे म्हटले. तसेच 'एफओएमसी'चे नवीन अंदाज सर्वसाधारण अधिक कठोर चलनविषयक धोरणाच्या दिशेने निर्देश करत असल्याचे सुब्बारामन म्हणाले. १८ धोरणकर्त्यांपैकी १२ जणांना या वर्षी आणखी एक व्याजदरवाढीची अपेक्षा आहे, तर चौघांनी आणखी दोन वाढीचा अंदाज वर्तवला आणि केवळ दोघांना पुढील कोणतीही वाढ अपेक्षित नाही.

याच सुमारास 'जेन झी'च्या आर्थिक कलाबाबत एक वृत्त समोर आले आहे. गृहकर्ज हा प्रत्येकाच्या आयुष्यातील सर्वात मोठा आर्थिक निर्णय समजला जातो. कारण, ते फेडण्यासाठी अनेकांची संपूर्ण हयात खर्ची पडते; मात्र तरुणाईचा घराकडे बघण्याचा दृष्टिकोन आता बदलत आहे. 'जेन-झी' ही 'होम लोन मार्केट'मधील सर्वात वेगाने वाढणारी पिढी ठरल्याचे कोटक महिंद्रा बँकेच्या नवीन अहवालातून समोर आले आहे. बँकेच्या आकडेवारीनुसार, आर्थिक वर्ष २४ ते २६ या दोन वर्षांमध्ये गृहकर्ज घेणाऱ्या २५ ते ३० वयोगटातील ग्राहकांच्या संख्येत तब्बल ८६ टक्क्यांची विक्रमी वाढ झाली आहे. ही संख्या १,२३४ वरून थेट २,२९० वर पोहोचली आहे. कोटकच्या एकूण वैयक्तिक गृहकर्ज ग्राहकांमध्ये 'जेन झी'चा वाटा सहा टक्क्यांवरून वाढून नऊ टक्के झाला आहे. म्हणजेच यात ५० टक्के वाढ झाली आहे. या तुलनेत ३० ते ४५ वयोगटातील कर्जदारांची वाढ केवळ २६ टक्के राहिली आहे. आधी स्थिर आणि चांगले उत्पन्न सुरू झाल्यानंतरच घर खरेदी करण्याचा विचार केला जात होता; मात्र सध्याची पिढी जोखीम घेणारी असून हक्काचे घर हे स्थैर्य मिळवण्याचे साधन मानते. त्यामुळे वाट बघण्याऐवजी लवकर निर्णय घेत असल्याचे दिसत आहे. कोरोनाकाळात घरामध्ये घालवलेला जास्त वेळ, प्रायव्हसी आणि चांगल्या जीवनशैलीचे महत्त्व तरुणांना उमगले आहे. अलीकडच्या काळात उच्च शिक्षण, वेगाने होणारी प्रगती आणि वाढलेले उत्पन्न यामुळे तरुणांना पूर्वीच्या तुलनेत लवकर आर्थिक स्वातंत्र्य मिळत आहे. काही ठिकाणी दुहेरी उत्पन्न असणाऱ्या कुटुंबांमुळे घरखरेदीचे मोठे निर्णय वेगाने घेतले जात आहेत.

**। चर्चा आजची**

# हिंसक आंदोलनांपुढे जनता हतबल

सुयोग आंग्रे

आपल्या देशाला एका चळवळीतून स्वातंत्र्य मिळाले, त्यामुळे त्याची एक परंपरा निर्माण झाली. कारण संविधानाने शांततेने आंदोलन करण्याचा अधिकार दिला आहे. हा अधिकार लोकशाहीची ताकद आहे. गंमत म्हणजे चळवळीची परंपरा जसजशी विकसित होत गेली तसतशी ती विकृत होत गेली. त्यामुळे अराजकतेने भरलेल्या अनेक आंदोलनांचा देश साक्षीदार झाला. अनेकवेळा या अराजकामुळे मोठ्या प्रमाणात जीवित तसेच मालमत्तेची हानी झाली आहे. या आंदोलनाला हिंसक वळण लागल्याने पोलिसांनाही आपला जीव गमवावा लागला आहे. आंदोलनात किती वेळा सार्वजनिक मालमत्तेची तसेच सर्वसामान्यांची वाहने जाळली गेली कुणास ठाऊक. हिंसक आंदोलनांमुळे रेल्वेच्या किती बोगी जाळल्या आणि किती बस आणि गाड्या तुटल्या किंवा जाळल्या याचा अंदाज क्वचितच कोणी बांधू शकेल. चक्का जाम आंदोलनामुळे वाहने, गाड्या अडवून किंवा रस्त्यावर घेराव घालून बसून किती कोटी जनता त्रस्त आहे, याचा हिशेब कोणाकडे नाही. आंदोलनांमुळे सामान्य नागरिक जे आपल्या व्यवसायात जातात ते वैतागून राहतात, पण पूर्वी ऐकले नव्हते आणि आताही ऐकले जात नाही. त्यांची व्यथा कोणी ऐकत नाही, समजून घेत नाही. चळवळीमुळे अस्वस्थ झालेल्या लोकांनी एखाद्याला शिव्या दिल्या तर शेवटी त्यांना फक्त राग आणि निराशाच येते. रस्त्यावर उतरलेले काहीशे आंदोलक त्यांच्या आक्रमक आणि अराजक वृत्तीने हजारो आणि लाखो लोकांचे नुकसान करू शकतात. सीएए विरुद्ध शाहीन बाग आंदोलन आणि कृषी कायदा विरोधी आंदोलन लक्षात ठेवा. 'भारत बंद'च्या हाकेवर देशभरात अनेक आंदोलने आणि निदर्शने होत आहेत, मात्र आता ते करताना 'तुमची दुकाने बंद करा, आमची दुकाने उघडा' अशा घोषणाही दिल्या जाऊ लागल्या आहेत. याचा अर्थ असा की देशात, राज्यात किंवा जिल्ह्यात लॉकडाऊनच्या काळात कोणी दुकान उघडण्याचे धाडस केले तर त्याची तोडफोड होऊ शकते. अशी अनेक आंदोलने आहेत ज्यात आंदोलक एका ठिकाणी घोषणाबाजी करतात किंवा एखाद्या अधिकाऱ्याच्या कार्यालयावर मोर्चा काढून तेथे निवेदन सादर करतात. सामान्यत: ते पोलिसांच्या बॅरिकेड्सच्या पलीकडे जात नाहीत, परंतु आता परवानगीशिवाय आंदोलने करणे आणि पोलिस बॅरिकेड्स पाडून किंवा उडी मारून पुढे जाणे सामान्य झाले आहे. असे झाल्यावर पोलिस लाठीचार्ज करतात. काहीवेळा जमाव पांगतो, तर काही वेळा त्यांना मारहाण होते आणि पोलिसांनाही. अशा प्रसंगी जमाव हिंसक झाल्यावर त्यावर गोळीबार करण्याची गरज निर्माण झाली आहे. आता पोलिसांना केवळ अराजकतेचा अवलंब करणाऱ्या आंदोलकांशीच नव्हे, तर प्रेक्षक, व्यावसायिक आंदोलक, यूट्यूबर्स, रील-प्लेअर्सचा समूह आणि अफवा पसरवणाऱ्यांशीही सामना करावा लागतो. लोकशाहीसाठी चळवळी आवश्यक आहेत, कारण त्या पीडित किंवा पीडित गटाचा राग काढण्याचे काम करतात. कोणीतरी बरोबरच म्हटले आहे की हालचाली प्रेशर कुकरसारख्या असतात. लोक तार्किक आणि न्याय्य तसेच अतार्किक मागण्यांसाठी आंदोलन करू शकतात. ते पण करा. ते थांबवता येत नाही. निदर्शने, मोर्चे किंवा आंदोलनादरम्यान खोटे दावे करण्यास कोणतेही बंधन नाही. आठवा, जेव्हा बोफोर्स तोफांच्या सौद्यात दलालीचा मुद्दा तापला होता, तेव्हा व्हीपी सिंह खिशातून स्लिप काढायचे आणि म्हणायचे की त्यात दलालांची नावे होती. वेळ आल्यावर सांगेन. सीएए विरोधी आंदोलनादरम्यान, यामुळे मुस्लिमांचे नागरिकत्व हिरावून घेतले जाईल, असा प्रचार करण्यात आला होता. कृषी कायदा विरोधी आंदोलनादरम्यान कथित शेतकरी नेते म्हणायचे की सरकार शेतकऱ्यांची शेतं हिसकावून अंबानी-अदानींना देईल. राफेल डीलमधील दलालीचा आरोप मजबूत करण्यासाठी राहुल गांधींनी स्वतः मोदींनी दलालाच्या खिशात पैसे टाकल्याचा दावा केला होता. अनेक वेळा आंदोलकांकडे तार्किक मुद्दा असतो, पण ते आंदोलनासाठी अराजक पद्धतीचा अवलंब करणे पसंत करतात, कारण यामुळे अधिकाधिक लोक निराश होतील आणि त्यामुळे सरकार आणि प्रशासनावर दबाव येईल असे त्यांना वाटते. आता न्यायव्यवस्थेवरही दबाव टाकण्याचे काम सुरू झाले आहे. अलीकडेच राहुल गांधी यांनी सर्वोच्च न्यायालयाच्या मुख्य न्यायमूर्तींना भेटण्याची इच्छा व्यक्त केली होती, ज्याची न्यायालयात सुनावणी सुरू आहे. हे करता येत नाही, असे सांगितल्यावर त्यांनी विरोधी पक्षनेत्यांना घेऊन सर्वोच्च न्यायालयापर्यंत मोर्चा वळवला आणि पोलिसांना चकमा देत याचिका दाखल करण्याचा नवा मार्ग निवडला. एकूणच निषेधाच्या पद्धती झपाट्याने बदलत आहेत. या क्रमाने आंदोलकांमुळे पोलीस-प्रशासनासह सर्वसामान्यांनाही अधिक त्रास होत आहे, कारण आता आंदोलनाच्या नावाखाली कोणताही गट रस्त्यावर, कुठेही, केव्हाही गोंधळ घालू शकतो. आंदोलनांसाठी प्रोटोकॉल कधी तयार होईल, याची कोणालाच माहिती नाही, ज्याची गरज काही काळापूर्वी सर्वोच्च न्यायालयाने व्यक्त केली होती. आंदोलनांचे स्वरूप असेच बदलत राहिले आणि विकृत होत गेले, तर लोकशाही किती मजबूत होईल माहीत नाही, पण सामान्य जनता त्यांच्यापुढे अधिक असहाय्य वाटेल आणि त्यांचे कोणी ऐकणार नाही, यात शंका नाही. आज देशभरात सुरू असलेल्या आंदोलनांमध्ये तरूणाईच रस्त्यावर उतरली आहे. तरूणाईचा आंदोलनाचा संघर्ष हा ऐतिहासिक आहे. मग तो १८५७ च्या बंडातील असो, अथवा आता पुणे येथे एमपीएससीच्या विरोधात सुरू असलेला रोहित पवार आणि विवेकानंद पाटील यांच्यातील असो. यामुळेच देशभरात तरूणाई रस्त्यावर उतरली आहे तेही न्याय मागण्यासाठीच हेच खरे. आंदोलनांचा जनतेला त्रास होत असला तरी ही आंदोलनेच भविष्यातील तरूणाईचे प्रश्न सोडवणार असल्याचे चित्र दिल्लीपासून ते महाराष्ट्रातील पुण्यापर्यंत पहावयास मिळत आहे.

**लोकसंसद**

## अस्वस्थता आणि तणावमुक्तीसाठी आनंदी जगणे गरजेचे

समाजातील बहुसंख्य लोकांमध्ये मानसिक तणाव, असुरक्षिता नकारात्मकता वाढू लागते तेव्हा समाजमन अस्वस्थ होण्याच्या दिशेने वाटचाल सुरू होते सध्या सर्वत्र असेचं चित्र पाहायला मिळते आहे प्रत्येकाच्या जीवनातील संवेदनशीलता कमी होत चालली आहे अविश्वास आणि मनातील असुरक्षिततेचे,भीतीचे वातावरण वाढत आहे यापेक्षा अधिक म्हणजे माणसांमध्ये एकाकीपणा वाढत चालला आहे यामुळेच अगदी शिल्लक आणि साध्या वाटणाऱ्या कारणावरून आजकालची पिढी जीवन संपवताना दिसत आहे सध्या कुटुंबासमवेत सकारात्मक, खुलेपणाने संवाद, बदललेल्या मानसिक स्थितीबाबतची चर्चा आजकाल कधीही होताना दिसत नाही त्यामुळे अगदी साध्या अडचणींचा सामना करण्याचे धैर्यहि गमावले जात असल्याचे दिसून येते आहे पोटदुखी,लग्न न होणे,जगण्याच्या धडपडीसाठी काहीतरी काम करणे यामध्ये आव्हाने अशी काहीच नाहीत परंतु हे देखील आजच्या पिढीला असाह्य होत आहे सध्या थोडे जरी बोलले तरी मुलगा तणावाखाली जातो आणि भलतेच पाऊल उचलण्याची शक्यता असते मुलांना रागवायचे, चिडायचे, बोलायचे की नाही असा गहण प्रश्न पालकांच्या पुढे उभा ठाकला आहे कारण जशी मुलांची मने अस्वस्थ आहेत तशीच पालकांची देखील मने अस्वस्थ आहेत आजकाल अस्वस्थ मन फक्त ठराविक वयाचे आहे असे म्हणता येणार नाही कारण दहा वर्षापासून ते अगदी नव्वदी गाठलेल्या व्यक्तींमध्येही काही ना काही कारणामुळे अस्वस्थता जाणवते हे टाळण्यासाठी सर्वांनी आनंदी जगायला शिकले पाहिजे.

**– राजू जाधव, मांगूर जि. बेळगांव**

**। दिनविशेष**

# जागतिक अन्न दिन



१९४५ मध्ये संयुक्त राष्ट्रांच्या अन्न आणि कृषी संघटनेच्या स्थापनेच्या वर्धापन दिनानिमित्त दरवर्षी १६ ऑक्टोबर रोजी जागतिक अन्न दिन साजरा केला जातो. हा दिवस आपल्याला आठवण करून देतो की अन्न उत्पादन आणि वितरणात सतत प्रगती होत असूनही, भूक आणि कुपोषण ही जागतिक स्तरावरील महत्त्वाची आव्हाने आहेत. जागतिक अन्न दिन आपल्याला आठवण करून देतो की जागतिक अन्न आणि पाणी सुरक्षा साध्य करण्यात आपल्या सर्वांची भूमिका आहे. आपण लहान पावले उचलून प्रत्येकाला पुरेसे अन्न आणि स्वच्छ पाणी मिळेल याची खात्री करू शकतो. शिवाय, ही संसाधने केवळ जीवन टिकवून ठेवत नाहीत तर तुमच्या एकूण आरोग्यावरही त्यांचा थेट परिणाम होतो. आज, तुमच्या आरोग्याचे रक्षण करणे तितकेच महत्त्वाचे आहे. चांगले पोषण आणि स्वच्छ पाणी हे आरोग्य राखण्यासाठी आवश्यक आहे. तथापि, अनपेक्षित आरोग्य आव्हाने अजूनही उद्भवू शकतात. तिथेच आरोग्य विमा आवश्यक बनतो. योग्य आरोग्य विमा असण्यामुळे तुम्हाला अनपेक्षित वैद्यकीय खर्चापासून संरक्षण मिळते, विशेषतः जेव्हा कुपोषण किंवा पाण्यामुळे होणारे आजार यासारख्या गुंतागुंती असुरक्षित लोकसंख्येवर परिणाम करतात. अन्न सुरक्षेबाबतची एकंदर परिस्थिती पाहता अन्न दिनाबाबत जागरुकता वाढीस लागण्याची गरज आहे. अन्नधान्य मुबलक मिळायला हवे, मात्र ते स्वस्तातच हवे अशी अपेक्षा दारिद्र्यरेषेखालील माणसांपासून ते श्रीमंतांपर्यंत सर्वांचीच असते. मध्यम वर्गीयांना तर बाकी काही महागले तरी चालते, पण अन्नधान्य मात्र स्वस्तातच मिळायला हवे असते. आपल्याला पगार भरपूर मिळावा, मात्र वर्षानुवर्षे मातील राबणाऱ्या शेतकऱ्याने मात्र पंधरा-वीस वर्षांपूर्वीच्याच भावात अन्नधान्य द्यावे असे या वर्गाला वाटत असते. बाजारभावाच्या निम्म्याहून कमी पैसे शेतकऱ्याच्या हातात पडतात हे वास्तवही त्यांना नीट माहीत नसते, किंबहुना ते जाणून घेण्याची निकडही त्यांना भासत नाही. तापमानवाढ, मोसमी पावसाची अनियमितता, रोग-किडींचा वाढता प्रादुर्भाव, खते-बियाण्यांसह अन्य कृष निविष्ठांची अपुरी उपलब्धता, बाजार यंत्रणेकडून होणारी फसवणूक अशी अनेक आव्हाने खांद्यावर घेऊन शेतकरी काळ्या आईची सेवा मनोभावे करतो आहे. तो नवी आव्हाने पेलण्यासही समर्थ आहे, पण किमान पाठीवर हात ठेवून म्हणण्याइतके औदार्य समाजाने दाखवायला हवे. सरकारी यंत्रणेनेही त्याच्याप्रती असलेले औदासीन्य सोडायला हवे. निविष्ठांपासून ते पीक कर्जापर्यंत साऱ्या बाबीची वेळेत पूर्तता करून द्यायला हवी. 'अन्नदाता सुखी भव' म्हणून आपण यजमानांना दुवा देत असतो, पण खरा अन्नदाता शेतकरी आहे याच विसर सर्वांनाच पडलेला असतो. या जगाच्या पोशिंद्याचे कल्याण करायचे असेल तर त्याने पिकवलेल्या मोत्यांना वाजवी किंमत देण्याची दानतही समाजाने अंगी बाळगली पाहिजे. सध्या जगातील अनेक देश दारिद्र्यरेषेखालील जीवन जगत आहेत. त्या देशांतील लोकांना दररोज संतुलित आहार मिळत नाही. सोप्या शब्दात सांगायचे तर लोकांना संतुलित आहार मिळत नाही. त्यामुळे बहुतांश लोक कुपोषित होतात. ते इतर अनेक आजारांनाही बळी पडतात. कुपोषणामुळे दरवर्षी मोठ्या प्रमाणात लोकांचा मृत्यू होतो. यासाठी दरवर्षी ऑक्टोबर महिन्यात जागतिक अन्न दिन साजरा केला जातो.

### अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

**१६ ऑक्टोबर**

१) श्री.वसंत परशुराम वर्तक
विद्यानगर,अलिबाग,
दि.१६-१०-१९५२

२)श्री.(ॲड)कृष्णा दाजीबा पाटील
मु.ब्राम्हणआळी, अलिबाग
दि.१६-१०-१९५६

३) श्री.यशवंत लक्ष्मण राणे
मु.आवास, अलिबाग,
दि.१६-१०-१९४८

## कृषीवलच्या वाचकांना आवाहन




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

**संपर्क- ८०५५३२५६७८**
**(बीपीन राठवा)**
**९२२६०५५१५५**
**(अमित शहानंद)**
**- मुख्य संपादक,कृषीवल**

**आजचे अन्नदाते**



**डॉ. प्रमोद आर. कुमठेकर,**
**वाढदिवस अलिबाग**

## ‘पाण्याचा प्रत्येक थेंब जपा’

**। आगरदांडा । प्रतिनिधी ।**

आगामी काळात वाढत्या उष्णतेमुळे पाणीटंचाईचे संकट अधिक गंभीर होण्याची शक्यता लक्षात घेता मुरुड शहर व परिसरातील नागरिकांनी पाण्याचा वापर जपून आणि काटकसरीने करावा, असे आवाहन सामाजिक कार्यकर्ते अरविंद गायकर यांनी केले आहे. ‘पाणी हेच जीवन आहे’ हे लक्षात घेऊन प्रत्येक नागरिकाने पाणी बचतीचा संकल्प करणे गरजेचे असल्याचे त्यांनी सांगितले. हवामानातील बदल आणि ‘सुपर अल निनो’च्या संभाव्य प्रभावामुळे आगामी काळात अतिउष्णतेची परिस्थिती निर्माण होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. त्याचा परिणाम पाणीपुरवठा तसेच शेतीवर होऊ शकतो. त्यामुळे भविष्यातील संभाव्य पाणीटंचाईचा सामना करण्यासाठी आतापासूनच पाण्याचा योग्य वापर करणे आवश्यक आहे. तसेच, नागरिकांनी पाण्याचा अपव्यय टाळून काटकसरीने वापर केल्यास मुरुड शहरातील पाणीटंचाईची समस्या कमी करण्यास मदत होईल. पाण्याची बचत ही काळाची गरज असून, नागरिक आणि प्रशासन यांच्या संयुक्त प्रयत्नांतूनच शहरातील पाणीटंचाईच्या समस्येवर प्रभावीपणे मात करता येईल. त्यामुळे प्रत्येकाने आजपासूनच पाणी बचतीचा संकल्प करून पाण्याचा प्रत्येक थेंब जपण्याची गरज आहे, असे मत सामाजिक कार्यकर्ते कुणाल सतविडकर यांनी व्यक्त केले.

# बायोमेट्रिक हजेरीचे आदेश कागदावरच ?

## ■ सिडको अन् महापालिकेच्या मौनावर ‘सजग नागरिक मंचा’चे प्रश्नचिन्ह

**। नवी मुंबई । प्रतिनिधी ।**

सरकारी कार्यालयांमध्ये बायोमेट्रिक हजेरी अनिवार्य असल्याचे स्पष्ट आदेश असतानाही तिची प्रत्यक्ष अंमलबजावणी नेमकी कशी सुरू आहे, यावरून नवी मुंबईत मोठा वाद निर्माण झाला आहे. सिडको, नवी मुंबई महानगरपालिका आणि कोकण भवन यांसारख्या महत्त्वाच्या प्रशासकीय कार्यालयांमध्ये बायोमेट्रिक नोंदी, कार्यालयीन वेळेचे पालन आणि नियमभंग करणाऱ्यांवर होणारी कारवाई यांबाबतची वस्तुस्थिती समोर कधी येणार, असा खरमरीत सवाल ‘सजग नागरिक मंच, नवी मुंबई’ यांनी उपस्थित केला आहे.

बायोमेट्रिक हजेरीची व्यवस्था केवळ यंत्र बसविण्यापुरती मर्यादित न ठेवता कर्मचाऱ्यांच्या येण्या-जाण्याच्या वेळा आणि शिस्तभंगाच्या कारवाईबाबत पारदर्शकता असणे आवश्यक आहे. या पार्श्वभूमीवर सजग नागरिक मंचाने २२ जुलै २०२६ रोजी सिडकोकडे माहिती अधिकार कायद्यान्वये अर्ज केला होता. यामध्ये १३ आणि १७ जुलै २०२६ या दोन दिवसांतील सिडको भवनातील अधिकारी व कर्मचाऱ्यांची बायोमेट्रिक हजेरी,



नियोजित वेळ, विलंबाबाबत झालेली कारवाई आणि वेतन धोरणाची जोड यांसारखी महत्त्वाची माहिती मागवण्यात आली होती. मात्र, विहित मुदत उलटून आणि प्रथम अपील दाखल करूनही सिडकोकडून कोणतीही समाधानकारक माहिती मिळालेली नाही. सिडकोप्रमाणेच नवी मुंबई महानगरपालिकेकडेही यासंदर्भात माहिती मागवण्यात आली होती. प्रशासनाच्या या उदासीन भूमिकेमुळे माहिती अधिकार कायद्याच्या प्रभावी अंमलबजावणीवरच प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

माहिती मिळण्यात येणाऱ्या अडचणी आणि अर्ज प्रलंबित ठेवण्याच्या प्रशासकीय वृत्तीविरोधात सजग नागरिक मंचाने १२ ऑक्टोबर २०२६ रोजी राज्य माहिती आयुक्त (कोकण विभाग) यांच्याकडे स्वतंत्र तक्रार दाखल केली आहे. या तक्रारीत सिडको, नवी मुंबई महानगरपालिका, ठाणे जिल्हाधिकारी कार्यालय आणि कोकण विभागीय आयुक्त कार्यालयातील गेल्या तीन वर्षांतील आरटीआय अर्ज व अपिलांचा ताळेबंद तपासावा. माहिती अधिकार कायद्याच्या अंतर्गत स्वयंस्फूर्त माहिती जाहीर केली जाते की नाही, याची पडताळणी व्हावी. तसेच, अर्ज प्रलंबित ठेवणाऱ्या किंवा अपूर्ण माहिती देणाऱ्या अधिकाऱ्यांवर नियमानुसार जबाबदारी निश्चित करून कारवाई करण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली.

कायद्यानुसार आरटीआय अर्जावर ३० दिवसांत तर प्रथम अपिलावर ४५ दिवसांत निर्णय होणे बंधनकारक आहे. तरीही नागरिकांना माहितीसाठी अर्ज, प्रथम अपील आणि तक्रारींचा फेरा मारावा लागत आहे. फक्त द्वितीय अपील करा, असे सांगून प्रशासन आपली जबाबदारी टाळू शकत नाही, असा इशारा मंचाने दिला आहे.

### प्रशासनाने वस्तुस्थिती स्पष्ट करावी

आता हा प्रश्न केवळ बायोमेट्रिक हजेरीपुरता मर्यादित राहिला नसून, सरकारी कार्यालयांतील पारदर्शकता आणि नागरिकांच्या माहिती मिळविण्याच्या मूलभूत अधिकाराचा बनला आहे. त्यामुळे सिडको आणि नवी मुंबई महानगरपालिकेने या प्रकरणावर मौन सोडून वस्तुस्थिती जाहीर करावी, अशी जोरदार मागणी नागरिकांमधून केली जात आहे.

## नवी मुंबई सुवर्णकार युवा मंचाचा शुभारंभ

**। नवी मुंबई । प्रतिनिधी ।**

नवी मुंबई सुवर्णकार विकास मंडळाच्या मार्गदर्शनाखाली नवी मुंबई सुवर्णकार युवा मंचातर्फे सभेचे आयोजन करण्यात आले होते. युवा मंचाची पहिली सभा रविवारी (दि.११) सहकोषाध्यक्ष तसेच युवा मंचाचे उपाध्यक्ष मिलिंद खरोटे यांच्या निवासस्थानी तुर्भे येथे पार पडली.

सभेची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते श्री संत नरहरी सोनार महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन व दीपप्रज्वलन करून झाली. या सभेत मंडळाचे अध्यक्ष सी.डी. मोरे यांनी अध्यक्षस्थानी होते. मंडळाचे सचिव विजय भामरे यांनी प्रास्ताविकातून युवा मंचाची



उद्दिष्टे स्पष्ट केली. युवक-युवतींना संघटित करणे, त्यांच्यात सामाजिक एकी वाढविणे, तसेच शैक्षणिक, सांस्कृतिक, क्रीडा, करिअर व व्यवसायविषयक उपक्रम राबविण्याबाबत सभेत चर्चा झाली.

आजची युवा पिढी ही पुढील पिढीचा वारस असून समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी युवा वर्ग, महिला वर्ग यांनी ही पुढे येणे ही काळाची गरज आहे. संत नरहरी सोनार महाराज समाजभवन उभारणीसह समाजाच्या सर्वांगीण विकासात युवकांनी सक्रिय सहभाग घ्यावा, असे आवाहन यावेळी करण्यात आले.

युवा मंचाचे अध्यक्ष चंद्रकांत विसपुते यांनी युवकांच्या ऊर्जेला योग्य दिशा देऊन समाजाच्या प्रगतीसाठी विविध उपक्रम राबविण्याचा संकल्प व्यक्त केला.

## केंद्र शाळा कुडली येथे वाचन प्रेरणा दिन उत्साहात



**सुतारवाडी :** भारतरत्न डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांच्या जयंतीनिमित्त केंद्र शाळा कुडली येथे वाचन प्रेरणा दिन उत्साहात साजरा करण्यात आला.

डॉ. कलाम यांनी आपल्या ज्ञान, विज्ञाननिष्ठ विचार आणि शिक्षणाप्रती असलेल्या समर्पणातून देशातील लाखो विद्यार्थ्यांना प्रेरणा दिली. विद्यार्थ्यांनी भरपूर वाचन करावे, ज्ञान मिळवावे आणि मोठी स्वप्ने पाहावीत, असा त्यांचा संदेश होता. या निमित्ताने शाळेतील सर्व विद्यार्थ्यांनी वाचन उपक्रमात उत्स्फूर्त सहभाग घेतला. सर्व विद्यार्थ्यांचे वाचन घेण्यात आले. विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची आवड निर्माण व्हावी आणि वाचन संस्कृती रुजावी, हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश होता.



(छायाचित्र : गणेश चोडणेकर)

## सि.एस.एन विद्यालयात सायबर जनजागृती

**। आगरदांडा । प्रतिनिधी ।**

मुरुड पोलीस ठाण्यातर्फे पोलीस निरीक्षक परशुराम कांबळे यांच्या मार्गदर्शनाखाली तालुक्यातील यशवंतनगर पंचक्रोशीतील सि.एस.एन. विद्यालयात सायबर जनजागृती कार्यक्रम घेण्यात आला.

पोलीस अतुल बागवे व सुमित वाकार्डे यांनी यावेळी विद्यालयातील शिक्षक व विद्यार्थ्यांना सायबर गुन्ह्यांविषयी माहिती दिली. तसेच फसवणूक झाल्याचे लक्षात येताच एक तासाच्या आत १९३० या क्रमांकावर आपली तक्रार नोंदवल्यास असे गुन्हे त्वरित उघडकीस आणले जाऊ शकतात, अशी माहिती दिली. आजकाल थेट चोरी, डाके तसेच दरोड्यांचे प्रमाण कमी झाले असले तरी सायबर गुन्ह्यांमध्ये वाढ झाली आहे. त्याकरीता सर्वांनी सजग राहून मोबाईल वरुन येणारे फ्रॉड कॉल, मेसेजेसला बळी न पडता केवळ जरुरी पुरतेच वापर करण्याचे आवाहन त्यांनी उपस्थितांना केले.

## अल्पवयीन मुलीच्या नवजात बाळाची विक्री

### ■ सहा जणांविरोधात गुन्हा दाखल

**। वसई । प्रतिनिधी ।**

नालासोपाऱ्यात अल्पवयीन मुलीच्या प्रसूतीनंतर नवजात बाळाची ४० हजार रुपयांना विक्री केल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. या प्रकरणी तुळींज पोलिसांनी अल्पवयीन मुलीवर अत्याचार केल्याचा आरोप असलेल्या २२ वर्षीय तरुणासह तिची आई, खासगी रुग्णालयातील डॉक्टर, मध्यस्थ महिला आणि बाळ विकत घेणाऱ्या दांपत्याविरोधात गुन्हे दाखल केले आहेत. याप्रकरणी संबंधित खासगी रुग्णालय सील करण्यात आले असून, मुख्य आरोपी तरुणाला अटक करण्यात आली आहे.

नालासोपारा पूर्व परिसरात राहणाऱ्या १७ वर्षीय मुलीचे त्याच परिसरातील २२ वर्षीय तरुणासोबत प्रेमसंबंध होते. या संबंधातून मुलगी गर्भवती राहिली. ही बाब तिच्या आईला समजल्यानंतर तिला रविवारी संतोषभुवन परिसरातील ‘सुर्या’ या खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले. या रुग्णालयातील डॉक्टर शाहीन शेख यांनी मुलीची मुदतपूर्व प्रसूती केल्याचा आरोप आहे. त्यानंतर दुसऱ्याच दिवशी नवजात बाळाची नालासोपारा येथील एका दांपत्याला ४० हजार रुपयांना विक्री करण्यात आल्याचे तपासात समोर आले आहे. यानंतर मुलीला रुग्णालयातून घरी पाठवण्यात आले.

घरी आल्यानंतर अल्पवयीन मुलीच्या पोटात तीव्र वेदना सुरू झाल्या. त्यामुळे तिला उपचारासाठी वसई-विरार महापालिकेच्या तुळींज रुग्णालयात दाखल करण्यात आले. तेथील डॉक्टरांनी तपासणी केल्यानंतर हा प्रकार उघडकीस आला. त्यानंतर तुळींज रुग्णालय प्रशासनाने याबाबत पोलिसांना माहिती दिली. त्यानंतर पोलिसांनी तपास सुरू करून या प्रकरणाशी संबंधित व्यक्तींची चौकशी केली.

याप्रकरणी अल्पवयीन मुलीवर अत्याचार केल्याचा आरोप असलेल्या तरुणाविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला. पोलिसांनी त्याला अटक केली असून, न्यायालयाने त्याला शनिवारपर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे.

## वीर वाजेकर महाविद्यालयात आर्थिक साक्षरता कार्यक्रम




**। चिरनेर । प्रतिनिधी ।**

उरण तालुक्यातील फुंडे येथील रयत शिक्षण संस्थेच्या वीर वाजेकर कला, विज्ञान व वाणिज्य महालण विभागातील महाविद्यालयात वाणिज्य विभागाच्या वतीने फायनान्स फोरम ऑफ इंडिया यांच्या सहकार्याने ‘आर्थिक साक्षरता कार्यक्रम उत्साहात पार पडला.

या कार्यक्रमासाठी फायनान्स फोरम ऑफ इंडियाचे वक्ते प्रणव पाटील उपस्थित होते. त्यांना तेजस कारेकर यांनी सहकार्य केले. प्रणव पाटील यांनी विद्यार्थ्यांना दैनंदिन आर्थिक व्यवहार, पैशांचे योग्य व्यवस्थापन, नियमित बचतीची सवय, गुंतवणुकीचे विविध पर्याय, आर्थिक नियोजन आणि भविष्यातील आर्थिक सुरक्षितता यांविषयी महत्त्वपूर्ण माहिती दिली. आर्थिक निर्णय घेताना योग्य माहिती मिळवणे, अनावश्यक खर्च टाळणे आणि उत्पन्नानुसार खर्चाचे नियोजन करणे आवश्यक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

आपल्या अध्यक्षीय भाषणात प्राचार्य डॉ. आमोद ठक्कर यांनी आर्थिक साक्षरतेचे आधुनिक जीवनातील महत्त्व अधोरेखित केले. या कार्यक्रमास प्रांजल भोईर, भूषण ठाकूर, प्रियांका ठाकूर यांनी सहकार्य केले.



## डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम यांची जयंती साजरी

**तळा :** जी.एम. वेदक कॉलेज ऑफ सायन्स, तळा येथील महाविद्यालयीन ग्रंथालयात गुरुवारी (दि.१५) भारताचे माजी राष्ट्रपती, थोर शास्त्रज्ञ आणि भारतरत्न डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांची जयंती साजरी करण्यात आली. हा दिवस वाचन प्रेरणा दिन म्हणून साजरा करण्यात आला. यावेळी कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे पुरुषोत्तम मुळे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना वाचनाचे महत्त्व अधोरेखित केले. वाचनामुळे विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास होतो, असे सांगितले. तसेच महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. सचिन बंगाळे यांनी विद्यार्थ्यांनी वाचनाला विशेष महत्त्व द्यावे, नियमित व अखंडित वाचन करावे, असे आवाहन केले. तर महाविद्यालयाचे ग्रंथपाल धवन एस.के. यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना वाचनाचे महत्त्व स्पष्ट केले.

**महिलांना ॲडव्हान्स टॅलीचे मोफत प्रशिक्षण | कर्जत नगरपरिषदेचा पुढाकार**

# कौशल्याधारित प्रशिक्षणाच्या माध्यमातून स्वावलंबनाकडे

**। कर्जत । प्रतिनिधी ।**

कर्जत नगरपरिषदेच्या महिला व बालकल्याण विभाग आणि लाईट ऑफ लाईफ ट्रस्ट यांच्या संयुक्त विद्यमाने कर्जत नगरपरिषद हद्दीतील महिलांसाठी एप्रिल ते जुलै या कालावधीत ॲडव्हान्स टॅलीचे मोफत प्रशिक्षण आयोजित करण्यात आले होते. या प्रशिक्षणाचा सांगता समारंभ आणि प्रमाणपत्र वितरण कार्यक्रम बुधवारी (दि.१४) कर्जत नगरपरिषदेच्या सभागृहात उत्साहात पार पडला.

या प्रशिक्षणाच्या माध्यमातून सुमारे ५० महिलांना संगणकीय



लेखा व्यवस्थापनाचे कौशल्य आत्मसात करण्याची संधी मिळाली असून, महिलांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देत त्यांना स्वावलंबी बनविण्याच्या दृष्टीने हा उपक्रम महत्त्वपूर्ण ठरला आहे.

कर्जत नगरपरिषद क्षेत्रातील बारावी उत्तीर्ण महिलांना ॲडव्हान्स टॅलीचे प्रशिक्षण देऊन त्यांच्यामध्ये रोजगाराभिमुख कौशल्ये विकसित करणे, त्यांना नोकरीच्या संधींसाठी सक्षम बनविणे आणि महिलांचे आर्थिक सक्षमीकरण साधणे हा या उपक्रमाचा प्रमुख उद्देश असल्याचे शशांक तळवटकर यांनी यावेळी सांगितले. महिलांना केवळ प्रशिक्षण देण्यापुरते मर्यादित न राहता त्यांना स्वतःच्या पायावर उभे राहण्यासाठी आवश्यक कौशल्ये उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न या उपक्रमातून करण्यात आल्याचेही त्यांनी नमूद केले. एकंदरीत हा उपक्रम महिलांना कौशल्याधारित प्रशिक्षणाच्या माध्यमातून स्वावलंबनाकडे नेणारा ठरला आहे.

### आर्थिकदृष्ट्या सक्षम होण्याचे आवाहन

या कार्यक्रमात महिला व बालकल्याण सभापती हर्षाली गायकवाड, उपसभापती अंजली कडू, उपनगराध्यक्ष संतोष पाटील, नगरसेवक महेंद्र चंदन आणि नगराध्यक्षा पुष्पा दगडे यांनी उपस्थित प्रशिक्षणार्थी महिलांना मार्गदर्शन केले. महिलांनी उपलब्ध होणाऱ्या प्रशिक्षणाच्या संधींचा लाभ घेऊन स्वतःची शैक्षणिक आणि व्यावसायिक प्रगती साधावी, कौशल्यांच्या जोरावर रोजगाराच्या संधी निर्माण कराव्यात आणि आर्थिकदृष्ट्या सक्षम व्हावे, असे आवाहन यावेळी करण्यात आले.

### प्रमाणपत्रांचे वितरण

कार्यक्रमाच्या शेवटी प्रशिक्षण पूर्ण केलेल्या महिलांना प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात आले. या प्रमाणपत्रांमुळे महिलांना आपल्या प्रशिक्षणाची अधिकृत नोंद मिळाली असून, भविष्यात रोजगाराच्या संधी शोधताना त्याचा उपयोग होऊ शकतो.

## निवडक



### शेखाडी येथे स्वरोजगार प्रशिक्षण शिबीर

**श्रीवर्धन :** ग्रामीण भागातील महिलांना उत्पन्नाचे साधन उपलब्ध करून देऊन त्यांना स्वावलंबी बनवण्याच्या उद्देशाने, सोळाव्या वित्त आयोगाअंतर्गत ग्रामपंचायत शेखाडी येथे राज फाउंडेशन, दापोली यांच्या सौजन्याने महिलांसाठी विशेष कौशल्य विकास व व्यवसाय प्रशिक्षण शिबिराचे मंगळवारी (दि.१३) आयोजन करण्यात आले होते. या शिबिरात २८ महिलांनी सहभाग नोंदवला. या प्रशिक्षण शिबिरामध्ये राज फाउंडेशनचे अध्यक्ष संतोष गाठे यांनी उपस्थित महिलांना मेणबत्ती बनवणे, अत्तर, फिनेल, भांडी घासण्याचे लिक्विड, हँड वॉश, अगरबत्ती तसेच स्टॉकिंगची फुले बनवण्याचे प्रात्यक्षिक दाखवून मोलाचे मार्गदर्शन केले. महिलांनी स्वतःच्या पायावर उभे राहून आपला संसार सक्षमपणे उभा करावा, हा या प्रशिक्षणाचा मुख्य हेतू आहे. या कौशल्य विकास प्रशिक्षणाचे उत्कृष्ट नियोजन शेखाडी ग्रामपंचायतीचे सरपंच बबन पाटील व ग्रामविकास अधिकारी हरीश मेंदाडकर यांनी केले. या उपक्रमामुळे स्थानिक महिलांमध्ये रोजगाराबाबत उत्साह दिसून आला.



### आकादेवी मंदिरात मोफत आरोग्य शिबीर

**श्रीगाव :** अलिबाग तालुक्यातील श्रीगाव येथील आकादेवी मंदिरात मरीदेवी ग्रामस्थ मंडळ व आकादेवी ग्रामस्थ मंडळ यांच्यावतीने जे.एस.डब्ल्यू. फाऊंडेशन आणि जे.एस.डबल्यू. लिमिटेड डोलवी-पेण यांच्या विद्यमाने नवरात्रोत्सवाच्या निमित्ताने आरोग्य शिबीर आयाजित करण्यात आले होते. या शिबिरात १५४ पेक्षा जास्त रूग्णांची तपासणी करून त्यांना मोफत औषधे देण्यात आली. हे शिबीर आयोजित केल्यामुळे नवरात्रौत्सवात आकादेवीचे दर्शनासाठी आलेल्या भाविकांनाही आरोग्य शिबीराचा लाभ घेता आला, याबद्दल भक्तगणांनी आयोजन समितीचे आभार मानले.



### नवघरच्या शाळेत वाचनसंस्कृतीचा जागर

**पाली/बेणसे :** रायगड जिल्हा परिषद आदर्श शाळा नवघर येथे भारताचे माजी राष्ट्रपती, थोर शास्त्रज्ञ व विद्यार्थ्यांचे प्रेरणास्थान डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांच्या जयंतीनिमित्त वाचन प्रेरणा दिन उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी डॉ. कलाम यांच्या प्रतिमेचे पूजन करून आयडॉल शिक्षक राजेंद्र अंबिके यांनी वाचन प्रेरणा दिनाचे महत्त्व आणि डॉ. कलाम यांच्या प्रेरणादायी जीवनकार्याची माहिती विद्यार्थ्यांना दिली. ‘आज दिवसभर शाळा नवघरकर वाचत आहेत!’ या संकल्पनेतून शाळेत विशेष वाचन उपक्रम राबविण्यात आला. वाचनालयातील पुस्तके विद्यार्थ्यांसाठी खुली करून विद्यार्थ्यांना आपल्या आवडीची पुस्तके निवडून शांततेत वाचन करण्याची संधी देण्यात आली. वाचलेल्या पुस्तकाचा सारांश लिहिणे, त्यातील विचार समजून घेणे आणि पुस्तकाविषयी स्वतःचे मत व्यक्त करणे, अशा कृतींतून विद्यार्थ्यांनी वाचनाचा आनंद घेतला. या उपक्रमात विद्यार्थ्यांनी वाचलेल्या पुस्तकांविषयी आपली मते स्वतःच्या शब्दांत मांडली. त्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची आवड, विचारक्षमता आणि अभिव्यक्ती कौशल्य विकसित होण्यास प्रोत्साहन मिळाले. ‘‘वाचाल तर वाचाल आणि पुढे मोठे व्हाल!’’ असा संदेश देत राजेंद्र अंबिके यांनी विद्यार्थ्यांना नियमित वाचनाची सवय लावण्याचे आवाहन केले. या उपक्रमाचे नियोजन शिक्षिका रुपाली लेंडवे व अनुजा माने यांनी केले.

### बिबट्यासंदर्भात जनजागृती

**पालघर :** बिबट्याच्या वावरामुळे निर्माण होणारी भीती आणि गैरसमज दूर करून मानव-वन्यजीव संघर्ष रोखण्यासाठी वनविभागाने पालघर तालुक्यातील मौजे नवली येथील भोगले पाडा-२ येथे जनजागृती कार्यक्रम आयोजित केला होता. या उपक्रमात सुमारे १०० ते १२० ग्रामस्थांनी सहभाग घेतला. वनपरिक्षेत्र अधिकारी सुशील नांदवटे यांनी ग्रामस्थांना बिबट्याचे वर्तन, मानवी वस्तीजवळ त्याच्या वावराची कारणे आणि संभाव्य हल्ले टाळण्यासाठी घ्यावयाच्या खबरदारीबाबत मार्गदर्शन केले. बिबट्या दिसला म्हणजे तो माणसावर हल्ला करणारच, असा समज चुकीचा आहे. त्यामुळे अफवांवर विश्वास न ठेवता शांतता राखावी आणि बिबट्याच्या हालचालींची माहिती तातडीने वनविभागाला द्यावी, असे आवाहन त्यांनी केले. तसेच रात्री पाळीव जनावरांना सुरक्षित गोठ्यात बांधणे, घराजवळ अन्नकचरा उघड्यावर न टाकणे, अंधारात एकट्याने बाहेर जाणे टाळणे आणि लहान मुलांवर विशेष लक्ष ठेवणे, अशा उपाययोजना ग्रामस्थांना समजावून सांगण्यात आल्या. बिबट्या अचानक समोर आल्यास घाबरून पळू नये, त्याला दगड मारू नये किंवा घेरण्याचा प्रयत्न करू नये. सुरक्षित अंतर राखून त्याला निघून जाण्यासाठी मार्ग द्यावा, असेही सांगण्यात आले.

### मदन गावंड यांना देवाज्ञा



**चिरनेर :** उरण तालुक्यातील वशेणी गावातील सुप्रसिद्ध कीर्तनकार, प्रवचनकार, भजनी बुवा, काकडआरती व अखंड हरिनाम सेवाकार मदनबुवा काशिनाथ गावंड (७८) यांचे मंगळवारी (१३) निधन झाले. ते आप्पा माऊली या नावाने जिल्ह्यात प्रसिद्ध होते. त्यांच्या निधनाने उरण तालुक्यासह संपूर्ण रायगड जिल्ह्यात हळहळ व्यक्त करण्यात येत आहे. त्यांच्या पश्चात दोन मुलगे, दोन मुली, सुना, जावई, नातवंडे व पंतवंडे असा आप्त परिवार आहे. त्यांनी केवळ कीर्तन प्रवचनाच्या माध्यमातून अध्यात्माची पताका फडकवली नाही, तर सामाजिक व धार्मिक क्षेत्रातही त्यांनी मोठे योगदान दिले आहे.

# अंगणवाडी सेविका, मदतनीसांना दिवाळीपूर्वी दिलासा

## प्रत्येकी २००० रुपये भाऊबीज भेट जाहीर

**| रायगड | प्रतिनिधी |**

राज्यातील एकात्मिक बाल विकास सेवा योजनेंतर्गत कार्यरत असलेल्या अंगणवाडी सेविका आणि अंगणवाडी मदतनीसांना सन २०२६-२७ या आर्थिक वर्षासाठी प्रत्येकी दोन हजार रुपये भाऊबीज भेट देण्यास राज्य सरकारने मंजुरी दिली आहे.

या रकमेच्या वितरणासाठी महिला व बाल विकास विभागाने ४२ कोटी ८१ लाख ९४ हजार रुपयांचा निधी उपलब्ध करून दिला आहे. १४ ऑक्टोबर रोजी यासंदर्भातील शासन निर्णय जारी करण्यात आला असून, भाऊबीज भेट तातडीने अदा करण्यासाठी आवश्यक कार्यवाही करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

महिला व बाल विकास विभागाने जारी केलेल्या या निर्णयामुळे राज्यातील एकात्मिक बाल विकास सेवा योजनेंतर्गत कार्यरत अंगणवाडी सेविका आणि मदतनीसांना आर्थिक दिलासा मिळणार आहे. अंगणवाडी सेविका आणि मदतनीस या बालकांचे पोषण, आरोग्यविषयक जागृती आणि बालविकासाशी संबंधित विविध शासकीय योजनांच्या अंमलबजावणीत महत्त्वाची भूमिका बजावतात. त्यांच्या कामाची दखल घेऊन दरवर्षी दिल्या जाणाऱ्या भाऊबीज भेटीच्या अनुषंगाने यंदाच्या आर्थिक वर्षासाठी निधी मंजूर करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

एकात्मिक बाल विकास सेवा योजनेचे आयुक्त, महाराष्ट्र राज्य, नवी मुंबई यांनी ४ सप्टेंबर रोजी सादर केलेल्या प्रस्तावाच्या आधारे ही मंजुरी देण्यात आली आहे. या योजनेअंतर्गत कार्यरत अंगणवाडी सेविका आणि मदतनीसांना प्रत्येकी दोन हजार रुपये देण्याची तरतूद करण्यात आली आहे.

राज्यात १,०८,६२७ अंगणवाडी सेविका आणि १,०५,४७० अंगणवाडी मदतनीस आहेत. त्यामुळे, दोन्हीची एकूण पदसंख्या २,१४,०९७ एवढी कार्यरत आहे. या सर्व कार्यरत अंगणवाडी सेविका व मदतनीस यांना प्रत्येकी दोन हजार रुपये भाऊबीज भेट देण्यात येणार आहे. त्यासाठी ४२ कोटी ८१ लाख ९४ हजार रुपयांचा निधी उपलब्ध करून देण्यात आला आहे. यंदाची अंगणवाडी सेविका, मदतनीसांची दिवाळी आनंदात जाणार आहे.



### वित्त विभागाची सहमती

वित्त विभागाने १६ सप्टेंबर रोजी दिलेल्या अनौपचारिक संदर्भातील सहमतीनुसार हा शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे.या निर्णयामुळे राज्यातील अंगणवाडी सेविका आणि मदतनीसांना सणासुदीच्या काळात आर्थिक मदत उपलब्ध होण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. तथापि, प्रत्यक्ष वितरणाची तारीख शासन निर्णयात नमूद केलेली नसून, संबंधित यंत्रणेकडून पुढील कार्यवाही झाल्यानंतर पात्र कर्मचाऱ्यांना ही रक्कम मिळणार आहे.

### निधी वितरणासाठी आयुक्त नियंत्रक अधिकारी

शासन निर्णयानुसार, भाऊबीज भेटीच्या वितरणासाठी एकात्मिक बाल विकास सेवा योजना, महाराष्ट्र राज्य, नवी मुंबई येथील आयुक्तांना नियंत्रक अधिकारी म्हणून घोषित करण्यात आले आहे. सन २०२६-२७ या आर्थिक वर्षात मंजूर केलेल्या तरतुदींमधून हा खर्च भागविण्यात येणार आहे. त्यासाठी पोषण आहाराशी संबंधित लेखाशीर्षाखाली ४२ कोटी ८१ लाख ९४ हजार रुपयांचा निधी उपलब्ध करून देण्यात आला आहे. या निधीच्या वितरणाची जबाबदारी संबंधित आयुक्तांवर सोपविण्यात आली असून, पात्र अंगणवाडी सेविका आणि मदतनीसांना भाऊबीज भेट वेळेत मिळावी, यासाठी आवश्यक ती कार्यवाही करण्याचे स्पष्ट निर्देश शासनाने दिले आहेत.

# आंतरराष्ट्रीय शैक्षणिक व्यासपीठावर सीएसएमयुची भरारी!

## मानसशास्त्राचे ९ विद्यार्थी आणि १ प्राध्यापक मलेशियात विद्यापीठाचे प्रतिनिधित्व करणार

**| रसायनी | प्रतिनिधी |**

शेडुंग येथील छत्रपती शिवाजी महाराज विद्यापीठातील विद्यार्थ्यांना आंतरराष्ट्रीय शैक्षणिक अनुभवाची संधी उपलब्ध करून देण्यासाठी विद्यापीठाने आणखी एक महत्त्वपूर्ण पाऊल उचलले आहे. विद्यापीठाच्या सीआयआर या विभागाच्या आंतरराष्ट्रीयीकरण उपक्रमांतर्गत विद्यापीठाचे १० सदस्यीय प्रतिनिधीमंडळ मलेशियातील इंटी इंटरनॅशनल युनिर्व्हसिटी येथे आयोजित इंटरनॅशनल स्टडीज इन सायकॉलॉजी इनोव्हेशन रिसर्च अँण्ड एक्सपिरिअन्स या दोन आठवड्यांच्या आंतरराष्ट्रीय शैक्षणिक कार्यक्रमात सहभागी होणार आहे. या प्रतिनिधीमंडळात मानसशास्त्र विषयाचे ९ विद्यार्थी आणि १ प्राध्यापक प्रतिनिधी यांचा समावेश आहे. हा कार्यक्रम १४ ते २९ ऑक्टोबर २०२६ या कालावधीत आयोजित करण्यात आला आहे.

या आंतरराष्ट्रीय शैक्षणिक कार्यक्रमाचा मुख्य उद्देश विद्यार्थ्यांना मानसशास्त्र, संशोधन पद्धती, आंतरविद्याशाखीय अध्ययन, शैक्षणिक लेखन आणि सांस्कृतिक विविधता या क्षेत्रांतील जागतिक स्तरावरील अनुभव प्रदान करणे हा आहे. या कार्यक्रमाच्या माध्यम ातून विद्यार्थ्यांना आंतरराष्ट्रीय प्राध्यापकांशी संवाद साधण्याची, संशोधन प्रस्ताव विकसित करण्याची, बिब्लिओमेट्रिक विश्लेषण करण्याची आणि संशोधन लेखनाचे कौशल्य विकसित करण्याची संधी मिळणार आहे. याशिवाय विविध सांस्कृतिक उपक्रमांमध्ये सहभागी होऊन आंतरराष्ट्रीय संस्कृती आणि शैक्षणिक परंपरांची ओळख करून घेता येणार आहे.

या प्रतिनिधी मंडळाच्या प्राध्यापक समन्वयक म्हणून डॉ. पल्लवी डोंगरे या नेतृत्व करणार आहेत. या आंतरराष्ट्रीय कार्यक्रमाचे नियोजन, विद्यार्थ्यांचा सहभाग, परदेशी विद्यापीठाशी समन्वय आणि आवश्यक प्रशासकीय व्यवस्था यशस्वीपणे पार पाडण्यासाठी डॉ. पल्लवी डोंगरे आणि डॉ. भावेश पासी यांचे महत्त्वपूर्ण योगदान राहिले आहे. विद्यापीठाचे चेअरमन यांच्या दूरदृष्टीपूर्ण मार्गदर्शनातून विद्यार्थ्यांना जागतिक शैक्षणिक वातावरणाशी जोडणे, त्यांच्या संशोधन क्षमतांना चालना देणे आणि आंतरराष्ट्रीय दृष्टिकोन विकसित करणे या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात येत आहे.

या सहभागामुळे विद्यार्थ्यांना केवळ पुस्तकी ज्ञानापुरते मर्यादित न राहता प्रत्यक्ष आंतरराष्ट्रीय शैक्षणिक वातावरणात शिकण्याची, संशोधनविषयक कौशल्ये विकसित करण्याची आणि विविध देशांतील शैक्षणिक दृष्टिकोन समजून घेण्याची संधी मिळणार आहे. भविष्यातील शैक्षणिक आणि व्यावसायिक आव्हानांना आत्मविश्वासाने सामोरे जाण्यासाठी हा अनुभव विद्यार्थ्यांसाठी उपयुक्त ठरणार आहे.

# रस्त्यातील काढलेला गतिरोधक बसवला

- **सागर चौलकर यांनी दिला होता आमरण उपोषणाचा इशारा**
- **नगरपरिषद प्रशासनाने घेतली दखल**



**| कोर्लई | वार्ताहर |**

रस्त्यावर भरधाव वेगाने जाणाऱ्या वाहनांमुळे अपघाताची शक्यता लक्षात घेऊन नगरपरिषदेला अर्ज विनंत्या करून मुरुडच्या गणेशआळी ते सुपारी संघ दरम्यान बसविण्यात आलेला गतिरोधक काढण्यात आला.याला वरदहस्त कोणाचा? असा सवाल नागरिक सागर चौलकर यांनी उपस्थित केला होता. काढण्यात आलेला गतिरोधक तातडीने बसविण्यात न आल्यास उपोषणाला बसणार असल्याचा इशारा देण्यात आला होता. अखेर नगरपरिषद प्रशासनाने दखल घेऊन गणेश आळीतील काढण्यात आलेला गतिरोधक बसविण्यात आला.

नगरपरिषद प्रशासनाने दखल घेऊन गणेश आळीतील काढण्यात आलेला गतीरोधक बसविण्यात आल्याने सामाजिक कार्यकर्ते सागर चौलकर यांनी समाधान व्यक्त केले असून नगरपरिषदेचे उपनगराध्यक्ष विरेंद्र भगत व नगरसेवक, अधिकारी वर्गाचे आभार मानले आहेत.

# 'अमृतपेठ थेट स्वदेशी बाजारपेठ'चे आयोजन

**पनवेल :** अमृत पेठ थेट स्वदेशी बाजारपेठ उपक्रम रायगड जिल्ह्यातील पनवेल शहरात संघ मित्र सोसायटी संपन्न होत आहे. रायगड जिल्ह्यातील लघुउद्योजकांना व नागरिकांनी अमृतपेठ थेट बाजारपेठ पनवेल येथे सहकुटुंब भेट देऊन नवउद्योजकांना प्रोत्साहित करण्यात येणार आहे. संचालक अमृत यांची संकल्पना असलेली पनवेल अमृतपेठ बाजारपेठेच्या आयोजन केले आहे. संगम मित्र सोसायटीत पनवेल जिल्हा रायगड येथे अमृत पेठ शनिवारी(दि.१७) होणार आहे. सकाळी १०.०० ते रात्री ९.०० वाजेपर्यंत पनवेलमधील नव उद्योजकांसाठी बाजारपेठ खुली असणार आहे.याचा लाभ घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# डिझेलची चोरी

**| पनवेल | प्रतिनिधी |**

पनवेल तालुक्यातील तळोजा येथील एमआयडीसीमध्ये दिवसाढवळ्या चोऱ्यांचे प्रमाण वाढले आहे. अज्ञात चोरांनी चोऱ्या करून आपली दहशत निर्माण करीत पोलिसांना आव्हान दिले आहे.

ट्रेलरमधून २४० लिटर डिझेलची चोरी केल्याप्रकरणी तळोजा पोलीस ठाण्यात १३ ऑक्टोबर रोजी गुन्हा दाखल करण्यात आला. एएनएम कंपनी तळोजा एमआयडीसी येथे आर आर रोडवेज यांच्या मालकीचा ट्रेलर रस्त्याच्या कडेला पार्क करून चालक ट्रेलरमध्ये झोपला होता. त्यावेळी चोराने डिझेल टाकीतील २४० लिटर डिझेल चोरून नेले.

# दिव्यांग विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाला चालना देणार : आदिती तटकरे

**| म्हसळा | प्रतिनिधी |**

समग्र शिक्षा अभियानांतर्गत समावेशित शिक्षण उपक्रमाच्या माध्यमातून म्हसळा तालुक्यातील दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी तालुकास्तरीय दिव्यांग विद्यार्थी संसाधन कक्ष व थेरपी सेंटर सुरू करण्यात आले आहे. महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांच्या शुभहस्ते या केंद्राचे उद्घाटन करण्यात आले. या सुविधेमुळे दिव्यांग विद्यार्थ्यांना आवश्यक थेरपी व शैक्षणिक मार्गदर्शनासाठी तालुक्याबाहेर जाण्याची गरज कमी होणार असून, त्यांच्या पालकांना मोठा दिलासा मिळणार आहे.



उद्घाटनप्रसंगी आदिती तटकरे यांनी म्हसळा तालुक्यातील दिव्यांग विद्यार्थ्यांचा सविस्तर आढावा घेतला. विद्यार्थ्यांना सध्या उपलब्ध करून देण्यात येणाऱ्या शैक्षणिक व अन्य सुविधांची माहिती जाणून घेत त्यांनी संबंधित यंत्रणेशी चर्चा केली. दिव्यांग विद्यार्थ्यांच्या गरजा लक्षात घेऊन त्यांना आवश्यक सेवा-सुविधा उपलब्ध करून देण्याचे महत्त्वही यावेळी अधोरेखित करण्यात आले.

# कन्या पूजन सोहळ्याचे आयोजन

**| रसायनी | प्रतिनिधी |**

आंतरराष्ट्रीय बजरंग दल, रसायनी यांच्यावतीने शनिवारी (दि. १७ ) मोहोपाडा येथील श्री दत्त मंदिर, मुख्य बाजारपेठ येथे भव्य कन्या पूजन सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. हा धार्मिक कार्यक्रम सायंकाळी ५.३० वाजता संपन्न होणार आहे.

नवरात्रोत्सवातील देवीच्या उपासनेचे महत्त्व लक्षात घेऊन कन्येमध्ये दुर्गादेवीचे स्वरूप पाहत तिचा सन्मान आणि पूजन करण्याच्या उद्देशाने या सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमात आई-वडिलांनी आपल्या कन्येचे पाय धुऊन, आरती ओवाळून विधिवत पूजन करावे, असे आवाहन आंतरराष्ट्रीय बजरंग दलाच्या आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

या सोहळ्यासाठी उपस्थित राहणाऱ्या सर्वांसाठी नाश्त्याची व्यवस्था करण्यात आली आहे. तसेच, कन्या पूजनानंतर अंतरराष्ट्रीय बजरंग दलाच्या वतीने पूजन झालेल्या कन्यांना भेटवस्तू देण्यात येणार आहेत. पूजनासाठी येताना आई-वडिलांनी सोबत फक्त ताट आणि तांब्या घेऊन यावा, असेही आयोजकांनी कळविले आहे.या धार्मिक सोहळ्यात परिसरातील नागरिकांनी आपल्या कन्यांसह मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन अंतरराष्ट्रीय बजरंग दल, रसायनी-पाताळगंगा परिसराच्या वतीने करण्यात आले आहे.

# कर्जमुक्तीच्या तिसऱ्या यादीत १ हजार ३३४ शेतकरी

- **जिल्हा उपनिबंधक तनवीर पाटील यांची माहिती**
- **लाभार्थ्यांना आधार प्रमाणीकरण करण्याचे आवाहन**

**| रायगड | प्रतिनिधी |**

शासनाने पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना सुरु केली आहे. या योजनेंतर्गत रायगड जिल्ह्यातील तिसऱ्या यादीमधील पात्र लाभार्थी शेतकरी लाभार्थ्यांची यादी बँक शाखा, विकास संस्था व ग्राम पंचायतीमध्ये प्रसिध्द करण्यात येणार आहे. कर्ज मुक्तीच्या तिसऱ्या यादीत १ हजार ३३४ शेतकऱ्यांचा समावेश आहे.

लाभार्थ्यांनी महा-ई-सेवा केंद्रे व कॉमन सर्व्हिस सेंटर येथे जाऊन आधार प्रमाणीकरण करावे, असे आवाहन जिल्हा उपनिबंधक तनवीर पाटील यांनी केले आहे.



पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजनेंतर्गत दि.०१ एप्रिल २०१९ ते ३१ मार्च २०२५ या कालावधीत वितरित झालेल्या व दि.३०सप्टेंबर २०२५ पर्यंत थकित असलेल्या व दि. ३१ मार्च २०२६ पर्यत परतफेड न झालेल्या पीक कर्ज व पुनर्गठित, फेरपुनर्गठित कर्जास रुपये दोन लाखापर्यत कर्जमुक्तीचा लाभ देण्यात येणार आहे. या योजनेची अंमलबजावणी ऑनलाईन संगणकीय प्रणालीद्वारे करण्यात येत असून यासाठी शासनाने महाआयटी यांची नियुक्ती केली आहे. या योजनेसाठी महाआयटी यांनी तयार केलेल्या योजना पोर्टलवर रायगड जिल्ह्यातील बँकांनी एकूण १२ हजार ६८२ थकीत कर्ज खात्यांची माहिती अपलोड केली आहेत. महाआयटी यांनी संगणकीय संस्करण करुन ७ हजार ३६७ शेतकऱ्यांची पहिली यादी, १ हजार ३७४ शेतकऱ्यांची दुसरी यादी आणि १ हजार ३३४ शेतकऱ्यांची तिसरी यादी अशी आज अखेर एकूण १० हजार ०७५ लाभार्थी शेतकऱ्यांची यादी आधार प्रमाणीकरणासाठी प्रसिध्द केली आहे.

बँक शाखा, विकास संस्था व ग्रामपंचायतीमध्ये प्रसिध्द करण्यात आलेली यादी कर्जमुक्तीची आहे. या यादीतील शेतकऱ्यांना संपूर्ण कर्जमुक्तीचा लाभ देण्यात येत आहे. या यादीतील शेतकऱ्यांच्या कर्जबाकीची रक्कम दि.३१ मार्च २०२६ रोजीची आहे. दि.०१ एप्रिल २०२६ रोजी नंतरचे व्याज व इतर खर्च माफ करण्यात येणार आहे. शेतकऱ्यांनी दि.३१ मार्च २०२६ रोजीच्या कर्ज थकबाकीची खातरजमा करुन नजीकच्या आपले सेवा केंद्रावर जाऊन आधार प्रमाणीकरण करावे.

# चार लाखांचे ब्रेसलेट चोरले

**| पनवेल | प्रतिनिधी |**

पनवेल शहरातील लाईफ केअर येथे आपल्या आजारावर उपचार करून घरी परतून अराम करणाऱ्या एकाच्या हातातील ब्रेसलेट अज्ञात चोरांनी काढून नेल्याची घटना घडली. चार लाखांचे ब्रेसलेट चोरल्या प्रकरणी खांदेश्वर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. यातील फिर्यादी हनुमंता संदीपोग यांच्यावर लाईफ केअर हॉस्पिटल येथे उपचार सुरू होते. त्यांच्यावर दवा उपचार करून ते घरी गेल्यानंतर ते झोपले असताना आरोपीने त्यांच्याकडील चार लाख रुपयांचे ब्रेसलेट चोरले.

## मिनी ट्रेन सेवा २० ऑक्टोबरपासून सुरू | पर्यटकांना मिळणार दिलासा

# दसऱ्याच्या मुहूर्तावर धावणार माथेरानची राणी!

**| माथेरान | प्रतिनिधी |**

पावसाळ्यामुळे बंद असलेली नेरळ-माथेरान मिनी ट्रेन दसऱ्यापासून पुन्हा सुरू होणार आहे. मंगळवारपासून (दि. २०) ही सेवा पूर्ववत होईल. त्यामुळे पर्यटकांना नेरळपासूनच माथेरानपर्यंत मिनी ट्रेनने प्रवास करता येईल. दसऱ्याच्या मुहूर्तावर मिनी ट्रेन सुरू होत असल्याने माथेरानमधील पर्यटनाला चालना मिळण्याची अपेक्षा आहे.



अतिवृष्टी आणि दरड कोसळण्याचा धोका लक्षात घेऊन मध्य रेल्वेने १५ जूनपासून नेरळ-अमन लॉजदरम्यानची नियमित सेवा बंद केली होती; मात्र अमन लॉज माथेरानदरम्यान शटल सेवा सुरू होती. त्यामुळे पर्यटकांना अमन लॉजपासून पुढे मिनी ट्रेनने प्रवास करता येत होता. आता मंगळवारपासून (दि. २०) नेरळ-अमन लॉजदरम्यानची सेवाही सुरू होणार आहे.

हिरव्यागार डोंगरांतून निसर्गसफरमाथेरानची राणी म्हणून ओळखली जाणारी मिनी ट्रेन पर्यटकांचे प्रमुख आकर्षण आहे. वळणावळणाच्या रेल्वे मार्गावरून धावताना हिरव्यागार डोंगरांचे आणि निसर्गरम्य परिसराचे दर्शन घडते. पावसाळ्यानंतरचा निसर्ग पाहण्यासाठी माथेरानला येणाऱ्या पर्यटकांना या प्रवासाची विशेष उत्सुकता असते.

पर्यटकांना निसर्गसफरीचा आनंद घेण्यासाठी आणखी एक पर्याय उपलब्ध होईल. याचा फायदा स्थानिक पर्यटन व्यवसायालाही होण्याची शक्यता आहे.

माथेरान हे थंड हवेचे ठिकाण म्हणून जग प्रसिद्ध आहे. येथे बारा महिने पर्यटकांची रेलचेल सुरु असते. पावसाळ्यात मिनी ट्रेनबंद असल्याने पर्यटकांचा ओघ कमी असतो. आता पावसाळा संपल्याने मिनीट्रेनसुरु होऊन पर्यटकांची पावले माथेरानकडे वळणार आहेत.

## निवडक

# माणगावमध्ये 'सेवा संकल्प अभियान' उत्साहात

**माणगाव :** शासकीय योजनांचा लाभ पात्र लाभार्थ्यांपर्यंत थेट, सुलभ आणि गतिमान पद्धतीने पोहोचविण्याच्या उद्देशाने माणगाव येथे आयोजित 'सेवा संकल्प अभियान' शिबिराला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. या शिबिराच्या माध्यमातून तालुक्यातील ४५३ लाभार्थ्यांना विविध शासकीय योजनांचे लाभ व प्रमाणपत्रे वितरित करण्यात आली. यापैकी ६८ लाभार्थ्यांना रायगड जिल्ह्याचे पालकमंत्री भरत गोगावले आणि महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांच्या हस्ते प्रातिनिधिक स्वरूपात लाभ व प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात आले.यावेळी जिल्हाधिकारी किशन जावळे, अपर जिल्हाधिकारी आणि उपविभागीय अधिकारी डॉ.संदीपान सानप उपविभागीय अधिकारी, नगराध्यक्ष, पंचायत समिती सभापती, जिल्हा परिषद सदस्य, पंचायत समिती सदस्य, नगरसेवक, विविध विभागांचेअधिकारी-कर्मचारी, लोकप्रतिनिधी आणि मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित होते.शिबिरात महसूल विभागामार्फत नॉन-क्रिमीलेअर दाखला, जातीचा दाखला, उत्पन्नाचा दाखला, अधिवास दाखला, गाव नमुना उतारे, जन्म-मृत्यू नोंदणी आणि शिधापत्रिकेसह विविध सेवा उपलब्ध करून देण्यात आल्या. महिला व बालविकास विभागामार्फत लेक लाडकी योजना, प्रधानमंत्री मातृवंदना योजना आणि बेबी केअर किटचा लाभ देण्यात आला. उपजिल्हा रुग्णालयामार्फत दिव्यांग प्रमाणपत्रे व विवाह नोंदणी प्रमाणपत्रे, तर नगरपंचायतीमार्फत अतिक्रमण नियमानुकूल सनद, प्रधानमंत्री आवास योजना, शबरी आदिवासी घरकुल योजना आणि जन्म-मृत्यू प्रमाणपत्रांसंबंधी सेवा पुरविण्यात आल्या.पंचायत समितीमार्फत विवाह नोंदणी प्रमाणपत्र, जन्म दाखला वितरित करण्यात आला. तालुका कृषी अधिकारी कार्यालयामार्फत महिला शेतकरी प्रमाणपत्र व कृषी यांत्रिकीकरण योजनेंतर्गत ट्रॅक्टर अनुदानाचा लाभ देण्यात आला. तालुका आरोग्य अधिकारी कार्यालयामार्फत आयुष्मान भारत कार्ड, तर राज्य परिवहन महामंडळाच्या माणगाव आगारामार्फत राष्ट्रीय समान गतिशीलता कार्ड वितरित करण्यात आले.

# टाटा पॉवरचा पाणीपुरवठा घटला; अशोक जानोरकर आक्रमक

**पनवेलच्या पाणीपुरवठ्यासाठी टाटा पॉवरवरील अवलंबित्व कमी करून पर्यायी व्यवस्था निश्चित करावी. न्हावा-शेवा टप्पा ३ चे काम लवकर पूर्ण करण्यासाठी सिडको, जलसंपदा विभाग आणि महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या अधिकाऱ्यांची संयुक्त बैठक आयोजित करून कालबद्ध कृती आराखडा तयार करावा,फ्फ अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाचे प्रदेश सचिव अशोक जानोरकर यांनी केली.**

**पनवेल :** खोपोली येथील टाटा पॉवर जनरेशनमधून होणारा पाणीपुरवठा कमी झाल्याने पनवेल शहर आणि परिसरातील जलपुरवठ्यावर परिणाम झाला आहे. पाताळगंगा नदीची पाणीपातळी घटल्यामुळे महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या न्हावा-शेवा योजनेअंतर्गत वायाळ हेडवर्क येथील पंपांना पुरेसे पाणी उपलब्ध न झाल्याने ते बंद ठेवण्यात आले होते. सध्या मर्यादित प्रमाणात पाणीपुरवठा सुरू असून, भोकरपाडा येथील पुरवठ्यावरही परिणाम झाल्याची माहिती आहे. मात्र, टाटा पॉवरकडून पुरवठा कमी होण्याचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही.पनवेलची वाढती लोकसंख्या आणि पाण्याची मागणी लक्षात घेता, पर्यायी जलस्रोत उपलब्ध करण्याची गरज अधोरेखित झाली आहे. न्हावा-शेवा पाणीपुरवठा योजनेचा टप्पा ३ फेब्रुवारी २०२६ पर्यंत पूर्ण होईल, असे सांगण्यात आले होते. मात्र, ऑक्टोबरमध्येही काम अपूर्ण असल्याने त्याच्या सद्यस्थितीबाबत प्रशासनाने स्पष्ट माहिती द्यावी, अशी मागणी होत आहे.पाणीपुरवठ्यातील अडचणी दूर करून नागरिकांना नियमित पाणी मिळण्यासाठी संबंधित यंत्रणांनी समन्वयाने कार्यवाही करावी, असेही त्यांनी नमूद केले.


## क्लासिफाईड

जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

- **सन स्टोन रीअल इस्टेट** अलिबाग ते मांडवा बंगलो+प्लॅट+रिसॉर्ट भाड्याने पाहिजे. N.A.plot + शेतजमिन खरेदी व विक्री करुन मिळेल. शेतकरी करतो. ८६६९००६९०२ साइना कॉम्प्लेक्स opp.चर्च बायपास रोड.
- **अलिबाग येथील ऑफिससाठी स्टाफ पाहिजे!** ऑफिसमध्ये काम करण्यासाठी कर्मचारी आवश्यक. आकर्षक पगार मुलाखतीसाठी संपर्क साधा! ९९२३७५०५४९, ९१०५७१७०३८
- **नागाव येथे रिसोर्टमध्ये हाऊस किपिंग** या कामासाठी मुले पाहिजे आहेत आणि ऑल राऊंडर शेफ पाहिजे आहे. (मोबा. नं. ९३७१७१४५५२)
- **चेंढरे येथे सोसायटी/कनव्हेंस डिड** झालेल्या नवीन इमारतीमधील तीन २ बीएचके रेडी पझेशन फ्लॅट विकणे आहेत. संपर्क : ८१८०८६१२३४/८१८०८५१२३४ एजंट क्षमस्व.
- **अलिबागपासून जवळच असलेल्या फार्महाऊसमध्ये** वाडीत काम करणारे जोडपे हवे आहे. राहण्याची सोय आहे. संपर्क क्रमांक ९८२२९३८४४४
- **ऑफिस कामासाठी मुलगी हवी आहे.** मो. ७४९८५५५७४०, ९३७३७५८८५०
- **अलिबागमधील आर्किटेक्चर आणि इंटिरियर डिझायनिंग** ऑफिसकरीता ऑटो कॅड ड्राफ्टसमन हवा आहे. संपर्क : ९७६२७७७९७५
- **प्लम्बिंग कामासाठी हेल्पर पाहिजेत.** वेळ ९ ते ७, पगार १०,०००/- संपर्क ९८२२००१८५३
- **कर्मचारी भरती बर्गर्स अँड बूच,** रांजणपाडा नवीन उमेदवारांचे स्वागत! हॉटेल व्यवसायात करिअर करण्याची उत्तम संधी. सुरुवातीचा पगार ₹१६,०००, ३ महिन्यांच्या प्रशिक्षणानंतर ₹१८,०००. सर्व्हिस चार्जमधून अतिरिक्त उत्पन्न. ९ तासांची शिफ्ट. दर मंगळवारी सुट्टी. जेवण व राहण्याची सोय उपलब्ध. संपर्क/व्हॉट्सॲप : ७५०६९५४६११
- **अलिबाग एसटी स्टँडजवळ दुकानगाळा** विक्री करणे आहे. ९७६४५४८६७९
- **दिशा पॅथॉलॉजी लॅब, अलिबाग,** महिला कर्मचारी पाहिजेत. रक्ताचे नमुने (Sample) पिकअप व ड्रॉप करण्यासाठी अट: स्वत:चे वाहन असणे आवश्यक. संपर्क: ८५५२८५५२८८

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या नोटीसद्वारे कळविण्यात येते की, मौजे-सहाण, ता. अलिबाग, जि.रायगड खालील नमुद वर्णनाची शेतजमिन मिळकत श्री. पंढरी उदय पाटील, रा. मु.सहाण, पो. बामणगांव, ता, अलिबाग, जि. रायगड यांच्या मालकीची असून सदरील शेतजमिन मिळकत सदर मिळकतीच्या विद्यमान मालकांकडून माझे अशिलांनी कायमस्वरूपी खरेदी करण्याचे मान्य व कबुल केले आहे. सदर जमिन मिळकत पूर्णतः निर्वेध व बिनजोखमी असल्याबाबतचा हवाला सदर मिळकतीच्या विद्यमान मालकांनी माझे अशिलांस दिला आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भूमापन क्रमांक व उपविभाग | एकूण क्षेत्र (हे.आर.) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|---|
| सहाण, ता.अलिबाग | २६७ | क्षेत्र ०-४२-०० पो.ख. ०-०५-५० एकूण क्षेत्र ०-४७-५० | ९.१५ |

**सदर वर नमुद मिळकतीमधील खाते क्र. ८८७ मधील विद्यमान मालक श्री. पंढरी उदय पाटील यांचे मालकीचे एकूण क्षेत्र ०-१२-०० हे. आर. आकार २.६१ रु.पै. ही मिळकत या जाहीर नोटीसचा विषय आहे.**

वर नमुद मिळकतीबाबत अन्य कुणाचाही कसलाही हक्क, हितसंबंध, बोजा, अथवा गहाणखत, दान, लीज, पोटगी, हवाला, साठेकरार, खरेदी, मेन्टेनन्स, मेहेर, कर्ज वगैरे बाबत हरकत असल्यास अशा व्यक्तींनी ही सूचना प्रसिद्ध झाल्या दिनांकापासून चौदा (१४) दिवसांचे अवधीत माझ्याकडे लेखी पुराव्यानिशी देऊन माझी खात्री पटवून द्यावी. विहित मुदतीत अशी कोणतीही लेखी हरकत न आल्यास माझे अशिल त्यांचा सदर मिळकतीचा खरेदी व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत माझे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही, याची कृपया सर्वांनी नोंद घ्यावी.

अलिबाग
दिनांक : १५/१०/२०२६

सही /-
**ॲड. प्रविण कृष्णा झेंडेकर**
मु. शिंत्रेगल्ली, पो. आक्षी,
ता.अलिबाग, जि.रायगड
खरेदीदाराचे वकील
मो.९०११३६२८६७

## ग्रुप ग्रामपंचायत वडगांव
**कार्यालय : मु. वाशीवली, पो. पाताळगंगा, ता. खालापूर, जि. रायगड**
**स्थापना २१-०१-१९५६**
**माझी वसुंधरा ५.० राज्यस्तरीय पुरस्कार विजेती ग्रामपंचायत**

### ई-निविदा सुचना

दिनांक : १५/१०/२०२६

ग्रुप ग्रामपंचायत वडगांव ग्रामनिधी सन २०२६/२७ अंतर्गत ग्रुप ग्रामपंचायत वडगांव हद्दीतील मौजे वडगांव येथे अंतर्गत रस्ते दुरूस्ती करणे कामी महाराष्ट्र शासनाच्या http//www.mahatenders.gov.in या वेबसाईटवर दिनांक १५/१०/२०२६ रोजी ई-निविदा सुचना प्रसिद्ध केलेल्या आहेत. तरी इच्छुक ठेकेदारांनी/पुरवठादारांनी सदर निविदांच्या तपशीलासाठी व अटी शर्ती साठी सदर वेबसाईटवर प्रसिद्ध केलेल्या निविदा सुचना/जाहिराती पहाव्यात व विहित मुदतीत आपल्या निविदा सादर कराव्यात.

**श्री. सुहास विष्णू**
वारे ग्रामपंचायत अधिकारी
ग्रुप ग्रामपंचायत वडगांव

**श्री.विनोद गुणाजी चांदोरकर**
प्रशासक
ग्रुप ग्रामपंचायत वडगांव

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की आमचे अशिलांनी खाली नमुद केलेल्या मिळकतीचे विद्यमान मालक, श्री. राजेन्द्र दत्ताराम म्हात्रे, श्री. प्रदीप दत्ताराम म्हात्रे, यांचे बरोबर खाली वर्णन केलेल्या मिळकतीतील एकुण क्षेत्रापैकी ९ मीटर रूंदी व ३५ मीटर लांबी असे साधारण ०-०३-५० हे. आर इतके क्षेत्राचा वहिवाट रस्ताचा करारनामा आमचे अशिलांबरोबर करण्याचे ठरविलेले आहे. त्या संदर्भात आमचे अशिल व विद्यमान मालक यांज मध्ये खाली नमूद केलेली मिळकती बाबत बोलणी चालू आहेत. त्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे:

**मिळकतीचे वर्णन**

| अनु.क्र. | गाव | गट नं. | क्षेत्र (हे. आर.) | आकार रु. पै. |
|---|---|---|---|---|
| १ | पेझारी | १८/४ | ०-२७-३० पो.ख. ०-०२-३० ०-२९-६० | ४.३१ |

वर वर्णन केलेल्या मिळकतीतील एकुण क्षेत्रापैकी ९ मीटर रूंदी व ३५ मीटर लांबी असे साधारण ०-०३-५० हे. आर इतके क्षेत्र हे या वहिवाट रस्त्याच्या करारनाम्याचा विषय आहे.

तरी सदर मिळकतीच्या विकसित करण्याचे व्यवहारास कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत असल्यास संबंधित लेखी कागदपत्रांच्या पुराव्यासह आपली लेखी हरकत नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ (सात) दिवसांचे आत खालील पत्त्यावर नोंदवावी. सदर मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास सदर मिळकतीमध्ये कोणाचाही कसलाही हक्क नसल्याचे गृहीत धरुन सदरच्या मिळकतीचे बाबत पुढील कागदपत्राची पुर्तता पुर्ण करून विकसित करण्याचा व्यवहार पुर्ण केला जाईल. याची सर्वानी नोंद घ्यावी. तसेच मुदती नंतर येणाऱ्या हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही. यांची कृपया सर्वानी नोंद घ्यावी.

अलिबाग
ता.१५/१०/२०२६

सही/-
**ॲड. सौ. कांचन प्रशांत नार्वेकर**
मु. ॲकॉन क्लासिक, फ्लॅट नं. १०६,
जिल्हा न्यायालय रायगड समोर
अलिबाग, रायगड ४०२२०१
मो. ९८५०७५०८३४

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे सुचित करण्यात येते की, आमचे अशिल सौ. भारती अरविंद तायशेट्ये, श्री. अमित कृष्णा पांढलोसकर आणि श्री. नितीन रविंद्र राजशिर्के यांनी खालील वर्णन केलेली बिनशेती मिळकत तीचे विद्यमान मालक श्री. दशरथ तुकाराम साबळे आणि श्री. प्रविण दशरथ साबळे यांचे कडून विकत घेण्याचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन मौजे. बोपेले, ता. कर्जत, जि. रायगड.**

| सर्व्हे नं. | प्लॉट नं. | क्षेत्र चौ. मी. | आकार रू. पै. |
|---|---|---|---|
| २२ | ८/अ/३ | ३३२-०० | ३३-२० |

तरी वर वर्णन केलेल्या मिळकतीबाबत इतर दुसरे कोणाचा साठेकरार, खरेदीखत, ताबा कब्जा, वहीवाट, गहाण, दान, बक्षीसपत्र, लिज, वगैरे अथवा अन्य इतर कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास हि जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून सात दिवसांचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांजकडे प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह लेखी हरकत कळवावी. मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकत ही निर्वेध आहे असे गृहीत धरून आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून येणारी हरकत आमचे अशिलावर बंधनकारक राहणार नाही.

कळावे
दि. १६/१०/२०२६.

**ॲड. शिवाजी किसन टोकरे**
पत्ता- शॉप नं. ९, समर्थ कृपा
हौसिंग सोसायटी नेरळ, महेश
टॉकीज जवळ, नेरळ ता, कर्जत,
जि. रायगड पिनकोड नं. ४१०१०१
फोन नं. ७३५०१९४२००

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविणेत येते की, खालील वर्णन केलेली निवासी सदनिका त्या सदनिकेचे विद्यमान मालक श्री. संदेश विनायक कोळगांवकर यांच्या मालकीची आहे. निवासी सदनिकेचे वर्णन मौजे चेंढरे, ता.अलिबाग, जि. रायगड अलिबाग नगरपरिषद हद्दीतील सर्व्हे नं. १०६ हिस्सा नं. १ अ, भुखंड नं. २३, २४ व २५ या मिळकतीमधील हरी तारा सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित चेंढरे अलिबाग या सोसायटीमधील सी बिल्डींग, बी विंग, रेज्ड तळ मजल्यावरील निवासी सदनिका क्र. १०१, अलिबाग नगरपरिषद मालमत्ता क्र ALB००००५०९९ ही निवासी सदनिका श्री. संदेश विनायक कोळगांवकर यांचा मालकीची आहे. सदर निवासी सदनिका विद्यमान मालक यांच्याकडुन कायम विकत घेण्याबाबत माझ्या अशिलाने ठरविले आहे, तसा ठराव झालेला आहे.

सदर वर वर्णन केलेली निवासी सदनिका निर्वेध, बोजा रहीत असल्याची व संबंधीत त्या मालकांला ती निवासी सदनिका आमचे अशिलास कायम विकण्याचा पुर्ण हक्क व अधिकार असल्याची हमी सदर मिळकतींचे विद्यमान मालकाने आमचे अशिलांस दिलेली आहे. तथापी सदर मिळकतीत अन्य कुणाचाही गहाण, दान, बक्षीस, फरोक्त, साठेकरार, मृत्युपत्रांकित अन्नवस्त्र, जप्ती, लिज, जामिनकी, कुळहक्क, कब्जा, वारसाहक्क, मालकी, एम. ओ. यु. करार ताबे कब्जा वहीवाटी वगैरे संबंधी कसल्याही प्रकारचे हक्क अगर हितसंबंध अगर तक्रार/हरकती असल्यास त्यांनी त्यांची हरकत हि नोटीस प्रसिद्ध झालेपासून ७ दिवसांचे आत लेखी स्वरूपात कागदोपत्री पुराव्यासह खाली सही करणार यांचेकडे सादर कराव्यात. तशी लेखी हरकत वा तक्रार दिलेल्या मुदतीत आली नाही. तर सदर मिळकतीवर विद्यमान मालकाशिवाय अन्य कोणाचाही कसलाही हक्क, हितसंबंध अधिकार नाही. वा असल्यास तो त्यांनी स्वेच्छेने सोडुन दिला आहे असे समजुन, गुहीत धरून सदरचा विक्री व्यवहार रजिस्टर फरोक्तखत करून पूर्ण केला जाईल व या मुदतीनंतर आलेल्या हरकती व तक्रारी आमचे अशिलांवर बंधनकारक रहाणार नाहीत याची सर्वानी नोंद घ्यावी.

अलिबाग,
ता. १५/१०/२०२६

सही/-
**श्री. गणेश कृष्णा पाटील**
ॲडव्होकेट
''शिवम को. ऑप. हौ.सो.
तळ मजला, शॉप नं. ३, ब्राम्हण आळी,
ता. अलिबाग जि. रायगड.

## महावितरण — जाहीर आवाहन

महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित

म.रा.वि.वि.कं.मर्यादित, पेण मंडळ अंतर्गत शिकाऊ उमेदवार सन २०२६-२७ यासाठी प्रशिक्षणार्थी भरती करण्यात येणार आहे. यासाठी दहावी उत्तीर्ण व विजतंत्री / तारतंत्री या व्यवसायात औद्योगिक प्रशिक्षण(ITI) उत्तीर्ण झालेल्या पात्र उमेदवारांनी दि. १५.१०.२०२६ ते ३०.१०.२०२६ पर्यंत www.apprenticeshipindia.org या संकेतस्थळावरील आस्थापना क्र. E०२१७२७००१८१ वर ऑनलाईन अर्ज सादर करावेत व दिनांक ३०.१०.२०२६ नंतर प्राप्त झालेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही.

१) **शैक्षणिक पात्रता -** १० वी उत्तीर्ण व मान्यता प्राप्त औद्योगिक प्रशिक्षण संस्थेची दोन वर्षाचा वीजतंत्री / तारतंत्री परिक्षा मागिल तीन शैक्षणिक (२३-२४, २४-२५ व २५-२६) वर्षात उत्तीर्ण झालेले असावे.
२) **प्रशिक्षण कालावधी -** १ वर्ष
३) सदर भरती प्रक्रिया रायगड जिल्हयातील उमेदवारांना प्रथम प्राधान्य दिले जाईल.
४) **कामाचे ठिकाण -** पेण मंडळांतर्गत येणाऱ्या अलिबाग,रोहा,गोरेगाव, पनवेल (ग्रा) विभागातील उपविभागीय व शाखा कार्यालय.
५) **वयोमर्यादा -** दि. ३०.१०.२०२६ पर्यंत वय वर्षे १८ ते ३२ (मागासवर्गीयांसाठी ५ वर्षे शिथिल).
६) म.रा.वि.वि.कं.मर्या. कंपनीच्या नियमाप्रमाणे विद्यावेतन अदा करण्यात येईल.
७) यापुर्वी प्रशिक्षणार्थी म्हणून कोणत्याही दुसऱ्या आस्थापनेत प्रशिक्षण घेतले नाही किंवा तदसंबंधी करार केला नाही असेच उमेदवार पात्र असतील.
८) प्रशिक्षणार्थी भरती प्रक्रियेत ऑनलाईन अर्ज सादर केलेल्या उमेदवारांनी सर्व कागदपत्रे (शैक्षणिक प्रमाणपत्र, आयटीआय गुणपत्रक व प्रमाणपत्र, जातीचा दाखला, आधारकार्ड, Apprentice Portal वर ऑनलाईन रजिस्टर करुन म.रा.वि.वि.कं. मर्या, पेण मंडळ कार्यालयाच्या आस्थपना क्र. E०२१७२७००१८१ वर Apply केल्याची प्रत इ.) व त्यांच्या साक्षांकीत प्रती घेऊन दि. ३०.१०.२०२६ रोजी **म.रा.वि.वि.कं. मर्यादित, पेण मंडळ कार्यालय, अंतोरा रोड, पेण येथे सकाळी ११ ते ०५** दरम्यान उपस्थित रहावे.
९) प्रशिक्षणार्थी उमेदवारांची निवड झाल्यानंतर काही कारणास्तव ॲप्रेंटीस बोर्ड, मुंबई यांचेकडून उमेदवारंची नोंदणी नाकारल्यास उमेदवारांची शिकाऊ उमेदवारी आपो आप रद्द होईल याची नोंद घ्यावी.
१०) प्रशिक्षणार्थी उमेदवार भरती प्रक्रियेत आवश्यकता भासल्यास बदल करण्याचे सर्व अधिकार निम्नस्वाक्षरीकार यांना राहतील.

**PRO NO - 110** **अधीक्षक अभियंता, म.रा.वि.वि.कं.मर्या, पेण मंडळ, पेण**

## पनवेल महानगरपालिका, पनवेल

जा.क्र. पमपा/सचिव/२०-२६/प्र.क्र.१२/३५८/२६
महापालिका सचिव कार्यालय,
दिनांक :- १५/१०/२०२६

पनवेल महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेची सूचना
प्रति,
श्री./श्रीमती. ____________________
मा.सदस्य/सदस्या,
पनवेल महानगरपालिका, पनवेल.
महोदय/महोदया,

पनवेल महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा क्र. १२, शुक्रवार दिनांक २३/१०/२०२६ रोजी, सकाळी ११:३० वाजता, महापालिकेच्या ''आद्य क्रांतीवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृह, पनवेल येथे खालील विषयांवर विचार विनिमय करण्यासाठी बोलविण्यात आली आहे.

**सर्वसाधारण सभा क्रमांक १२. दिनांक २३/१०/२०२६ ची विषयपत्रिका**

१. मागील सर्वसाधारण सभा क्र. १० दिनांक ०६/१०/२०२६ रोजीच्या सभेचे इतिवृत्त कायम करणे.
२. शासकीय पत्रव्यवहार
३. प्रश्नोत्तरे
४. मा. आयुक्त महोदयांकडील कार्यालयीन कामकाज :

१. दिनांक २२/०७/२०२६ रोजीचा स्थगित विषय - पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील कामोठे येथील ८५ द.ल.लि. क्षमतेच्या मलशुध्दीकरण केंद्रातील कार्यान्वित असलेल्या ब्लोअरऐवजी अत्याधुनिक तंत्रज्ञानावर आधारित ॲक्टिव्ह मॅग्रेटिव्ह बेअरिंग व इंटिग्रेटेड आयआयओटी सिस्टमसह असलेले ब्लोअर्स पीपीपी/रेस्को डीम्ड सेव्हिंग शेअरिंग तत्वावर बदलणे या कामाचा अहवाल, अंदाजपत्रक व निविदा सादर करणेकामी स्वारस्य अभिव्यक्ती (EOI) इत्यादी बाबी निश्चित करण्यासाठी MAHAPREIT या शासकीय संस्थेस मान्यता देणेबाबत.
२. दिनांक ०६/१०/२०२६ रोजीचा स्थगित विषय - पनवेल महानगरपालिका हद्दीमधील प्रभाग समिती अ,ब,क व ड मध्ये अतिक्रमण/अनधिकृत बांधकाम निष्कासन करणेकामी मनुष्यबळ, यंत्रसामुग्री व वाहने पुरविणेकामी निविदा मागविणेबाबत.
३. पनवेल महानगरपालिका क्षेत्रात सिडकोने विकसीत केलेल्या खारघर नोडमधील मलनि:स्सारण वाहिन्यांची दोन वर्ष कालावधीकरीता आवश्यकतेप्रमाणे दुरुस्ती, सुधारणा व नुतनीकरण करणे या कामाच्या प्रस्तावास व खर्चास प्रशासकीय व आर्थिक मान्यता मिळणेबाबत.
४. पनवेल महानगरपालिका प्रभाग समिती 'क'क्षेत्रातील कामोठे येथील सेक्टर - ५ चिल्ड्रन गार्डन, सेक्टर - ०६ स्वातंत्र्यवीर सावरकर गार्डर व सेक्टर - २२ श्री. छत्रपती शिवाजी महाराज उद्यान या ठिकाणच्या उद्यानामध्ये डेकोरेटिव्ह पथदिप खांब उभारुन कार्यान्वित करणे.
५. पनवेल महानगरपालिका हद्दीतील भुखंड क्र. १७, सेक्टर - ३६, खारघर येथील आरोग्य केंद्राच्या इमारतीमधील पहिल्या व दुसऱ्या मजल्यावर उभारणेत आलेल्या डायलेसिस सेंटरमध्ये आवश्यक विद्युत उपकरणांचा पुरवठा करुन, विद्युत जोडणी व सलग्न विद्युत विषयक कामे करणे.
६. पनवेल महानगरपालिका हद्दीतील प्रभाग क्र.०९ मधील प्लॉट क्र. G-१ सेक्टर - ०७ नवीन पनवेल (पुर्व) येथील आरोग्य केंद्राच्या पहिल्या व दुसऱ्या मजल्यावर उभारणेत आलेल्या डायलेसिस सेंटरमध्ये आवश्यक विद्युत उपकरणांचा पुरवठा करुन, विद्युत जोडणी व सलग्न विद्युत विषयक कामे करणे.
७.पनवेल महानगरपालिका कार्यालयातील अधिकारी व पदाधिकारी तसेच विभागांच्या आवश्यक मागणीप्रमाणे सनबोर्ड, विनिल बोर्ड व ॲक्रालिक बोर्ड पुरविणेकामी निविदा प्रक्रिया राबवून दर निश्चित करणेबाबत.
८.सन २०२६-२०२७, २०२७-२०२८ व सन २०२८-२०२९ या ३ वर्षाकरिता पनवेल महानगरपालिका हद्दीतील विविध उद्यानांतील लॉनची कापणी करणेकामी लॉन मोवर, ग्रास व वुड कटर इ. साहित्यांचे दर निश्चित करणेबाबत.
९. हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे नागरी लोककल्याण अभियान अंतर्गत मुलभुत सोई सुविधांचा विकास करण्याच्या कामासाठी पनवेल महानगरपालिका क्षेत्रात राबविणेत येणाऱ्या उपक्रमाच्या कामास मान्यता मिळणेबाबत.
१०. हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे नागरी लोककल्याण अभियानांतर्गत पनवेल महानगरपालिका शिक्षण विभागामार्फत मराठी शाळांची दर्जोन्नती व शैक्षणिक गुणवत्ता सुधारणा करण्यासाठी प्रस्तावित १२ कामांच्या आर्थिक व प्रशासकीय मान्यतेबाबत.
११. हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे नागरी लोककल्याण अभियानांतर्गत पनवेल महानगरपालिका शिक्षण विभागामार्फत मराठी शाळांची दर्जोन्नती व शैक्षणिक गुणवत्ता सुधारणा करण्यासाठी प्रस्तावित ०७ कामांच्या आर्थिक व प्रशासकीय मान्यतेबाबत.
१२. पनवेल महानगरपालिका हद्दीतील प्रभाग समिती 'ड', प्रभाग क्र. १४ मधील अं. भु. क्र. ५०८ (पार्ट), ५२० (पार्ट) ठिकाणी खेळाचे मैदान विकसित करणे.
१३. पनवेल महानगरपालिका हद्दीतील प्रभाग समिती अ, खारघर येथील रस्त्यांवर महापालिका मालकीच्या मोकळ्या भुखंडावर वार्षिक तत्वावर माहिती दर्शक फलक बसविणे व रोड मार्किंग करणे. (२ वर्षाकरिता, सन २०२६-२७ व २०२७ -२८ करिता)
१४. पनवेल महानगरपालिका हद्दीतील प्रभाग समिती ब, कळंबोली येथील रस्त्यांवर महापालिका मालकीच्या मोकळ्या भुखंडावर वार्षिक तत्वावर माहिती दर्शक फलक बसविणे व रोड मार्किंग करणे. (२ वर्षाकरिता, सन २०२६-२७ व २०२७-२८ करिता)
१५. पनवेल महानगरपालिकेतील कर्मचाऱ्यांना दिपावलीसाठी सन २०२५- २६ चे सानुग्रह
अनुदान/प्रोत्साहन भत्ता मंजूर करणेबाबत.
(मा.महापौर महोदय यांचे मंजुरीने व आदेशान्वये )

नानासाहेब कामठे
महापालिका सचिव
पनवेल महानगरपालिका

महापालिका भवन, पनवेल
दिनांक :- १५/१०/२०२६.
सोबत - विषयांचे गोषवारे व सर्वसाधारण सभा क्र. १० दि.०६/१०/२०२६ रोजीच्या सभेचे इतिवृत्त.

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, मौजे येलवणे, ता. अलिबाग येथील सर्वे नं. १९/५, एकूण क्षेत्र ०-२८-२०, आकार ०.२६ रू.पैसे., या मिळकतीपैकी नलिनी राहूल धोत्रे, रोहित गोविंद धोत्रे, गोरक्ष राहूल धोत्रे अ.पा.क आई नलिनी राहूल धोत्रे, सुचिता महेश घारे यांच्या अविभक्त हिश्याची ही मिळकत. (तदनंतर सदर जाहिर नोटीसीत 'सदर मिळकत'असा उल्लेख केला आहे.) आमच्या अशिलांनी कायमस्वरूपी खरेदीखताने विकत घेण्याची ठरविलेली आहे. सदरहू मिळकत निर्वेध असल्याचा भरवसा मिळकतीचे विद्यमान मालक यांनी आमचे अशिल यांस दिला आहे. याउपरही सदरहू मिळकतीत कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, साठेकरार, कब्जा, बोजा, वहिवाटीचे हक्क, वारसाहक्क व हितसंबंध वा दुरान्वये देखील संबंध असल्यास अशा व्यक्तींनी आपल्या हरकती लेखी स्वरूपात कागदोपत्री पुराव्यासह खाली सही करणार खरेदीदार यांचे वकिल यांजकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांच्या मुदतीत सादर कराव्यात. मुदतीत कुणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत न आल्यास मिळकत निर्वेध आहे, असे समजून आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणाचीही, कसलीही हरकत विचारात घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

अलिबाग,
तारीख : १५/१०/२०२६

**(ॲड. संजय द. म्हात्रे)**
पत्ता - श्रुती सारंग को. ऑप. हौ. सो., ए विंग,
रूम नं. ५, युनियन बँकेच्या समोर, ब्राम्हण आळी,
अलिबाग, ता. अलिबाग जि. रायगड.

## NOTICE OF INQUIRY (FORM No. 2)

(नमुना क्र. २)
सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था नोंदणी कार्यालय रायगड, विभाग रायगड
(चौकशी नोटीस)

जा.क्र.न्यायशाखा/१४४६/२६
सहाय्यक धर्मादाय आयुक्त
रायगड विभाग अलिबाग यांचे कार्यालय
मालमत्ता क्रमांक ६२५, मारूती मंदिराजवळ
मु.पो.ता. अलिबाग, जि. रायगड
दि. १६/१०/२६

(सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम सन १९५० चे कलम २२)
चौकशी अर्ज क्र. ५५९/२०२६

सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम श्री. मुथ्थपन सेवा समिती कळंबोली
न्यास नोंदणी क्र. एफ-१२५६६/रायगड
श्री. Mr. Shanil Babu A.V. ... अर्जदार
रा. Flat No. 502, Krishna Leela CHS. LTD.
Plot No. 19 Sector-10
Kalamboli Tal- Panvel, Dist-Raigad
कलम २२ अन्वये केलेला अर्ज
कलम २२ अन्वये भरलेला नमुना यांच्या संबंधात
श्री. Mr. Rajan Nambiar
रा. FLat No. 3 sector- 8 E
Kalmboli Navi Mumbai ... गैर अर्जदार
Panvel Dist- Raigad-

ज्याअर्थी खाली सही करणार यांजकडून वरील सार्वजनिक विश्वस्त व्यवस्थे संबंधात कलम २२ अन्वये दाखल केलेला अर्ज

त्याअर्थी तुम्हास ही नोटीस देण्यात येते आहे आणि फर्मविण्यात येत आहे की, तुम्ही जातीने किंवा मान्यता दिलेल्या प्रतिनिधी मार्फत किंवा योग्य रितीने सूचना दिलेल्या वकीला मार्फत खाली सही करणार यांचे समोर व दिलेल्या पत्तावर तारीख ०८/०९/२०२६ रोजी सकाळी १२.०० वाजता वरील बाबींचा अखेरचा निकाल करणेसाठी ठरविलेल्या सुनावणीस हजर राहावे आणि चौकशी संबंधीच्या सर्व महत्वाच्या प्रश्नांची उत्तरे द्यावीत आणि त्या संबंधीचा तोंडी व दस्तऐवजाचा रूपातील सर्व पुरावा सादर करावा.

वर निर्दिष्ट केलेल्या जागी व वेळी हजर राहण्यास तुम्ही कसूर केल्यास तुमच्या गैरहजेरीत सदरहू चौकशी होईल तिचे कामकाज चालविण्यात येईल आणि तिचा निकाल करण्यात येईल अशी तुम्हास नोटीस देण्यात येत आहे.

आज दिनांक : ५/८/२०२६ रोजी माझ्या सहीनिशी व सहाय्यक धर्मादाय आयुक्तांच्या शिक्यानिशी दिली.

सही/-
**अधिक्षक**
**सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,**
**रायगड विभाग रायगड**

## NOTICE OF INQUIRY (FORM No. 2)

(नमुना क्र. २)
सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था नोंदणी कार्यालय रायगड, विभाग रायगड
(चौकशी नोटीस)

जा.क्र.न्यायशाखा/१४४५/२६
सहाय्यक धर्मादाय आयुक्त
रायगड विभाग अलिबाग यांचे कार्यालय
मालमत्ता क्रमांक ६२५, मारूती मंदिराजवळ
मु.पो.ता. अलिबाग, जि. रायगड
दि. १६/१०/२६

(सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम सन १९५० चे कलम २२)
चौकशी अर्ज क्र. ५६२/२०२५

सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम श्री. मुथ्थपन सेवा समिती कळंबोली
न्यास नोंदणी क्र. एफ-१२५६६/रायगड
श्री. Mr. Shanil Babu A.V. ... अर्जदार
रा. Flat No. 502, Krishna Leela CHS. LTD.
Plot No. 18 Sector-10
Kalamboli Tal- Panvel, Dist-Raigad
कलम २२ अन्वये केलेला अर्ज
कलम २२ अन्वये भरलेला नमुना यांच्या संबंधात
श्री. Mr. Sadandan m.c
रा. KL 514/2 sector- 3 E
Kalmboli Navi Mumbai ... गैर अर्जदार
Panvel Dist- Raigad-410218

ज्याअर्थी खाली सही करणार यांजकडून वरील सार्वजनिक विश्वस्त व्यवस्थे संबंधात कलम २२ अन्वये दाखल केलेला अर्ज

त्याअर्थी तुम्हासही नोटीस देण्यात येते आहे आणि फर्मविण्यात येत आहे की, तुम्ही जातीने किंवा मान्यता दिलेल्या प्रतिनिधी मार्फत किंवा योग्य रितीने सूचना दिलेल्या वकीला मार्फत खाली सही करणार यांचे समोर व दिलेल्या पत्तावर तारीख ०८/०९/२०२६ रोजी सकाळी १२.०० वाजता वरील बाबींचा अखेरचा निकाल करणेसाठी ठरविलेल्या सुनावणीस हजर राहावे आणि चौकशी संबंधीच्या सर्व महत्वाच्या प्रश्नांची उत्तरे द्यावीत आणि त्या संबंधीचा तोंडी व दस्तऐवजाचा रूपातील सर्व पुरावा सादर करावा.

वर निर्दिष्ट केलेल्या जागी व वेळी हजर राहण्यास तुम्ही कसूर केल्यास तुमच्या गैरहजेरीत सदरहू चौकशी होईल तिचे कामकाज चालविण्यात येईल आणि तिचा निकाल करण्यात येईल अशी तुम्हास नोटीस देण्यात येत आहे.

आज दिनांक : ५/८/२०२६ रोजी माझ्या सहीनिशी व सहाय्यक धर्मादाय आयुक्तांच्या शिक्यानिशी दिली.

सही/-
**अधिक्षक**
**सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,**
**रायगड विभाग रायगड**

## जाहीर नोटीस

सर्व नागरीकांना या जाहीर नोटीसीद्वारे सुचित करण्यात येते की, आमचे अशिल यांनी खालील मिळकतीचे मालक सुखदेव कोंडीबा वनवे यांच्याकडून खालील वर्णन केलेली मिळकत कायम खरेदीखताने घेण्याचे ठरविले आहे. सदर मिळकतीचे वर्णन पुढील प्रमाणे

**मौजे कळंब ता. कर्जत जि.रायगड**

| सर्व्हे क्रमांक | क्षेत्रफळ (हेक्टर आर.चौ.मी.) | आकारणी (रु.पैसे) |
|---|---|---|
| ८०/१६ | ०.४४.०० | ०.४८ |
| ८२/९ | ०.३२.०० | ०.३४ |
| ८०/५ | ०.४१.०० | ०.२७ |
| ७७/५ | ०.५६.०० | ०.६१ |
| ७९/११ | ०.३१.४० | ०.९७ |
| ७८/१ | ०.९९.१० | ०.६१ |
| ७९/४ | ०.१३.१० | १.८९ |
| ७९/१० | ०.१९.२० | ०.२० |
| ८०/१५ | ०.३५.०० | ०.३९ |

तरी वर वर्णन केलेल्या मिळकतीबाबत इतर दुसरे कोणाचा साठेकरार, खरेदीखत, विकसनकरार, ताबा कब्जा, वहीवाट, गहाण, दान, लिज, वगैरे अथवा अन्य इतर कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास हि जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांजकडे प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह लेखी हरकत कळवावी. मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकत ही निर्वेध आहे असे गृहीत धरून आमचे अशिल व्यवहार पूर्ण करतील. मागाहून येणारी हरकत आमचे अशिलावर बंधनकारक राहणार नाही. कळावे

दि.१६/१०/२०२६

**ॲड. श्रीकृष्ण पालू डुकरे**
पत्ता-तुलसी सेंटर पॉइंट ऑफिस
नं.४२, पहिला मजला, नेरळ
ता. कर्जत, जि. रायगड
मो.९३२६२३९२५९

## दि.महाराष्ट्र स्टेट को ऑपरेटीव्ह मार्केटींग फेडरेशन लिमिटेड

कनमूर हाऊस, नरसी नाथा स्ट्रीट, पो.बॉ.नं.५०८०, मस्जीद बंदर-४०000९
Email ID- manager.statepro@gmail.com

### जाहीर ऑफर सुचना

विकेंद्रित धान खरेदी योजनेअंतर्गत, पणन हंगाम २०२४-२०२५ व २०२५-२०२६ मध्ये किमान आधारभूत किंमत धान खरेदी योजनेअंतर्गत रायगड जिल्ह्यात खरेदी करण्यात आलेल्या शिल्लक असलेल्या धानाची भरडाई करणेकरीता शासनाकडून लवकरच मुदतवाढ येणाची शक्यता आहे. तरी जिल्ह्यातील तसेच इतर जिल्ह्यातील इच्छुक मिलधारकांकडून सिलबंद लिफाफ्यामध्ये आगाऊ निविदा मागविण्यात येत आहेत. इच्छुक मिलधारकांनी फेडरेशनने प्रस्तावित केलेल्या निविदा ऑफर्स फार्ममध्ये सीएमआर तांदूळ तयार करण्याच्या ऑफर्स द्याव्यात. शासनाच्या निर्देशानुसार भरडाई करावयाच्या धाना संबंधितच्या अटी/शर्ती व कोरे ऑफर्स फॉर्म संबंधित जिल्हा मार्केटिंग अधिकारी यांच्याकडे कार्यालयीन वेळेत प्राप्त होतील. आगाऊ निविदा भरण्याचा कालावधी/कार्यक्रम खालीलप्रमाणे आहे.

अ)ऑफर्स विक्री कालावधी : दि.१६/१०/२०२६ ते २२/१०/२०२६ (कार्यालयीन वेळेत)
आ)ऑफर्स भरण्याची अंतिम तारीख : दि.२२/१०/२०२६ दुपारी २.००वाजेपर्यंत
इ) ऑफर्स उघडण्याची तारीख : दि.२२/१०/२०२६ दुपारी ३.०० वाजता

**जिल्हा मार्केटिंग अधिकारी**
**रायगड-अलिबाग**

पत्ता-
जिल्हा मार्केटिंग अधिकारी कार्यालय,
पत्ता-बाफना बाग बी, रो हाऊस नं.१४,
बिग फ्लॅश (कोकोनट आयव्ही) हॉटेलच्या मागे,
रेवस रोड, ता.अलिबाग, जि.रायगड
मोबाईल नं : ९१६८०५९९२५/८४०८८६६६१९

## ''जाहिर नोटीस''

तमाम जनतेस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, मौजे देवघर, तालुका अलिबाग, जिल्हा रायगड, येथील पुढील वर्णनाची मिळकत आहे, सदर मिळकतीचे विद्यमान मालक मोना पटेल यांचेकडुन आमचे आशिलांनी जमिन मिळकत खरेदी घेणेचे ठरविले आहे. त्याबाबत आमचे आशिलांनी त्याच्याबरोबर साठेकरार केला आहे.

**मिळकतीचे वर्णन :-**

| गाव | भुमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र (हे.आर) | आकार रू. पै. |
|---|---|---|---|
| मौजे.देवघर, ता.अलिबाग, जि.रायगड | ४०३ | क्षेत्र ०-२०-१० | - |

तरी वरील जमिन मिळकतीबद्दल कुणाचाही ताबा, बयाणापावती, साठेकरार, गहाण, बोजा अथवा लिज इतर कायदेशीर हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे आत खाली सही करणार यांचेकडे आपल्या हरकती पुराव्यासह लेखी स्वरूपात दाखल कराव्यात, सदर मुदतीत हरकती न आल्यास वरील मिळकत निर्वेध व बोजाविरहीत आहे, इतर कोणाचाही कायदेशीर हक्क व हितसंबंध नाहीत असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीचा खरेदी व्यवहार पूर्ण करतील. मुदतीनंतर उपस्थित केलेली कोणतीही हरकत, तक्रार माझे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची या नोटीसद्वारे नोंद घ्यावी.

अलिबाग
दि. १६/१०/२०२६

सही /-
**ॲड.सौ.गौरी गिरीश म्हात्रे**
डी-२ हिराबाग मोदकम हॉटेलच्या वर
जिल्हा न्यायालयासमोर अलिबाग-रायगड
मो नं. ९२७१७७५२७७

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, मौजे - तलवडे, ता. अलिबाग, जि. रायगड येथील गट नं. २९८, क्षेत्र ०-४८-६० हे. आर., पो. ख. ०-०३-०० हे. आर., एकूण क्षेत्र ०-५१-६० हे. आर., आकार ११.५२ रू. पै. पैकी क्षेत्र ०-१०-७५ हे. आर., ही भातशेती मिळकत, या मिळकतीचे विद्यमान मालक मनीषा रमावरन नायर रा. मु. तलवडे, पो. कामार्ले, ता. अलिबाग, जि. रायगड यांच्याकडुन आमच्या अशिलांनी सर्व हक्कांसह विकत घेण्याची ठरविलेली आहे. सदरहू मिळकत निर्वेध असल्याचा भरवसा मिळकतीचे विद्यमान मालक यांनी आमचे अशिल यांस दिला आहे. याउपरही सदरहू मिळकतीत कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, साठेकरार, कब्जा, बोजा, वहिवाटीचे हक्क, वारसाहक्क व हितसंबंध वा दुरान्वये देखील संबंध असल्यास अशा व्यक्तींनी आपल्या हरकती लेखी स्वरूपात कागदोपत्री पुराव्यासह खाली सही करणार खरेदीदार यांचे वकिल यांजकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांच्या मुदतीत सादर कराव्यात. मुदतीत कुणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत न आल्यास मिळकत निर्वेध आहे, असे समजून आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणाचीही, कसलीही हरकत विचारात घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

अलिबाग,
तारीख : १५/१०/२०२६

**(ॲड. संजय द. म्हात्रे)**
पत्ता-श्रुती सारंग को.ऑप.हौ.सो.,ए विंग,
रूम नं.५, युनियन बँकेच्या समोर, ब्राम्हण आळी,
अलिबाग, ता.अलिबाग जि.रायगड.

## वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी. - मुख्य संपादक

## ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन

१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग
दागिने-नविन डिझाइन्स



मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी-सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

**२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.**
मोबाईल : ९८६०६५८५६५

# आंबेवाडीतील शौचालयाचे तिनतेरा

## महिला-ज्येष्ठ नागरिकांना नाहक त्रास; साफसफाई कर्मचाऱ्याची नियुक्ती करण्याची मागणी

**। कोलाड । प्रतिनिधी ।**

रोहा तालुक्यातील मुंबई-गोवा महामार्गावरील असणाऱ्या आंबेवाडी नाक्यावरील शौचालयाच तिनेतेरा वाजले असुन शौचालयाची अस्वच्छता व पाण्याची कमतरता यामुळे गेली पंधरा दिवसापासून या शौचालयाला टाळे लावण्यात आले आहे. यामुळे स्थानिक विशेषता महिला, शाळा कॉलेजचे विद्यार्थी व ज्येष्ठ नागरिकांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे.




महामार्गावरील आंबेवाडी नाका हे मध्यस्ती ठिकाण असून येथे आजूबाजूच्या ६५ ते ७० वाडया, वस्त्या तसेच खेडेगावातील असंख्य नागरिक ये-जा करीत असतात. तसेच शाळा कॉलेज असल्यामुळे असंख्य शाळा कॉलेजचे विद्यार्थी ये-जा करीत असतात. परंतु यांना शौचालय व लघुशंखेसाठी एकमेव असणाऱ्या सुलभ शौचालयाची दुरावस्थामुळे या शौचालयाला गेली पंधरा दिवसापासून लॉक लावण्यात आल्यामुळे याचा नाहक त्रास विद्यार्थी, महिला वर्ग तसेच ज्येष्ठ नागरिक, स्थानिक तसेच प्रवाशी नागरिकांना सहन करावा लागत आहे.

एकीकडे स्वछतेकडून समृद्धीकडे अशा वल्गना केली जात असतांना आंबेवाडी नाक्यावरील शौचालयाची दुरावस्था पाहता अस्वच्छतेकडून अधोगतीकडे देश चालला असल्याचे दिसून येत आहे.

आंबेवाडी ग्रामपंचायत तसेच संबंधित प्रशासनाने याकडे लक्ष देऊन शौचालयाची नियमित साफसफाई करण्यासाठी कर्मचाऱ्याची नियुक्ती करणे आवश्यक आहे. शौचालयाच्या ठिकाणी अखंडित विजपुरवठा व पाण्याची व्यवस्था करणे गरजेचे आहे अन्यथा शौचालयाच्या दुर्गंधीमुळे रोगराई पसरण्याची भीती नागरिकांमधून व्यक्त करण्यात येत आहे.

> आंबेवाडी बाजारपेठेतील सुलभ शौचालयाचे पुन्हा एकदा तीनतेरा वाजले असून नेहमीच या शौचालयाचा प्रश्न गंभीर बनला आहे. अनेकवेळा याविषयी वृत्त पत्रामधून बातम्या प्रकाशित झाल्या आहेत. यानंतर थातुरमातुर काम करून शौचालय सुरु केले जाते. नंतर परिस्थिती जैसे थे अशीच होते. या महत्वाच्या समस्याचा कायमस्वरुपी बंदोबस्त करण्यात यावा.
> -विश्वास बागुल.
> सामाजिक कार्यकर्ते

## वेतनवाढीसाठी मुख्यमंत्र्यांना साकडे

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

महाराष्ट्र सुरक्षा रक्षक मंडळाअंतर्गत कार्यरत हजारो सुरक्षा रक्षकांच्या वेतनात वाढ करावी, तसेच महागाई भत्ता द्यावा अशी मागणी रायगड जिल्हा सरचिटणीस विनायक चंद्रकांत गांधी यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे. राज्यातील विविध शासकीय, निमशासकीय आणि औद्योगिक आस्थापनांमध्ये सुरक्षा रक्षक महत्त्वाची जबाबदारी पार पाडतात. वाढती महागाई, घरभाडे, वैद्यकीय खर्च आणि मुलांच्या शिक्षणाचा खर्च यामुळे त्यांच्या कुटुंबांवर आर्थिक ताण वाढत असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. सुरक्षा रक्षकांच्या कामाचे स्वरूप, जबाबदारी, जोखीम लक्षात घेऊन त्यांच्या वेतनात समाधानकारक वाढ करावी अशी मागणी गांधी यांनी केली आहे.

# निवडक



## गावरान ठाकरी मिरचीला मोठी मागणी

**सुधागड** : वातावरणातील बदल आणि पावसाची कमतरता यामुळे भाजीपाल्याचे उत्पादन घटल्याने पुणे व नवी मुंबईतून येणाऱ्या भाजीपाल्याच्या दरांमध्ये मोठी घसरण आणि चढउतार पाहायला मिळत आहे. मात्र, या महागड्या भाजीपाल्याला सुधागड तालुक्यासह रायगड जिल्ह्यातील आदिवासी बांधवांनी पिकवलेल्या सेंद्रिय गावरान भाज्यांचा एक स्वस्त, पौष्टिक आणि आरोग्यदायी पर्याय उपलब्ध झाला आहे. पारंपारिक पद्धतीने पिकवलेली 'ठाकरी मिरची'ला मोठी मागणी आहे. आदिवासी बांधव व स्थानिक शेतकरी डोंगर-उतारावर, रानमाळावर आणि घराच्या परसात कोणत्याही रासायनिक खतांचा किंवा किटकनाशकांचा वापर न करता या भाज्या पिकवतात आणि आदिवासी महिला बाजारात विक्रीसाठी घेऊन येतात. बाजारात सध्या शिराळे, घोसाळे, कारली, माठ, वांगी, भेंडी, काकडी, दुधी, गवार आणि ठाकरी मिरची मुबलक प्रमाणात दाखल झाली आहे. अवघ्या १५ ते २० रुपये जुडी, वाटा किंवा पाव किलो अशा परवडणाऱ्या दरात या भाज्या मिळत असल्याने ग्राहकांकडून मोठी मागणी होत आहे. 'ठाकरी मिरची'ची खास भुरळया सर्व गावरान भाज्यांमध्ये आदिवासी बांधवांनी पारंपारिक पद्धतीने पिकवलेली 'ठाकरी मिरची' विशेष आकर्षण ठरत आहे.



## माणगावात नेत्र तपासणी उत्साहात

**माणगाव** : माणगाव शहरात शंकरा आय हॉस्पिटल नवीन पनवेल व तालुक्यातील प्रसिद्ध उद्योजक विजयशेठ मेथा चॅरिटेबल ट्रस्ट माणगावतर्फे बुधवारी (दि.१४) ऑक्टोबर रोजी मोफत नेत्र तपासणी व मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिराचे आयोजन महेंद्र मेथा यांच्या जुने एसटी स्टॅन्डजवळ माणगाव याठिकाणी करण्यात आले होते. या शिबिरात शंकरा आय हॉस्पिटलचे नेत्ररोग तज्ज्ञ डॉ. प्रकाश पाटील व त्यांच्या सहकाऱ्यांनी नवीन ८० रुग्णांची तपासणी करून ५० नेत्ररुग्णांना पनवेल येथे नेऊन त्यांच्यावर मोफत यशस्वी शस्त्रक्रिया करण्यात आली आहे. सदर शिबीर यशस्वीरीत्या पार पाडण्यासाठी विजय मेथा, सुप्रिया शिंदे, तनुजा मेथा, छाया मेथा, विधिता मेथा, मनीष मेथा यांच्यासह शंकरा आय हॉस्पिटल नवीन पनवेलचे टीम व्यवस्थापक डॉ. प्रकाश पाटील, डॉ. मानसी शहा, प्रतिक्षा गावित, प्रतिक्षा माने, अवंतिका गंडाळे, सागर पाटील यांनी सहकार्य करीत विशेष परिश्रम घेतले. सदर शिबीर हे दर महिन्याला दुसऱ्या बुधवारी आयोजित करण्यात येत असल्याने या शिबिराचा गरजू नेत्र रुग्णांनी अवश्य घ्यावा असे आवाहन विजय मेथा व सहकारी यांनी केले आहे.

## जन्म-मृत्यू दाखल्यांची वणवण थांबणार

**पनवेल** : जन्म-मृत्यू दाखल्यांच्या मान्यतेसाठी नागरिकांना अलिबाग येथे पाठविण्याची प्रक्रिया थांबवून पनवेल महानगरपालिकेतच मान्यता देण्याची व्यवस्था सुरू करण्यासाठी महाविकास आघाडीच्या नगरसेविका आर्या जाधव यांनी केलेल्या मागणीला सकारात्मक प्रतिसाद मिळाल्याचे सांगण्यात येत आहे. त्यामुळे दाखल्यांसाठी होणारा विलंब कमी होऊन नागरिकांना दिलासा मिळण्याची शक्यता आहे. पनवेल नगरपरिषदेच्या काळातील जुन्या जन्मदाखल्यांवर इंग्रजीत नाव नसल्याने नागरिकांना विविध कामांसाठी अडचणींचा सामना करावा लागतो. तसेच काही दाखल्यांच्या मान्यतेसाठी संबंधित प्रकरणे अलिबाग येथील रायगड जिल्हा जन्म-मृत्यू विभागाकडे पाठवावी लागतात. या प्रक्रियेमुळे बराच कालावधी जात असून नागरिकांना मनस्ताप सहन करावा लागतो. या समस्येची दखल घेत नगरसेविका आर्या जाधव यांनी पनवेल महापालिका आयुक्तांकडे निवेदन देऊन जन्म-मृत्यू दाखल्यांच्या मान्यतेची प्रक्रिया महापालिकेतच सुरू करण्याची मागणी केली होती. नागरिकांची गैरसोय दूर करण्यासाठी महापालिकेत स्वतंत्र मान्यता विभाग सुरू करावा, अशीही त्यांची मागणी आहे. महापालिकेतच मान्यता मिळाल्यास नागरिकांची अलिबागला जाण्याची गरज कमी होणार असून, वेळ आणि खर्चाची बचत होण्यास मदत होईल.




# शिळोशीत लोकसहभागातून बांधला वनराई बंधारा

## 'पाणी अडवा, पाणी जिरवा'ला कृतीची जोड

**। पाली । प्रतिनिधी ।**

जलसंधारणाला चालना देण्यासाठी मौजे शिळोशी येथील आदिवासीवाडीतील ग्रामस्थांनी लोकसहभागातून वनराई बंधारा उभारला. मंगळवारी (दि.१३) ऑक्टोबर रोजी राबविण्यात आलेल्या या उपक्रमात ग्रामस्थांनी एकत्र येत पाणी अडविण्यासाठी योगदान दिले. गावपातळीवर सामूहिक प्रयत्नांतून जलसंधारणाचे काम उभे राहू शकते, याचे उदाहरण या उपक्रमातून समोर आले आहे.

पावसाळ्यानंतर वाहून जाणारे पाणी स्थानिक पातळीवर अडविणे आणि ते जमिनीत मुरण्यास मदत करणे, या दृष्टीने वनराई बंधारे उपयुक्त ठरतात. अशा बंधाऱ्यांमुळे पाण्याचा प्रवाह मंदावून परिसरातील ओलावा टिकविण्यास मदत होऊ शकते. या बंधाऱ्यामुळेही स्थानिक जलसंधारणाच्या प्रयत्नांना हातभार लागण्याची अपेक्षा आहे. शिळोशी आदिवासीवाडीतील या सामूहिक प्रयत्नातून पाणी अडवा, पाणी जिरवा या संकल्पनेला प्रत्यक्ष कृतीची जोड मिळाली आहे. लोकसहभागातून उभारलेला हा वनराई बंधारा गावातील एकजूट आणि जलसंधारणाप्रती असलेल्या जबाबदारीची जाणीव अधोरेखित करतो.

यावेळी सामाजिक वनीकरण विभागाचे सुहास रणवरे, महादेव वाघमारे, राजू पवार तसेच वाडीतील ग्रामस्थ उपस्थित होते. स्थानिक लोकप्रतिनिधी आणि ग्रामस्थांच्या सहभागामुळे बंधाऱ्यांचे काम पूर्ण करण्यात आले.





• अलिबाग पंचायत समितीचे महिला कर्मचारी वर्ग.

## अल्पवयीन मुलीच्या अपहरणाचा प्रयत्न

**। नवीन पनवेल । प्रतिनिधी ।**

साडेतीन वर्षीय मुलगी खेळत असताना तिला दहा रुपये देऊन तिचे अपहरण करण्याचा प्रयत्न केल्याप्रकरणी आरोपी विरोधात खांदेश्वर पोलीस ठाण्यात १४ ऑक्टोबर रोजी गुन्हा दाखल करण्यात आला. यातील साडेतीन वर्षीय कृतिका ही सनातन आश्रमा जवळ शिवनगर देवद येथे खेळत होती. यावेळी १३ ऑक्टोबर रोजी रात्री साडेदहाच्या सुमारास ती खेळत असताना आरोपीने तिला दहा रुपये दिले आणि तिचा अपहरण करण्याचा प्रयत्न केला. या प्रकरनी खांदेश्वर पोलीस अधिक तपास करत आहेत.

## ऑक्टोबर हिटमुळे नागरिक हैराण

**। खांदा कॉलनी । प्रतिनिधी ।**

पावसाळा संपताच ऑक्टोबर हिटचा तडाखा जाणवू लागला असून, वाढत्या उकाड्यामुळे पनवेलकर हैराण झाले आहेत. दिवसभर जाणवणारे कडक ऊन आणि अंगाची लाहीलाही करणाऱ्या उष्णतेमुळे नागरिकांना घामाच्या धारा लागल्या आहेत. या उकाड्यापासून काहीसा दिलासा मिळवण्यासाठी नागरिकांचा कल थंड पेयांकडे वाढला असून, शहरातील रसवंतीगृहांमध्ये उसाचा रस पिण्यासाठी गर्दी होत असल्याचे चित्र दिसत आहे. सकाळपासूनच उन्हाचा चटका जाणवू लागल्याने दुपारच्या वेळी रस्त्यांवरील वर्दळ काहीशी कमी होत आहे. कामानिमित्त घराबाहेर पडणारे नोकरदार, व्यावसायिक, विद्यार्थी तसेच रिक्षाचालकांना उकाड्याचा सामना करावा लागत आहे. घामामुळे शरीरातील पाण्याचे प्रमाण कमी होण्याची शक्यता असल्याने नागरिक थंड पेये आणि पाणी पिण्यास प्राधान्य देत आहेत. पनवेल, नवीन पनवेल आणि खांदा कॉलनी परिसरातील रसवंतीगृहांमध्ये उसाचा रस पिण्यासाठी नागरिक थांबत असल्याचे दिसून येते. उसाचा ताजा रस, त्यात लिंबू आणि आले घालून तयार केलेला रस अनेकांच्या पसंतीस उतरत आहे. उन्हातून चालत आल्यानंतर रसाचा ग्लास पिऊन थोडा वेळ सावलीत विसावा घेण्याकडे नागरिकांचा कल आहे.

# करंजाईत पाणी फाऊंडेशनचा स्तुत्य उपक्रम

**। पाली/गोमाशी । प्रतिनिधी ।**

उमेद अभियान आणि पाणी फाऊंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या 'फार्मर कप' स्पर्धेचा एक भाग म्हणून मंगळवारी (दि. १३) ऑक्टोबर रोजी चिखळगाव ग्रामपंचायत अंतर्गत येणाऱ्या करंजाई येथे वनराई बंधारा बांधण्याचा स्तुत्य उपक्रम यशस्वीपणे राबविण्यात आला. या श्रमदान उपक्रमामध्ये गावातील महिला आणि शासकीय अधिकाऱ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला.



या उपक्रमात सिद्धेश्वर सखी शेतकरी गट, कुलस्वामिनी गट, नेणावली येथील केसरी शेतकरी गट आणि चिखळगाव येथील करंजाई महिला शेतकरी गट व श्रीराम गट यांच्या माध्यमातून तब्बल ५० महिलांनी या वनराई बंधारा बांधकामात प्रत्यक्ष श्रमदान केले. या मोहिमेला गती देण्यासाठी उमेद अभियानाचे तालुका अभियान व्यवस्थापक अभिनय पाटील, प्रभाग समन्वयक अनुराधा गायकवाड, कैलास आघाव यांनी परिश्रम घेतले. तर पाणी फाऊंडेशनचे रघुनाथ जगताप, अभिजित पवार यांनी जलसंधारणाचे महत्त्व पटवून दिले. याप्रसंगी पंचायत समितीचे साहाय्यक गट विकास अधिकारी महादेव शिंदे, कृषी अधिकारी अशोक महामुनी, विस्तार अधिकारी संजय शेलवाड, विस्तार अधिकारी, विकास शिंदे आणि कृषी विस्तार अधिकारी मिलिंद देवकर प्रामुख्याने उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी चिखळगाव ग्रामपंचायतचे ग्रामसेवक हिरे, रुपेश महाडिक आणि सर्व कर्मचाऱ्यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

## पनवेलमध्ये कर्करोग तपासणी शिबिराचे आयोजन

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

महिलांमध्ये स्तन कर्करोगाबाबत जागरूकता निर्माण करणे आणि वेळेत निदानाचे महत्त्व पटवून देण्याच्या उद्देशाने पार्श्वा वुमेन्स फाऊंडेशनच्या वतीने पनवेल येथे मोफत स्तन कर्करोग तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या उपक्रमाला रोटरी क्लब ऑफ पनवेल इंडस्ट्रियल टाउन, इनर व्हील क्लब ऑफ न्यू पनवेल आणि पीसीसी कॅन्सर केअर अँड रिसर्च सेंटर यांचे सहकार्य लाभले. या उपक्रमास जयश्री पाटील, अ‍ॅड. हितेश राजपूत, अंजली तवटे, पल्लवी पाटील, डॉ. पुष्पक चिरमाडे, बसंती जैन, शीतल ठक्कर, धनश्री गुंडेचा, रीना परमार, नैना भंथिया, भूमिका परमार, नेहा गांधी, मनाली परमार, पूजा मारलेशा यांनी या उपक्रमासाठी सहकार्य केले.




## नवरात्र उत्सवात नृत्याचा अविष्कार

**। चिरनेर । प्रतिनिधी ।**

बोरखार जय भवानी नवरात्रौत्सव मंडळ आयोजित, साई इंटरप्रायजेसचे सुरज म्हात्रे, अतुल ठाकुर पुरस्कृत सोलो नृत्य स्पर्धा पार पडली. स्पर्धेतील मोठ्या गटात काव्या जठार प्रथम व प्रदीप गुप्तार्फे ७००० रुपये रोख व ट्रॉफी देण्यात आली. आर्या नारंगीकर द्वितीय ५००० रुपये व ट्रॉफी देण्यात आली. लालचंद तृतीय ३००० रुपये व ट्रॉफी देण्यात आली. अक्षय रसाळ, हर्षिता कदम यांना उत्तेजनार्थाचे बक्षीस देण्यात आले. लहान गटात दुर्वा झावरे प्रथम व ५००० रुपये व ट्रॉफी, मुग्धा उभारे द्वितीय ३००० रुपये व ट्रॉफी, सान्वी कोठावले तृतीय २००० रुपये व ट्रॉफी, साध्वी म्हात्रे, आर्वी पाटील, शास्वती म्हात्रे, दृष्टी ठाकुर यांना उत्तेजनार्थाचे बक्षीस देण्यात आले. विजेत्यांना शैलेश गावंड, तेजस डाकी, दीपक डाकी, शंकर ठाकुर, चंद्रकांत डाकी, मनोहर डाकी, पप्पु सूर्यराव, अमृत म्हात्रे राकेश तांडेल, दिनेश डाकी, समाधान म्हसकर, रोहण डाकी, सुशांत ठाकुर यांच्या हस्ते पारितोषिके देण्यात आली.




## पालीत धम्म मेळाव्याचे आयोजन

**। पाली/बेणसे । प्रतिनिधी ।**

सुधागड तालुका बौद्धजन पंचायत रजि.नं. (ए) २७५६ (मुंबई) या संस्थेच्या वतीने मंगळवार (दि.२०) ऑक्टोबर रोजी ७० व्या धम्मचक्र प्रवर्तन दिन व चक्रवर्ती सम्राट अशोक विजया दशमी दिनाचे औचित्य साधून भव्य धम्म मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. हा सोहळा डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक सभागृह पाली येथे सकाळी १०:०० वा होणार आहे. संस्थेच्या वतीने के. टी. गायकवाड, जी. जी. मोरे, चंद्रगुप्त भालेराव, नारायण जाधव, अशोक वाघमारे, राजेश गायकवाड, भिम महाडिक, वंदीप जाधव, आनंद जाधव, संतोष जाधव या धम्म मेळाव्यास शुद्धवस्त्र परिधान करून उपस्थित राहण्याचे आवाहन केले आहे.

**नवी मुंबई विमानतळाची मालवाहतुकीत भरारी** | **नऊ महिन्यांत ११,८५३ टन मालाची हाताळणी**

# हवाई वाहतूक व्यवस्थेची सज्जता

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाने व्यावसायिक कामकाजाच्या पहिल्या नऊ महिन्यांत मालवाहतुकीच्या क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी नोंदवली आहे. जानेवारी ते सप्टेंबर २०२६ या कालावधीत विमानतळावरून एकूण ११ हजार ८५३ मेट्रिक टन मालाची हाताळणी करण्यात आली. यामध्ये आंतरराष्ट्रीय मालवाहतुकीचा वाटा ५४.६ टक्के, तर देशांतर्गत मालवाहतुकीचा वाटा ४५.४ टक्के, आहे.




विमानतळावरील मालवाहतूक सेवांच्या वाढत्या क्षमतेचे चित्र ९ ऑक्टोबर रोजी स्पष्ट झाले. या दिवशी कॅथे कार्गो, चॅलेंज एअर, कतार एअरवेज, एअरलॉजिक, एएफकॉम, एमएनजी एअरलाइन्स, एएसएल एअरलाइन्स, ॲटलस एअर या आठ विमान कंपन्यांच्या समर्पित मालवाहू विमानांचे यशस्वी व्यवस्थापन करण्यात आले. एकाच दिवसात आठ मालवाहू विमानांची हाताळणी केल्याने टर्मिनलची कार्यक्षमता, विमानांच्या जलद आवागमनाची क्षमता आणि विमानतळावरील हवाई वाहतूक व्यवस्थेची सज्जता दिसून आली.

आंतरराष्ट्रीय मालवाहतुकीचा सर्वाधिक वाटाजानेवारी ते सप्टेंबर २०२६ या नऊ महिन्यांत विमानतळावर ६ हजार ४७७ मेट्रिक टन आंतरराष्ट्रीय मालाची हाताळणी झाली. यामध्ये ३ हजार ७४६ मेट्रिक टन आयात माल, तर २ हजार ७३१ मेट्रिक टन निर्यात मालाचा समावेश आहे. याच कालावधीत देशांतर्गत मालवाहतुकीचे प्रमाण ५ हजार ३७६ मेट्रिक टन इतके होते. त्यात १ हजार ५२८ मेट्रिक टन आयात आणि ३ हजार ८४८ मेट्रिक टन निर्यात मालाची नोंद झाली. एकूण मालवाहतुकीपैकी ६ हजार ५७९ मेट्रिक टन माल निर्यात स्वरूपाचा, तर ५ हजार २७४ मेट्रिक टन माल आयात स्वरूपाचा होता.

### मालवाहतूक विस्तारण्यास मदत

डीएचएल एव्हिएशन, इंडिगो, एअर इंडिया एक्स्प्रेस, टर्किश एअरलाइन्स, सिचुआन एअरलाइन्स आणि एसएफ एअरलाइन्स या कंपन्यांचाही मालवाहतूक सेवांमध्ये सहभाग आहे. या कंपन्यांच्या माध्यमातून विमानतळाची देशांतर्गत आणि आंतरराष्ट्रीय मालवाहतूक जोडणी विस्तारण्यास मदत होत आहे.

## श्रीवर्धन आयटीआयला 'श्रीमंत बाळाजी विश्वनाथ पेशवे' नामकरण करण्याची मागणी

**। श्रीवर्धन । प्रतिनिधी ।**

श्रीवर्धन येथील औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचे नामकरण श्रीमंत बाळाजी विश्वनाथ पेशवे औद्योगिक प्रशिक्षण संस्था, श्रीवर्धन असे करण्यात यावे, अशी आग्रही मागणी स्थानिक नागरिकांनी निवेदनाद्वारे केली आहे. यासंदर्भात श्रीवर्धन आयटीआयच्या प्राचार्यांना निवेदन सुपूर्द करण्यात आले.

गणेश आळी येथील औद्योगिक प्रशिक्षण संस्थेच्या नामकरणाचा विषय गेल्या अनेक महिन्यांपासून प्रलंबित आहे. श्रीमंत बाळाजी विश्वनाथ भट (पेशवे) यांचे श्रीवर्धन हे जन्मस्थान व कर्मभूमी असल्याने, त्यांच्या स्मृतींना उजाळा देण्यासाठी या संस्थेला त्यांचे नाव देण्यात यावे, अशी मागणी स्थानिक नागरिकांकडून आणि सामाजिक कार्यकर्त्यांकडून सातत्याने केली जात आहे.

श्रीवर्धन येथील मनोज गोगटे, निलेश जाधव, अक्षय ठाणगे आणि स्थानिक नागरिकांच्या सह्या असणारे निवेदन आयटीआय प्रशासनाने स्वीकारले असून, याबाबत लवकरात लवकर योग्य ती कार्यवाही करून वरिष्ठ स्तरावर पाठपुरावा केला जावा, अशी विनंती निवेदकांद्वारे करण्यात आली आहे.




## राशीभविष्य

- **मेष** : गेलेल्या संधी पुन्हा लाभतील. यांत्रिक–तांत्रिक क्षेत्रात अनुकूलता राहील. विद्यार्थ्यांना सुयश लाभेल.
- **वृषभ** : डोळ्यांचे विकार संभवतात. महत्त्वाचे करार लांबणीवर पडतील. आर्थिक बाबतीत काळजी घ्यावी.
- **मिथुन** : नव्या ओळखी होतील. विवाहाचे प्रस्ताव मार्गी लागतील. अनपेक्षित घटना चिंता निर्माण करतील.
- **कर्क** : व्यवसायात विशेष प्रगती होईल. नव्या गोष्टींचा ध्यास घ्याल. अनावश्यक बाबींचा चिंता करू नये.
- **सिंह** : घराच्या कामात अडचणी येतील. मुलांच्या प्रकृतीची काळजी घ्या. दूरचा प्रवास शक्यतो टाळवा.
- **कन्या** : मनातील योजना आकाराला येतील. वैवाहिक सौख्य लाभेल. परिचितांचे गुणदोष लक्षात घ्यावेत.
- **तूळ** : परिश्रम, चिकाटी कायम ठेवावी. मनातील कल्पना आकाराला येतील. व्यवसायात उत्तम यश मिळेल.
- **वृश्चिक** : कौटुंबिक अडचणी संभवतात. आर्थिक व्यवहारात काळजी घ्यावी. सहकाऱ्यांशी जमवून घ्यावं.
- **धनु** : मनाप्रमाणे सारं होत जाईल. कौटुंबिक प्रश्नातून मार्ग निघेल. ज्ञेष्ठांची जुनी दुखणी पुन्हा उद्भवतील.
- **मकर** : कर्तव्यात कसूर करू नका. जामीन कोणास राहू नका. शिक्षण, क्रीडा क्षेत्रात अनुकूलता राहील.
- **कुंभ** : अनुभवींचा सल्ला कामी येईल. पूर्वीचे वाद–विवाद पुन्हा उद्भवू शकतात. विद्यार्थ्यांना अडचणी येतील.
- **मीन** : स्थावर बाबतीत महत्त्वाचा दिलासा मिळेल. व्यवसायात उत्कर्ष होईल. मानसिक स्वास्थ लाभेल.

## १६ ऑक्टोबर

दिन विशेष

**जागतिक भूलतज्ज्ञ दिन**

- १९५१ : पाकिस्तानचे पहिले पंतप्रधान लियाकत अली खान यांची रावळपिंडीमध्ये हत्या.
- १९५९ : चित्रपटनिर्माते, दिग्दर्शक अजय सरपोतदार यांचा जन्म.
- १९६८ : हर गोविंद खुराना यांचा नोबेल पारितोषिकाने सन्मान.
- २०१३ : कवी प्रा. फ. मुं. शिंदे यांची अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी निवड.

आरोग्यमंत्र

## धोका जिंजिव्हिटिसचा

जिंजिव्हिटिस हा हिरड्यांशी संबंधित विकार असून विशिष्ट प्रकारच्या बॅक्टेरियांमुळे त्याचा प्रादूर्भाव होतो. या विकाराची लागण झालेल्या व्यक्तीच्या लाळेतून या विषाणूचा प्रसार होतो. चुंबन, खोकणं, शिंकणं आणि बाधित व्यक्तीसोबत जेवल्याने किंवा त्याने वापरलेल्या ग्लासमधून पाणी प्यायल्याने हा विकार उद्भवू शकतो. बॅक्टेरियाची लागण झाल्यानंतरही उत्तम प्रतिकारशक्तीमुळे निरोगी व्यक्तीमध्ये या विकाराची कोणतीही लक्षणं दिसून येत नाहीत. दातांची योग्य काळजी घेतली तर जिंजिव्हिटिसला प्रतिबंध करता येतो. धूम्रपान करणाऱ्या व्यक्तींना हा विकार होण्याची शक्यता सर्वात जास्त असते. धूम्रपान करणाऱ्या व्यक्तीच्या शरीरात या बॅक्टेरियाने प्रवेश केला तर त्यांचं शरीर या बॅक्टेरियांना प्रतिकार करू शकत नाही. त्यामुळे अशा लोकांना हा विकार लगेच जडू शकतो. हा विकार झाल्यानंतर हिरड्यांभोवतीच्या पेशी आणि टिश्यू मृतवत होऊ लागतात. यामुळे हिरड्या कमकुवत होतात आणि काळपट दिसू लागतात. हिरड्या कमकुवत झाल्याने दात पडतात. या विकारामुळे हिरड्यांची संवेदनशीलता वाढते. यामुळे हिरड्या कोणत्याही जंतूसंसर्गाला झटकन बळी पडतात. या विकाराला प्रतिबंध करण्यासाठी दातांची नियमित तपासणी करून घ्यायला हवी. हिरड्यांना सूज येणं, रक्त येणं यासारखी लक्षणं दिसून आली तर तातडीने डेंटिस्टचा सल्ला घ्यायला हवा.



जाणून घ्या

## देशोदेशीचे प्रकाशोत्सव

* जपनामध्ये ओनियो फायर फेस्टिवलचं आयोजन केलं जातं. हा सोहळा जानेवारी महिन्यात रंगतो. जपानमधल्या फुफुओकामध्ये लोक मेणबत्त्या आणि मशाली पेटवून संपूर्ण शहर उजळवून टाकतात. मशाली पेटवल्यामुळे संकटं दूर होतील, असं इथले लोक मानतात.

* थायलंडमध्ये लाम क्रयोंघ नावाचा उत्सव असतो. या उत्सवादरम्यान थाई लोक रात्रीच्या वेळी केळ्याच्या पानांपासून तयार केलेले दिवे लावतात. प्रार्थना करतात आणि हे दिवे वाहत्या पाण्यात सोडून दिले जातात.

* फ्लोरिडातल्या अल्टूना शहरात सॅमहेन फेस्टिवलचं आयोजन होतं. हा सुद्धा दिवाळीप्रमाणेच प्रकाशाचा उत्सव आहे. ऑक्टोबरच्या शेवटच्या आठवड्यात हा उत्सव साजरा होतो.

* स्कॉटलंडमध्ये अप हेली नावाचा सण साजरा होतो. जानेवारी महिन्यातल्या शेवटच्या मंगळवारी हा सण साजरा होतो. या दिवशी इथले लोक प्राचीन काळातल्या योद्धयांप्रमाणे पेहराव करून मशाल घेऊन पदयात्रा काढतात.

स्टाईल स्टेटमेंट

## रंगीबेरंगी फॅशन

* करिश्मा कपूरपासून सोनाक्षी सिन्हापर्यंत बऱ्याच सेलेब्ज पांढऱ्या रंगाचे कपडे घालतात. पांढरा रंग खूप छान दिसतो. सणासुदीला नक्षीकाम केलेले पांढऱ्या रंगाचे पेहराव कॅरी करता येतील.

* फॅशनिस्टा सोनम कपूरला लाल रंग खूप आवडतो. सोनम बरेचदा लाल रंगाचे कपडे घालते. लाल रंग कोणत्याही प्रसंगाची शान ठरतो. या रंगाचे कपडे खूप उठून दिसतात. त्यामुळे तुम्हीही लाल रंगाचा पेहराव करू शकता.

* जांभळ्या रंगाचे कपडेही खूप छान दिसतात. सणावारी वेगळा रंग ट्राय करायचा असेल तर जांभळ्या रंगाचे पेहराव करता येतील. जांभळ्या रंगाच्या साड्यांसह ड्रेसही शोभून दिसतात.

* हिरवा रंग नेहमीच ट्रेंडमध्ये असतो. या रंगाचे कपडे नेहमीच उठून दिसतात. हिरव्या रंगाच्या साड्या, ड्रेस, इव्हिनिंग गाऊन, लेहंगा चोली तुम्ही कॅरी करू शकता. हिरव्या रंगाच्या अनेक छटा असतात. तुमची आवडती छटा कॅरी करता येईल. बऱ्याच बॉलिवूड सेलेब्ज हिरव्या रंगाचे कपडे घालतात.

### पंचांग

**शुक्रवार, १६ ऑक्टोबर २०२६**
पराभवनाम संवत्सर शके १९४८,
अश्विन शु. ६, चंद्रराशी : वृश्चिक,
नक्षत्र : ज्येष्ठा, योग : शोभन,
सूर्योदय ६.३५, सूर्यास्त ६.१३

### फॉरवर्डस

**सिर्फ़ ख़ुशबू क़ा नशा था साहब वरना...**

**कागज़ के फूल तो ज़िंदगी भर साथ देने क़ो तैयार थे...!**

### भटकंती

गोव्यापासून काही किलोमीटर अंतरावर मोल्लेम नावाचं गाव आहे. कर्नाटक सीमेजवळचं हे गाव खूप सुंदर आहे. इथे एक अभयारण्य आहे. हे अभयारण्य पाहण्यासाठी लोक मोठ्या संख्येने इथे येतात. मोल्लेम गावात तुम्ही निवांत क्षण घालवू शकता. या परिसरात प्राचीन खडक पहायला मिळतात. हे खडक ३६०० अब्ज वर्षांपूर्वीचे असल्याचं म्हटलं जातं. इथल्या तांबडी सुरला परिसरात शंकराचं पुरातन मंदिर आहे. हे स्थान गोव्यातल्या कदंबा राजवटीचं प्रतीक मानलं जातं.

(क्रमशः)

करिअरवाटा

## हॉस्पिटल मॅनेजमेंटच्या विश्वात...

विविध व्याधींचं प्राबल्य वाढत असताना आणि आबालवृद्धांना तब्येतीच्या तक्रारी सतावत असताना अद्ययावत रुग्णालयांची संख्या वाढणं आणि त्यायोगे 'हॉस्पिटल मॅनेजमेंट' चं विश्व व्यापक होणं स्वाभाविक अहे. या वाढत्या व्याप्तीमुळेच या क्षेत्रात कुशल मनुष्यबळाला वाढती मागणी आहे. मोठ्या हॉस्पिटलचा कर्मचारीवर्ग मुख्यत्वे तीन विभागात विभागलेला असतो. एक म्हणजे डॉक्टर्स आणि परिचारकवर्ग, इतर दैनंदिन कामकाज बघणारा कर्मचारीवर्ग आणि तिसरा गट म्हणजे हॉस्पिटलचं ऑफिस वर्क करणारा कर्मचारीवर्ग. रूग्णाला हॉस्पिटलमध्ये दाखल करून घेणं, त्याला योग्य त्या डॉक्टरांपर्यंत पोहोचवणं, तपासण्यांसाठी मार्गदर्शन करणं, त्याबाबतचे खर्चाचे तपशील पुरवणं, मेडिक्लेमच्या प्रक्रिया पूर्ण करणं, रुग्णालयात दाखल करावं लागलं तर त्याच्या निवासापासून खाण्यापर्यंतची सोय करणं हे सगळं पहाणारा एक कर्मचारीवर्ग असतो. त्याचा रूग्णाच्या उपचारांशी काही संबंध नसतो मात्र रूग्णाची हॉस्पिटलमध्ये गैरसोय होऊ न देणं हे यांचं काम असतं. व्यवस्थापनाच्या क्षेत्रातील ही झपाट्यानं विकसित होणारी शाखा आहे. त्यामुळे या क्षेत्रात कारकिर्दीच्या विविध संधी उपलब्ध होऊ शकतात.



खेचाखेची

### उद्या चालेल

दोन सरदार एकदा बँक लूटायला जातात. बँकेत गेल्यावर त्यांच्या लक्षात येते ते, की बंदूक आणायला विसरले आहेत.

ते तरीही बँक मॅनेजरला धमकावतात.

त्यांच्या नशिबाने बँक मॅनेजरही सरदारच असतो. तो त्यांना सांगतो, ठीक आहे! बँक आज लुटा पण उद्या बंदूक दाखवायला नक्की आणा.

### वेगळं काही

बोस्नियाच्या जोरिका रिबरनिक यांना लाल रंग प्रचंड आवडतो. म्हणूनच त्या वयाच्या अठराव्या वर्षापासून लाल रंगाचे कपडे परिधान करत आहेत. इतकंच नाही तर त्यांचं घर आणि घरातली प्रत्येक वस्तू लाल रंगात रंगवण्यात आली आहे. जोरिका यांच्या लाल रंगावरच्या प्रेमामुळे परिसरातले लोक त्यांना 'रेड लेडी' या नावाने ओळखतात. जोरिका यांनी केसही लाल रंगात रंगवले आहेत. जोरिका या निवृत्त शिक्षिका आहेत. लाल रंग प्रचंड प्रिय असल्यामुळे आपल्या आसपासची प्रत्येक वस्तू लाल रंगाची असावी असं त्यांना वाटतं. अंतिम संस्कारांच्या प्रसंगीही त्या लाल रंगाचा पोशाख परिधान करतात. अठराव्या वर्षापासून त्या लाल रंगाच्या प्रेमात पडल्या.

संगोपन

## मुलांना योगाकडे वळवा

सध्याच्या तणावग्रस्त जीवनशैलीच्या विळख्यातून लहानग्यांचीदेखील सुटका झालेली नाही. विविध प्रकारचं प्रदूषण, जंक फूडचं अतिसेवन, अभ्यास, वाढती स्पर्धा, गॅझेट्सचा वापर, व्यायामाचा अभाव, बैठी जीवनशैली यामुळे लहानग्यांचं आरोग्यदेखील धोक्यात आलं आहे. वजन वाढण्यासोबतच चिडचिड होणं, मन एकाग्र न होणं अशा समस्या त्यांना भेडसावतात. योगासनांच्या माध्यमातून या समस्या सोडवता येतील. त्यासाठी तुम्ही मुलांना योगासनं करायला प्रोत्साहन देऊ शकता. त्यांच्याकडून योगासनं करून घेऊ शकता. नियमित योगासनांमुळे मुलं तंदुरूस्त राहतील. त्यासाठी मुलांच्या आणि तुमच्या वेळेनुसार योगासनांची निश्चित वेळ ठरवा. सकाळी किंवा संध्याकाळी मुलांकडून सोपी योगासनं करून घ्या. त्यांना योगाचे फायदे सांगा. मुलांना योगाच्या क्लासलाही घालता येईल. मुलांना योगाची गोडी लागावी यासाठी वेगवेगळ्या कल्पना लढवा. मात्र मुलांकडून ओढून ताणून योगा करून घेऊ नका. योगा करताना घरात आनंदी वातावरण असू द्या. संध्याकाळी मुलांना मैदानी खेळही खेळायचे असतात. त्यामुळे थोडा वेळ योगा करून मुलांना खेळू द्या. योगा करताना मुलांच्या आवडीचं संगीत लावता येईल.



## सुडोकू १६१

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | ३ | ७ | | | ५ | ४ | | |
| २ | | ५ | | | | | | ३ |
| ८ | | | १ | | | २ | | |
| | ६ | ४ | २ | ९ | | | | |
| | ७ | ८ | | | | ३ | २ | |
| | | | | ३ | ८ | ६ | ७ | |
| | | २ | | | ६ | | | ७ |
| ४ | | | | | | ८ | | २ |
| | | ३ | ४ | | | ५ | ६ | |

**टीप -**

* या चौकटीमध्ये सर्व रिकाम्या घरांमध्ये १ ते ९ पैकी अंक वापरून चौकट पूर्ण करायची आहे. यामध्ये प्रत्येक आडव्या ओळीत, उभ्या ओळीत व ३ x ३ लहान चौकटीमध्ये १ ते ९ पैकी प्रत्येक अंक एकदा आणि एकदाच आला पाहिजे.
* आधी छापून दिलेले अंक बदलता येणार नाहीत.
* अशा तऱ्हेने पूर्ण झालेले उत्तर नेहमी एकच असते. पर्यायी उत्तरे असू शकत नाहीत.

## सुडोकू १६० चे उत्तर

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ३ | ७ | ८ | ४ | १ | ५ | ६ | ९ | २ |
| २ | ९ | ५ | ७ | ३ | ६ | ८ | ४ | १ |
| ६ | १ | ४ | ८ | ९ | २ | ७ | ३ | ५ |
| १ | ६ | ९ | ३ | २ | ४ | ५ | ८ | ७ |
| ८ | ३ | २ | ६ | ५ | ७ | ४ | १ | ९ |
| ५ | ४ | ७ | ९ | ८ | १ | २ | ६ | ३ |
| ४ | ८ | ३ | २ | ७ | ९ | १ | ५ | ६ |
| ९ | २ | १ | ५ | ६ | ८ | ३ | ७ | ४ |
| ७ | ५ | ६ | १ | ४ | ३ | ९ | २ | ८ |

## शब्दकोडे क्रमांक १६१

| | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | | ४ | ■ | ५ | | | ६ | ७ | | ■ | ८ | ९ |
| १० | | | ■ | ११ | १२ | | ■ | ■ | १३ | | ■ | १४ | ■ | |
| ■ | १५ | | | ■ | | ■ | १६ | १७ | | ■ | १८ | | | |
| १९ | | | ■ | २० | | | ■ | | ■ | २१ | | | ■ | |
| २२ | | ■ | २३ | | | ■ | २४ | | २५ | | | ■ | २६ | |
| ■ | २७ | २८ | | ■ | २८अ) | २९ | | ■ | | ■ | ३० | ३१ | | |
| ३२ | | | ■ | ३३ | | | | ■ | ३४ | ३५ | ■ | ३६ | | ■ |
| | ■ | ३७ | | | ■ | ३८ | | ३९ | ■ | ४० | ४१ | | ■ | ४२ |
| ४३ | ४४ | | ■ | ४५ | | | ■ | ४६ | ४७ | ■ | | ■ | ४८ | |
| ■ | | ■ | ४९ | ■ | ■ | ५० | ५१ | ■ | ५२ | ५३ | | | | |
| ५४ | | | | ■ | ५५ | | | ५६ | ■ | ५७ | | ■ | | ■ |
| ■ | | ■ | ५८ | ५९ | ■ | ■ | ६० | | ६१ | ■ | ■ | ६२ | | |
| ६३ | | | ■ | ६४ | ६५ | ६६ | | ■ | ६७ | ६८ | | | ■ | ■ |
| ६९ | | ■ | ७० | | | | ■ | ७१ | | | ■ | ७२ | | ७३ |
| | ■ | ७४ | | ■ | ७५ | | | ■ | | ■ | ७६ | | ■ | |

**आडवे शब्द :–**

१) दैववान,
५) वेडावाकडा
८) मेहेरबानी
१०) पाठविलेला
११) अबोलीची माळ
१३) धपाटा
१५) आयुष्य
१६) इमारतीचे बांधकाम करणारा राज
१८) पोष्टऑफिस
१९) उष्ण वा थंड नसलेले (पाणी)
२०) पुष्पदल
२१) वाघूळ
२२) षट
२३) मुस्लीम सरदार
२४) दुसऱ्याच्या मनातील विचार जाणणारा
२६) इंग्रजीत भाजणे
२७) गाढव
२८अ) कणीदार
३०) लवंडणे
३२) एक कंदमूळ
३३) छोटी लढाई
३४) व्रत
३६) मगज
३७) लाकडी जिना
३८) ढोंगी, नट, बहुरुपी
४०) धरा, पकडून ठेवा
४३) वाळवी
४५) दया
४६) लक्ष्मी
४८) बासरी
५०) साठ मिनीटे
५२) कपडालत्ता
५४) आत्याचा मुलगा
५५) शूर पुत्राला जन्म देणारी आई
५७) पृथ्वी
५८) खेळ, क्रीडा
६०) धैर्य, हिंमत
६२) सूर्याचे एक नाव
६३) फुरसत
६४) ** गण **
६७) शेतीतील काम
६९) फलक, टोपली
७०) हार
७१) मृत्यू नसलेला
७२) शेतकरी
७४) न्याय
७५) रत्न
७६) खलातील कुटण्याचे साधन

**उभे शब्द :–**

१) पुरुष
२) महाराष्ट्राचा राजा
३) नकली, खोटे
४) पर्वत
५) वाहणारी हवा
६) प्रेत वाहण्याची ताटी
७) ओटा
९) सुरळीत चालू असलेले काम बंद पाडणे (वा.प्र.)
१२) चकचकीत
१४) पुष्पदल
१७) नमस्कार
१८) हातोहात, त्वरेने
१९) दोन मैलाचे अंतर
२०) अलगुजे
२१) एक चतुर्थांश
२३) आकाश
२४) मळलेला
२५) दया, कीव
२६) न घाबरणारा
२८) टोळेचा प्रमुख
२९) श्रीविष्णुचा बटु अवतार
३१) पायाने अधू असलेला
३२) गाणे गाणारा
३३) उसाचा रस काढणारे यंत्र
३५) सर्प
३९) पोपट
४१) छिद्रातून जमिनीवर पडणारे उन
४२) दरवाजा
४४) अखेरीस
४७) एक सुगंधी वनस्पती
४८) पाप करण्यास घाबरणारा
४९) आई, ज्ञानेश्वर
५१) संतोष, आनंद
५३) पंख
५६) ताल वृक्ष
५९) लाजणारा
६१) सुरक्षित
६२) सुपारी कातरण्याचे साधन
६३) समतल
६५) दृष्टी
६६) मेलेला
६८) फळातील खाद्य
७०) पाय कवितेतील चरण
७३) अभिनेता

(उत्तर उद्याच्या अंकात)

### मागील शब्दकोड्याचे उत्तर

| | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| बि | न | भा | ड्या | चे | घ | र | ■ | सा | क्ष | र | ता | ■ | स | ■ |
| न | र | म | ■ | ष्टा | ■ | च | व | ■ | प | द | रा | न्प | द | र |
| दि | ■ | टा | क | ■ | वि | ना | का | र | ण | ■ | म | ■ | न | म |
| क्ष | ■ | ■ | पा | ऊ | स | ■ | ल | ■ | क | व | ती | क | ■ | णी |
| त | ळ | म | ळ | ■ | र | ■ | त | प | ■ | खा | ■ | म | ल | य |
| ■ | ■ | धु | ■ | अ | भो | ग्य | ■ | ला | चा | र | ■ | त | ट | ■ |
| ह | र | क | त | ■ | ळा | ■ | स | य | ■ | ■ | क्षा | र | ■ | चा |
| द्ध | ■ | र | ज | त | ■ | मो | ह | न | दा | स | ■ | ता | प | ट |
| पा | र | ■ | वी | र | ग | ती | ■ | ■ | दा | ल | न | ■ | र | ण |
| र | ज | प | ज | ■ | ल | ■ | क | स | बा | ■ | र | क | म | ■ |
| ■ | नी | र | ■ | स | ब | क | ■ | का | बा | ड | क | ष्ट | ■ | भो |
| दै | ना | ■ | थ | मा | ल | ■ | क | ळ | क | ■ | या | ■ | ता | क |
| ■ | थ | क | णे | ■ | ■ | ग | ड | ■ | र | ज | त | प | ट | ■ |
| ख | ■ | स | ■ | क | स | म | ■ | गा | णे | ■ | ना | ट | ■ | द |
| स | म | र | भू | मी | ■ | न | ज | र | ■ | वा | ■ | ल | ष्क | र |

## निवडक

### मुंबई पोलीस संघाचा दणका

**मुंबई** : शिवनेरी सेवा मंडळ, दादर आयोजित शिवनेरी कबड्डी महोत्सवात रुपाली ज्वेलर्स आणि मुंबई पोलिसांनी व्यावसायिक गटात दणदणीत विजय मिळवला. रुपाली ज्वेलर्सने पहिल्याच फेरीत रिजनल बोर्डाचा खेळ खल्लास केला. महिला गटात मुंबई पोलीस महिला संघ आणि विवेक महिला संघाने, तर कुमार गटात अंकुर क्रीडा मंडळ व यश क्रीडा मंडळाने प्रतिस्पर्ध्यांवर मात केली.महिला गटात मुंबई पोलीस महिला संघाने चंद्रोदय क्रीडा मंडळाचा ४२-१३ असा २९ गुणांनी पराभव केला.



मुंबई पोलिसांकडून चढाईत तृप्ती लांडगे, तर पकडीत साक्षी भोईर यांनी उत्कृष्ट कामगिरी केली. चंद्रोदयकडून तीर्था कोलगे हिने चांगला खेळ केला.दुसऱ्या सामन्यात विवेक महिला संघाने शताब्दी स्पोर्ट्स क्लबचा ५०-१७ असा ३३ गुणांनी धुव्वा उडवला. विवेककडून चढाईत संजना पोळ, तर पकडीत हरजीत कौर यांनी प्रभावी खेळ केला. शताब्दीकडून नंदिनी मौया आणि अनघा गायकवाड यांनी प्रतिकार केला. कुमार गटात यश क्रीडा मंडळाने पंचगंगा सेवा मंडळावर ३५-३१ अशी चार गुणांनी मात केली.

### विनिसियस ज्युनियरवर ४ सामन्यांची बंदी

**माद्रिद** : रिअल माद्रिदचा फॉरवर्ड विनिसियस ज्युनियरवर चार लीग सामन्यांची बंदी घालण्यात आली आहे. तो बार्सिलोनाविरुद्धचा एल-क्लासिको सामना खेळू शकणार नाही. हा सामना २६ ऑक्टोबर रोजी स्पॅनिश लीग ला-लिगामध्ये खेळवला जाणार आहे. स्पॅनिश फुटबॉल महासंघाच्या शिस्तपालन समितीने बुधवारी विनिसियसवर ४ सामन्यांची बंदी घातली. ब्राझीलच्या या फुटबॉलपटूने ११ ऑक्टोबर रोजी सामन्यात व्हिलारियालच्या नाथन सालिबाचे केस ओढले होते. मात्र, व्हिलारियालने हा सामना जिंकला.केस ओढल्याबद्दल विनिसियसला दोन सामन्यांची आणि रेफरीचा आक्रमकपणे विरोध केल्याबद्दल आणखी दोन सामन्यांची बंदी घालण्यात आली आहे. गेल्या आठवड्यात शनिवारी विलारियालविरुद्धच्या सामन्यात नाथन सालिबासोबत धावताना त्याने त्याचे केस ओढले होते.

### नटराजन सनरायझर्स हैदराबादमध्ये परतला

**हैदराबाद** : आयपीएल २०२७ च्या लिलावापूर्वी सनरायझर्स हैदराबाद आणि दिल्ली कॅपिटल्स यांनी ट्रेड केला आहे. मंगळवारी झालेल्या या व्यवहारात टी. नटराजन सनरायझर्स हैदराबादमध्ये परतला आहे, तर त्याच्या बदल्यात लेगस्पिनर झिशान अन्सारी दिल्ली संघात सामील झाले आहेत.हैदराबादने नटराजनला ५ कोटी रुपयांच्या रकमेत संघात घेतले.



झिशान अन्सारी सध्याच्या ४० लाख रुपयांच्या शुल्कावरच दिल्लीकडून खेळेल. त्याने आयपीएल २०२५ मध्ये हैदराबादसाठी १० सामने खेळले होते. यात त्याने ६ बळी घेतले होते. नटराजन २०२० ते २०२४ या कालावधीत पाच हंगामांमध्ये हैदराबाद संघाचा भाग होता. त्याचा सर्वात यशस्वी हंगाम २०२४ ठरला. त्या वेळी त्याने संघासाठी सर्वाधिक १९ बळी घेतले होते.२०२५ च्या लिलावात दिल्लीने नटराजनला १०.७५ कोटी रुपयांना खरेदी केले होते. आता तो सुधारित ५ कोटी रुपयांच्या शुल्कावर पुढील आयपीएल खेळेल. २०२७ च्या हंगामापूर्वी हा एकमेव प्लेअर ट्रेड नाही.

### महासचिव प्रमोद कुमार निलंबित

**नवी दिल्ली** : बॉक्सिंग फेडरेशन ऑफ इंडिया चेअरमन अजय सिंह यांनी महासचिव प्रमोद कुमार यांना तत्काळ प्रभावाने निलंबित केले. प्रमोद कुमार यांच्यावर कथित आर्थिक गैरव्यवहार, चौकशीत सहकार्य न करणे आणि अधिकारांचा गैरवापर केल्याचे आरोप आहेत. त्यांच्याविरुद्धची चौकशी पूर्ण होईपर्यंत निलंबन कायम राहील.मंगळवारी जारी केलेल्या आदेशात अजय सिंह यांनी म्हटले की, प्रमोद कुमार यांनी आवश्यक मंजुरीशिवाय प्रसारण व्यवस्थेसाठी वर्क ऑर्डर जारी केला. प्रमोद कुमार यांच्यावर राष्ट्रीय चॅम्पियनशिप रद्द होण्याच्या चौकशीत सहकार्य न केल्याचा आरोप आहे. याशिवाय, त्यांनी अध्यक्षांविरुद्ध अविश्वास प्रस्ताव आणण्यासाठी अनधिकृत बैठक बोलावण्याचा प्रयत्नही केला. आदेशानुसार, प्रमोद कुमार यांना महासचिव पदावरून तत्काळ प्रभावाने अंतरिम स्वरूपात निलंबित करण्यात आले आहे. ही कारवाई चौकशी पूर्ण होईपर्यंत किंवा सक्षम प्राधिकाऱ्याच्या आदेशात बदल अथवा तो रद्द होईपर्यंत लागू राहील. आदेशात स्पष्ट करण्यात आले आहे की निलंबन हा अंतरिम उपाय आहे; त्याला आरोपांवरील अंतिम निर्णय मानले जाणार नाही.प्रमोद कुमार यांनी १३ ऑक्टोबर रोजी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना पत्र लिहून अध्यक्ष अजय सिंह आणि कार्यकारी संचालक कर्नल अरुण मलिक यांच्यावर आरोप केले होते.

### अभिषेकने मोडला सूर्यकुमारचा विक्रम

**हैदराबाद** : भारताला हैदराबादमध्ये वेस्ट इंडिजविरुद्धच्या चौथ्या टी-२० सामन्यात पराभवाचा सामना करावा लागला. या सामन्यात वेस्ट इंडिजने भारतावर २४ धावांनी विजय मिळवला. त्यामुळे पाच सामन्यांच्या मालिकेत २-२ अशी बरोबरी झाली आहे.मात्र, या



पराभवातही भारतीय संघाचा सलामीवीर अभिषेक शर्माने मोठा विक्रम आपल्या नावावर केला आहे. त्याने भारताचा माजी टी-२० कर्णधार सूर्यकुमार यादवला मागे टाकलं आहे. अभिषेक शर्माने एका कॅलेंडर वर्षात टी-२० आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये सर्वाधिक षटकार मारण्याचा विक्रम केला आहे. याआधी हा विक्रम सूर्यकुमार यादवच्या नावावर होता. २०२२ मध्ये सूर्यकुमारने एका वर्षात ६८ षटकार मारले होते. अभिषेकनेही यंदा ६८ षटकार मारत त्याच्या विक्रमाची बरोबरी केली होती.मात्र, वेस्ट इंडिजविरुद्धच्या चौथ्या टी-२० सामन्यात डावाच्या नवव्या षटकात षटकार मारत अभिषेकने सूर्यकुमारला मागे टाकलं. या षटकारासह २०२६ या कॅलेंडर वर्षात त्याच्या नावावर ६९ षटकार झाले आहेत.

# वेस्ट इंडिजचा भारतावर विजय

**मालिका २-२ ने बरोबरीत; एकटा बॉलर भारताला पडला भारी**



| मुंबई | प्रतिनिधी |

वेस्ट इंडिज संघाने चौथ्या टी-२० सामन्यात भारतावर २४ धावांनी मात केली. या सामन्यात वेस्ट इंडिज संघाने टॉस हारल्यानंतर २० ओव्हरमध्ये २४७-४ धावांचा अवाढव्य डोंगर उभा केला होता. या आव्हानाचा पाठलाग करताना भारताने २२३-९ धावा केल्या. वेगवान गोलंदाज कीमो पॉल याने पाच विकेट घेत भारताला बॅकफूटवर ढकलेले. संजू सॅमसन याने ५६ धावांची आक्रमक अर्धशतकी खेळी केली. लोकल बॉय नीतीश कुमार रेड्डी (४१ धावा) आणि तिलक वर्मा (४३ धावा) यांनी आक्रमक खेळी करत विजयाच्या आशा जिवंत ठेवल्या होत्या. पण एकही मोठी भागीदारी झाली नाही. दबावात आल्यामुळे मोठे फटके मारण्याच्या प्रयत्नात विकेट गमावल्या. या विजयासह वेस्ट इंडिज संघाने २-२ने मालिकेत बरोबरी केली आहे.

भारतीय गोलंदाजांचा धुव्वा उडवत कॅरेबियन फलंदाजांनी हैदराबादच्या मैदानावर चौफेर फटकेबाजीचे प्रदर्शन केले. वेस्ट इंडिजचा कर्णधार शाई होप याने गाजवला. त्याने अवघ्या ५० चेंडूंमध्ये ९ षटकार आणि ४ चौकारांच्या मदतीने १०२ धावांची नाबाद शतकी खेळी साकारली. हे त्याचे या मालिकेतील दुसरे आणि टी-२० आंतरराष्ट्रीय कारकिर्दीतील तिसरे शतक ठरले. सलामीवीर जुएल अँड्र्यू याने १६ चेंडूत २१ धावा करून डावाची सुरुवात करून दिली. त्यानंतर मैदानात आलेल्या शिमरॉन हेटमायर याने १२ चेंडूत ३३ धावांची विस्फोटक खेळी करत २७५ च्या स्ट्राईक रेटने धावा कुटल्या. कर्णधार रोव्हमन पॉवेल यानेही १७ चेंडूत २४ धावांचे योगदान दिले. डावाच्या अंतिम टप्प्यात शेरफेन रदरफोर्ड याने शे होपला भक्कम साथ दिली. रदरफोर्डने अवघ्या २६ चेंडूत ४ चौकार आणि ३ षटकारांसह नाबाद ४९ धावा कुटल्या. त्यांच्या या तुफानी फलंदाजीमुळे वेस्ट इंडिजने भारतासमोर २४८ धावांचे विशाल लक्ष्य ठेवले होते. भारताकडून अर्शदीप सिंह, मयंक यादव आणि प्रिन्स यादव यांनी प्रत्येकी १-१ विकेट मिळवली.

धावांचा पाठलाग करताना संजू सॅमसन याने सुरूवातीपासूनच आक्रमक पवित्रा घेतला होता. संजू सॅमसनने अवघ्या २३ चेंडूत ५६ धावांची तुफानी खेळी करत भारताला शानदार सुरुवात करून दिली. त्याने ६ चौकार आणि ४ षटकार मारत धावगती राखली होती. मात्र अभिषेकची बॅट शांत राहिली त्याने जास्तच सावध पवित्रा घेतल्याचं पाहायला मिळालं. ईशान किशन ६ धावा, श्रेयस अय्यर १६ धावा आणि नमन धीर ० धावा करून स्वस्तात परतले. मधल्या फळीत तिलक वर्माने २५ चेंडू ४३ धावा आणि नितीश कुमार रेड्डीने २० चेंडूत ४१ धावा करत सामना शेवटपर्यंत नेण्याचा प्रयत्न केला. पण विजय मिळवून देऊ शकले नाहीत.

**सामन्याचा टर्निंग पॉइंट**

संजू सॅमनस याने टी-२०मध्ये १०० षटकार पूर्ण केले. आज त्याने अवघ्या २० चेंडूत ५१ धावा, ६ चौकार आणि ४ षटकार मारले होते. संजूने सामना एकहाती ओढायला सुरुवात केलेली पण कीमो पॉलने पहिला धक्का दिला होता. त्यानंतर ईशान किशनलाही त्याच ओव्हरमध्ये आऊट दोन धक्के दिले आणि तिथेच सर्व सामना फिरला.

## स्पार्टन मान्सून लीगमध्ये लेजेंड्सची बाजी



**पुणे रेंजर्सला सलग दुसऱ्यांदा उपविजेतेपद**

| पुणे | प्रतिनिधी |

स्पार्टन क्रिकेट क्लब पुणे तर्फे आयोजित सहाव्या स्पार्टन मान्सुन लीग अजिंक्यपद मिक्स कॉर्पोरेट टी-२० क्रिकेट स्पर्धेत ऐश्वर्य खोपकर आणि अच्युत मराठे यांनी केलेल्या अचूक गोलंदाजीमुळे लेजेंड्स स्पोर्ट्स क्लबने पुणे रेंजर्स क्रिकेट क्लबचा तीन गडी राखून पराभव करत विजेतेपदावर आपले नाव कोरले.

सिंहगड रोडवरील कोद्रे फार्मस् क्रिकेट मैदानावर झालेल्या या स्पर्धेच्या अंतिम सामन्यात पुणे रेंजर्स क्रिकेट क्लबने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजीचा निर्णय घेतला. पुणे रेंजर्स क्रिकेट क्लबचा डाव १७.३ षटकात ११९ धावांवर मर्यादित राहीला. श्रीहर्ष पाटील २६ धावा आणि कौस्तुभ बाकरे २० धावा या दोघांनी संघाचा डाव उभा केला.

लेजेंड्स संघाच्या ऐश्वर्य खोपकर आणि अच्युत मराठे यांनी प्रत्येकी तीन गडी बाद करून पुणे रेंजर्सचा डावाला वेसण घातले. षटकामागे सरासरी सहा धावांचे लक्ष्य घेऊन उतरलेल्या लेजेंडस स्पोर्ट्स क्लबने हे आव्हान ९.५ षटकात पूर्ण केले. मयुर गोखले ३०, अमित गणपुले २५ आणि गिरीष कोंडे नाबाद २६ धावा यांनी संघाचा विजय सुकर केला. स्पर्धेचे पारितोषिक वितरण अभिषेक शुक्ला आणि विक्रम देशमुख यांच्या हस्ते करण्यात आले. विजेत्या लेजेंड्स स्पोर्ट्स क्लबला आणि उपविजेत्या पुणे रेंजर्स क्रिकेट क्लबला करंडक आणि मेडल्स् अशी पारितोषिके देण्यात आली.

## बीसीसीआय ॲक्शन मोडमध्ये

| मुंबई | प्रतिनिधी |

भारतीय संघ बऱ्याच दिवसांपासून एका समस्येचा सामना करत आहे ही समस्या म्हणजे दुखापतीची समस्या आहे. यामुळे अनेक मोठ्या स्पर्धेतून महत्त्वाचे खेळाडू बाहेर पडले आहेत. आता या समस्येला तोडगा काढण्यासाठी बीसीसीआयने मोठे पाऊल उचलले आहे. बीसीसीआयने एक नियम काढला आहे त्यामुळे आता या समस्येवर तोडगा निघेल.



**■ टीममध्ये खेळायचे असेल तर आरटीपी अनिवार्य**

बीसीसीआयने जखमी खेळाडूंसाठी एक नवीन प्रोटोकॉल स्थापित केला आणि फिटनेस चाचणीतही बदल केले. इतकेच नाही तर, बीसीसीआयचा आरटीपी (रिटर्न टू प्ले) हा एक अनिवार्य फिटनेस प्रोटोकॉल आहे, जो गंभीर दुखापत किंवा शस्त्रक्रियेतून बरे होणाऱ्या कोणत्याही राष्ट्रीय संघाच्या सदस्याला स्पर्धात्मक खेळात परतण्यापूर्वी उत्तीर्ण करणे आवश्यक आहे.

ही चाचणी सेंटर ऑफ एक्सलन्सच्या वैद्यकीय आणि क्रीडा विज्ञान संघाच्या देखरेखीखाली घेतली जाते.

**आशियाई पॅरा क्रीडा स्पर्धा**

## तुषार सिनलकर भारताचे प्रतिनिधित्व करणार

| रसायनी | प्रतिनिधी |

आंतरराष्ट्रीय तायक्वांदो पंच तुषार सिनलकर यांची जपान येथे होणाऱ्या पाचव्या आशियाई पॅरा क्रीडा स्पर्धा २०२६ साठी आंतरराष्ट्रीय तांत्रिक अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. या प्रतिष्ठित स्पर्धेत जबाबदारी पार पाडण्यासाठी ते जपानमध्ये दाखल झाले असून, त्यांच्या या निवडीमुळे भारतीय तायक्वांदो क्षेत्रात आनंदाचे वातावरण आहे.

तुषार सिनलकर हे रायगड जिल्ह्यातील असून यापूर्वी विविध प्रतिष्ठित आंतरराष्ट्रीय स्पर्धांमध्ये पंच म्हणून काम करत आपल्या कौशल्याचा आणि अनुभवाचा ठसा उमटवला आहे. त्यांच्या आंतरराष्ट्रीय कारकिर्दीत आशियाई तायक्वांदो अजिंक्यपद स्पर्धा २०२६, मंगोलिया (क्योरुगी, पुमसे आणि पॅरा), चुनचॉन ओपन जी-२, दक्षिण कोरिया, माऊंट एव्हरेस्ट ओपन जी-१, नेपाळ, ऑस्ट्रेलिया ओपन जी-२ आणि ओशिनिया प्रेसिडेंट कप जी-३, ऑस्ट्रेलिया या स्पर्धांचा समावेश आहे.

आंतरराष्ट्रीय स्तरासोबतच त्यांनी राष्ट्रीय स्तरावरही महत्त्वपूर्ण जबाबदाऱ्या पार पाडल्या आहेत. ३८व्या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धा, उत्तराखंड २०२५, विविध राष्ट्रीय अजिंक्यपद स्पर्धा, भारतीय संघाच्या निवड चाचण्या, पोलीस क्रीडा स्पर्धा आणि शालेय क्रीडा स्पर्धांमध्ये त्यांनी पंच म्हणून काम केले आहे.



आशियाई पॅरा क्रीडा स्पर्धा ही आशिया खंडातील दिव्यांग खेळाडूंसाठी आयोजित केली जाणारी एक महत्त्वाची बहुक्रीडा स्पर्धा आहे. या स्पर्धेत आंतरराष्ट्रीय तांत्रिक अधिकारी म्हणून नियुक्ती होणे, ही तुषार सिनलकर यांच्या क्रीडा कारकिर्दीतील महत्त्वपूर्ण उपलब्धी मानली जात आहे. या माध्यमातून त्यांना आंतरराष्ट्रीय स्तरावर भारताचे प्रतिनिधित्व करण्याची संधी मिळाली आहे.

या यशामागे जागतिक आणि आशियाई तायक्वांदो संघटना, भारतीय तायक्वांदो संघटना इंडिया तायक्वांदो, पंच प्रमुख, प्रशिक्षक आणि विशेषतः आई-वडिलांचे मोलाचे योगदान असल्याचे तुषार सिनलकर यांनी सांगितले.

त्यांच्या या निवडीमुळे भारतीय तायक्वांदो क्षेत्राची आंतरराष्ट्रीय स्तरावरील उपस्थिती अधोरेखित झाली आहे. तुषार सिनलकर यांच्या या उल्लेखनीय कामगिरीबद्दल क्रीडा क्षेत्रातून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत असून, आशियाई पॅरा क्रीडा स्पर्धा २०२६ मधील त्यांच्या पुढील वाटचालीसाठी सर्व स्तरांतून शुभेच्छा दिल्या जात आहेत.

**रोहा तालुकास्तरीय कबड्डी स्पर्धा**

## कोलाड हायस्कूलच्या मुलींचा संघ प्रथम



| कोलाड | प्रतिनिधी |

रोहा तालुका स्तरावरील क्रीडा स्पर्धा धाटाव येथे शुक्रवारी (दि.९) संपन्न झाल्या. या क्रीडा स्पर्धेतील कबड्डी मध्ये सुधागड एज्युकेशन सोसायटी पालीचे द. ग. तटकरे माध्यमिक व उच्च माध्यमिक कोलाड येथील १७ वर्षाच्या वयोगटातील मुलींनी प्रथम क्रमांक पटकवला.

धाटाव येथील तालुका स्तरीय क्रीडा स्पर्धेतील कबड्डी स्पर्धेत तन्वी गोठेकर, इच्छिता मोरे, मनाली सानप, अदिती मोरे, रुचिता सरफळे, अंशिका विश्वकर्मा, पूर्वा भोईर, रिटा खान, शर्वरी मालुसरे, मधुरा कोस्तेकर यांनी उत्तम पक्कड व नेत्रदिपक केलेल्या चढाया.तसेच क्रीडा शिक्षक सत्वे, शेंडे, क्रीडा शिक्षिका कळमकर, जाडकर यांनी केलेले उत्तम मार्गदर्शनाखाली कोलाड विद्यालयातील १७ वर्षे वयोगटातील मुलींनी कबड्डी स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकवला असुन या विजया बद्दल कोलाड द.ग.तटकरे विद्यालयाचे प्राचार्य सुखदेव तिरमले, सर्व शिक्षक वर्ग तसेच कर्मचारी वृंद यांनी अभिनंदन केले आहे.

## स्विंगचा किंग टीम इंडियात परतणार?

| मुंबई | प्रतिनिधी |

भारत आणि वेस्ट इंडिज या दोन्ही संघांमध्ये ५ टी-२० सामन्यांची मालिका सुरू आहे. मालिकेतील पाचवा सामना बंगळुरूतील एम चिन्नास्वामी स्टेडियमवर खेळवला जाणार आहे. या सामन्यात भारताचा स्टार गोलंदाज भुवनेश्वर कुमारला प्लेईंग ११ मध्ये संधी मिळू शकते, अशी चर्चा रंगायला सुरूवात झाली आहे.

बंगळुरूत होणारा पाचवा टी-२० सामना हा दोन्ही संघांसाठी करो या मरो सामना असणार आहे. दरम्यान चौथ्या टी-२० सामन्यात फलंदाजी करत असताना अर्शदीप सिंगच्या खांद्याला चेंडू लागला. दुखापतीमुळे त्याला फलंदाजी सोडून बाहेर जावं लागलं. त्यामुळे तो पाचव्या सामन्यातून बाहेर होण्याची शक्यता वर्तविली जात आहे. अर्शदीप सिंग जर पाचवा टी-२० सामना खेळू शकला नाही, तर त्याच्या जागी भुवनेश्वर कुमारला डायरेक्ट एन्ट्री मिळू शकते.



वेस्ट इंडिजविरुद्धची टी-२० मालिका झाल्यानंतर भारतीय संघ न्यूझीलंड दौऱ्यावर जाणार आहे. या मालिकेसाठी बीसीसीआयकडून भारतीय संघाची घोषणा करण्यात आली आहे. या संघात भुवनेश्वर कुमारला देखील पुनरागमन करण्याची संधी देण्यात आली आहे. तो बंगळुरूत असून सेंटर ऑफ एक्सिलेंसमध्ये आपल्या फिटनेसवर मेहनत घेत आहे. जर अर्शदीप सिंग पाचवा सामना खेळण्यासाठी फिट नसेल, तर भुवनेश्वर कुमारला भारतातच खेळण्याची संधी मिळू शकते. न्यूझीलंडविरुद्धच्या आव्हानाआधी भुवनेश्वर कुमारचा सरावही होईल. महत्वाच्या सामन्यात भुवनेश्वर कुमारसारखा अनुभवी गोलंदाज संघात येणं, हे भारतीय संघासाठी फायदेशीर ठरेल. आयपीएल स्पर्धेत तो रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू संघाचं प्रतिनिधित्व करतो, त्यामुळे त्याला या मैदानावर खेळण्याचा चांगलाच अनुभव आहे.

**जागतिक अजिंक्यपद कुस्ती स्पर्धा | भारताच्या ९ जणांचा व्हिसा नाकारला**

# विश्वजीत मोरेची चंदेरी कामगिरी

| मुंबई | प्रतिनिधी |

**भारतीय कुस्तीपटू विश्वजीत रामचंद्र मोरेने गुरुवारी अंडर-२३ जागतिक अजिंक्यपद कुस्ती स्पर्धेच्या ग्रीको-रोमन कॅटेगरीत भारतासाठी पहिले रौप्य पदक जिंकले. अंडर-२३ वल्ड लेव्हलवर दोन वेळा ब्रॉन्ज मेडल जिंकलेल्या मोरेने पुरुषांच्या ५५ किलो वजनी गटातील ग्रीको-रोमन फायनलमध्ये अखेरच्या क्षणी जॉर्जियाच्या कोबा कारुमिद्जेकडून १२-१३ असा पराभूत झाला. मोरे अंडर-२३ वर्ल्ड चॅम्पियनशीपमध्ये दोन मेडल जिंकणारा भारताचा एकमेव ग्रीको-रोमन कुस्तीपटू आहे.**



रशियाचा मलिक गिगिएवविरुद्ध सेमिफायनलदेखील खूप रोमहर्षक राहिली, ज्यात दोन्ही कुस्तीपटूंना 'चॅलेंज' (रेफरीच्या निर्णयाला आव्हान देण्याची संधी)चा फायदा मिळाला. अखेर विश्वजीतने ६-४ च्या फरकाने सामना आपल्या बाजूने वळवला.विश्वजीत फायनलमध्ये उत्साहात उतरला होता. तो अंडर-२३ वर्ल्ड चॅम्पियनशीपच्या ग्रीको-रोमन स्पर्धेत गोल्ड जिंकणारा पहिला भारतीय कुस्तीपटू ठरला असता. दरम्यान, त्याला फायनलमध्ये जॉर्जियाच्या कुस्तीपटूकडून पराभवाचा सामना करावा लागला.

दरम्यान, त्याआधी भारताच्या मोहिमेदरम्यान एका प्रशासकीय अडचणीचा सामना करावा लागलेला. अंडर-२३ वर्ल्ड रेसलिंग चॅम्पियनशीप (लॉस वेगास)साठी भारताचे ९ कुस्तीपटू (ग्रीको-रोमन आणि महिला कुस्तीपटू) यांना व्हिसा मिळाला नव्हता, कारण ते २० पेक्षा कमी वयाचे होते व आणि त्यांच्याकडे कोणतीच पूर्णवेळ नोकरी नव्हती.

डब्ल्यूएफआयचे अध्यक्ष संजय सिंह याबाबत म्हणाले की, अमेरिकेच्या दूतावासाने हे सर्व बेरोजगार असल्याचे सांगत भारतीय कुस्तीपटूंचा व्हिसा नाकारला होता. इतिहासात हे पहिल्यांदाच असे घडले. येथपर्यंत की, यूडब्ल्यूडब्ल्यूच्या अध्यक्षांनीही याप्रकरणी त्यांना पत्र लिहिले होते. व्हिसा फेटाळणे पूर्णपणे अमेरिकन दूतावासाची चूक आहे. त्यामुळे भारताला गोल्ड मेडल गमवावा लागला. ज्या दोन कुस्तीपटूंना व्हिसा नाही मिळाली, त्यातील कमीत कमी दोन असे होते, जे गोल्ड जिंकण्याचे प्रबळ दावेदार होते. अमेरिकन दूतावासाच्या चुकीमुळे भारताला पदकांचे मोठे नुकसान सोसावे लागले.

**पदक मिळवणारा भारताचा पहिला कुस्तीपटू**

तो अंडर-२३ वर्ल्ड चॅम्पियनशीपच्या फायनलमध्ये पोहचणारा भारताचा पहिला ग्रीको-रोमन कुस्तीपटू बनला होता. त्याने तीन अटीतटीच्या सामन्यात शानदार कामगिरी केली. तसेच मॅक्सिकोच्या इसाक मारिन माटाचा १०-८ असा पराभव करत आपल्या मोहिमेची सुरुवात केली.क्वार्टर फायनलमध्ये त्याचा सामना इराणच्या अंडर-२० वर्ल्ड चॅम्पियन आर्मिन शमसीपौरविरुद्ध झाला. शमसीपौरच्या खांद्याला दुखापत झाली होती आणि विश्वजीतने एक 'फोर-पॉइंटर थ्रो' (चार गुण देणारा डाव) चा वापर करत त्याला ८-१ असे पराभूत केले.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ.सुप्रिया पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ | RGD/016/2026-2028
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
**■ संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील ■ व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर ■ कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत* ■ सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर**
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)